नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# चंद्रपूर महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ४६ * अंक १५ * * चंद्रपूर * | मंगळवार, दिनांक १५ जुलै २०२५ | ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## राजस्थानमध्ये मुसळधार, ६जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, जयपूर, दि. १४ :**
आज राजस्थानमधील १८ जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. रविवारी भिलवाडा येथे पावसाच्या नाल्यात पडून दोन चुलत भावांचा मृत्यू झाला आणि राजसमंद येथे एका भावा-बहिणीचा तलावात पडून मृत्यू झाला. बेवारमध्ये चिखलात पडून एका मुलाचा मृत्यू झाला. भरतपूरमध्ये वीज पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला.
मध्य प्रदेशात मुसळधार पाऊस सुरूच आहे. छतरपूर, टिकमगढ, अशोकनगर आणि गुना येथे पूर परिस्थिती आहे. या जिल्ह्यांतील अनेक गावे रविवारी पाण्याखाली गेली. छतरपूरमधील धासन नदीत एक पिकअप वाहून गेली. यामुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला.

अग्राग्रलेख

## खरीखरी..

## रस्ते आणि पूल, जनतेची भूल

आज एबीपी माझा या वृत्तवाहिनीवर देशातील सडकांच्या परिस्थितीबद्दल अतिशय जबरदस्त चर्चा झाली. या वृत्तवाहिनीने देशातील जवळजवळ सर्वच राज्यात पावसामुळे कशाप्रकारे सडकांचे व पुलांचे नुकसान झाले आहे याची नावासकट दखल घेतलेली आहे. या चर्चेमध्ये जे निष्पन्न झालेले आहे ते पुढील प्रमाणे आहे. त्यामध्ये अनेक सडका आणि अनेक पूल वाहून गेलेले आहेत. जयपुर सारख्या राजधानीमध्ये १५ फुटांचा खोल खड्डा किंवा गड्डा अगदी रेल्वे स्टेशन समोर झालेला आहे, ही सडक काही महिन्यापूर्वीच तयार करण्यात आलेली होती. अनेक राज्यांचे म्हणजेच राज्यांमधील रस्ते ज्यांचे उद्घाटनही झालेले नाही ते पाण्यात वाहून गेलेले आहेत. दरवर्षी पाऊस येतो पावसामुळे येणाऱ्या पाण्याला पार करण्यासाठी आणि नाल्यांसाठी पूल बांधले जातात. ते उद्घाटनापूर्वीच जमीनदोस्त होतात मात्र इंग्रजांच्या काळातील पूल आजही मजबूत आहेत. इंग्रजांना जाऊन ७५ वर्षे झाली म्हणजे बऱ्यापैकी काळ लोटलेला आहे. त्यांनी तयार केलेले पूल अजूनही वाहतुकीसाठी सुरक्षित मानले जातात. विशेष म्हणजे त्या काळातील ज्या ज्या कंपन्यांनी हे पूल बांधलेले आहेत त्यांचे संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना पत्र येते की, आम्ही बांधलेल्या पुलाची जबाबदारी १०० वर्षापर्यंत आमची होती. आम्ही आता जबाबदार राहणार नाही, त्यानंतरही वर्षानुवर्ष त्यावरून वाहतूक चालू असते. तरीही पुलावर कोणताही अपघात होत नाही, कोणताही खड्डा पडत नाही इतका तो पूल मजबूत असतो. अलीकडच्या काळात आपण गुजरात घ्या, बिहार घ्या, महाराष्ट्र घ्या, उत्तर प्रदेश घ्या, मध्य प्रदेश घ्या, प. बंगाल घ्या किंवा तामिळनाडू घ्या. अगदी कुठेही जा. यत्र-तत्र, सर्वत्र सडक आणि पूलांची हालत अत्यंत खराब झालेली आहे. कोणे एके काळी मुंबईचे रस्ते प्रेक्षणीय आणि अत्यंत स्वच्छ असत. १९६५ पर्यंत मुंबईच्या सडका दररोज पाण्याने धुतल्या जात. ते प्रमाण १९७२ पर्यंत एक-दोन दिवसांपर्यंत आले होते. आता भारताच्या आर्थिक राजधानीतील सडका इतक्या खड्डेबाज किंवा गड्डेबाज झालेल्या आहेत की, त्यातून वाहने चालवणे आणि महाकठीण कर्म झालेले आहे. देशाच्या कोणत्याही भागाची हीच परिस्थिती आहे. याचे कारण काय असावे याचा शोध घेतल्यावर एका अभ्यासात असे दिसून आलेले आहे की, जेवढ्या रुपयांची निविदा असते. त्याच्या अर्ध्या रकमेत पूल किंवा रस्ते बनवले जातात मग काही नेते ज्या पुलाचे किंवा रस्त्याचे उद्घाटन करतात तिथे त्यांच्या नावाची तिथेच पाटी लागते. अपघात झाल्यावर त्यापैकी कुठलेच नेते कुठलीच जबाबदारी घ्यायला तयार नसतात. पूल पडला की लगेच त्याची चौकशी होते त्यावेळी ती चौकशी नियुक्त केलेल्या चौकशी समितीद्वारे वषार्नुवर्षे चालते आणि शेवटी, तेरी भी चूप आणि मेरी भी चूप असा प्रकार होतो. त्याच दरम्यानच्या काळात जनताही विसरून जाते, पुढारीही विसरतात. पुन्हा नव्यासारखा कारभार सुरू होतो. तो म्हणजे पुन्हा नवे पूल, पुन्हा नवीन खड्डे किंवा गड्डे ही क्रमवारी सातत्याने सुरूच राहते. मंजूर रकमेच्या चाळीस ते पन्नास टक्के पैशांमध्ये एखादा पूल किंवा रस्ता तयार होत असेल. तर त्याचा दर्जा काय असेल ते बोलण्याची अजिबातच गरज नाही. विशेष म्हणजे उघड सत्य आहे हे सर्वांना माहीत आहेच, त्यामुळे हे वेगळे काही सांगायची जरुरीच नाही. अगदी स्थानिक दादा लोकांपासून, राजकीय दादा लोकांपर्यंत प्रत्येकाची पूजा केल्याशिवाय कोणत्याही कॉन्ट्रॅक्टरला तरणोपाय नसतोच. स्वतंत्र भारतातील हे रस्तेपुराण आणि पूलपुराण इतके अद्भुत आहे की त्यावर अनेक संशोधकांना शोधनिबंधांच्या पीएचड्या सहजपणे मिळू शकतात. आता सध्याच्या कालावधीमध्ये आपण कितीही बोंबा मारल्या, तरी ना कुणाला लाज आणि ना कुणाला खंत आहे म्हणून काही विशेष बोलण्यात अर्थ नाही. त्यामुळेच आपण जमिनीपासून अंतरिक्षात पोहोचलो आहोत, पण आपल्या जमिनीशीच आपली बेईमानी कायम आहे. यासाठी कोणीतरी भगीरथ आपणास सापडेल काय?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## समृद्धी महामार्गाच्या निविदेत कोट्यवधींची

# आर्थिक अनियमितता?

### आ. रोहित पवारांची तक्रार ● प्रधान महालेखाकारांचे चौकशीचे आदेश

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**
महायुती सरकारचा भाग असूनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यांचे मंत्री आणि आमदार यांना नियोजनबद्ध पद्धतीने लक्ष्य केले जात आहे का? या मुद्द्यावर आता शिवसेनेत चर्चा सुरू झाली आहे.

आता समृद्धी महामार्गाच्या एका निविदेच्या नावाखाली रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) चौकशी सुरू झाली आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या अखत्यारीत हा विभाग येतो.

हे संपूर्ण प्रकरण समृद्धी महामार्गाशी संबंधित आहे. हा प्रकल्प महाराष्ट्राच्या विकासात एक गेमचेंजर ठरला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांनी समृद्धी महामार्गाच्या बांधकामात

**एकनाथ शिंदे टार्गेट**



कॉस्ट एस्कलेशनच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक अनियमिततेचा गंभीर आरोप विधिमंडळाच्या लोकलेखा समितीसमोर केला आहे.

लेखी स्वरूपात तक्रार मिळाल्यानंतर समितीचे अध्यक्ष विजय वडेट्टीवार यांनी राज्याच्या प्रधान महालेखाकारांना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले. यानंतर आता प्रधान महालेखाकार यांनी महालेखाकार (लेखा परीक्षण) मार्फत आलेल्या तक्रारीची चौकशी सुरू केली आहे.

**जालना - नांदेडलाही घोळ**

कॉस्ट एस्केलेशनद्वारे सुमारे ८०० कोटी रुपयांची आर्थिक अनियमितता करण्यात आली आहे, असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांचा दुसरा आरोप असा आहे की जालना-नांदेडदरम्यानच्या १७९ किमी समृद्धी महामार्गाच्या बांधकामातही अशाच प्रकारची आर्थिक अनियमितता झाली आहे.

सुरुवातीला १७९ किमी लांबीचे काम ११,४४२ कोटी रुपये खर्चून केले जाणार होते. परंतु नंतर ते १५,५५४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचले आहे.

**अहिल्यानगरात अनियमितता**

आमदार रोहित पवार यांच्या तक्रारीनुसार अहिल्यानगर जिल्ह्यात पहिली अनियमितता झाली आहे. या जिल्ह्यात फेज क्रमांक ११ अंतर्गत समृद्धी महामार्गाचे सुमारे २९ किमी काम झाले आहे. गायत्री प्रोजेक्ट नावाची कंपनी १९०० कोटी रुपयांना हे काम करणार होती.

परंतु निविदा मिळाल्यानंतरही या कंपनीने नंतर संशयास्पद पद्धतीने काम करण्यास नकार दिला. त्यामुळे एमएसआरडीसीने तेच काम हुजूर मल्टि प्रोजेक्ट नावाच्या दुसऱ्या कंपनीला २७०० कोटींना दिले.

दरम्यान, एकनाथ शिंदे यांना अडचणीत आणण्याचे काम सुरू झाल्याची चर्चा आहे.

## शुभांशूंचा परतीचा प्रवास सुरू



**मंगळवारी पृथ्वीवर पोहोचणार**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**
शुभांशू शुक्ला यांच्यासह चार अंतराळवीर १४ जुलै रोजी दुपारी ४:४५ वाजता आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरून पृथ्वीवर रवाना झाले. सुमारे २३ तासांच्या प्रवासानंतर, त्यांचे ड्रॅगन अंतराळयान १५ जुलै रोजी दुपारी ३ वाजता समुद्रात उतरेल. याला स्प्लॅशडाउन म्हणतात.

हे अंतराळयान २६३ किलोपेक्षा जास्त माल घेऊन परत येईल. त्यात नासाचे हार्डवेअर आणि ६० हून अधिक प्रयोगांमधील डेटा समाविष्ट असेल. अवकाश संशोधनासाठी हे खूप महत्वाचे आहे. चारही अंतराळवीर २६ जून रोजी भारतीय वेळेनुसार दुपारी ४:०१ वाजता आयएसएसवर पोहोचले. अ?क्सियम मिशन ४ अंतर्गत, अंतराळवीर २५ जून रोजी दुपारी १२ वाजता निघाले. स्पेसएक्सच्या फाल्कन-९ रॉकेटला जोडलेल्या ड्रॅगन कॅप्सूलमधून ते केनेडी स्पेस सेंटरमधून उड्डाण करत होते. तांत्रिक बिघाड आणि हवामानाच्या समस्यांमुळे हे अभियान ६ वेळा पुढे ढकलण्यात आले.

शुभांशूने मोहिमेदरम्यान ६० हून अधिक वैज्ञानिक प्रयोगांमध्ये भाग घेतला. यामध्ये भारतातील सात प्रयोगांचा समावेश होता. त्याने अवकाशात मेथी आणि मूगाचे बीज वाढवले. त्याने 'स्पेस मायक्रोअल्गी' प्रयोगातही भाग घेतला.

२८ जून २०२५ रोजी शुभांशूने आयएसएसवरून पंतप्रधान नरेंद्र मोदींसोबत लाईव्ह व्हिडिओ कॉन्फरन्सिंग केले. यादरम्यान त्यांनी सांगितले की भारत अंतराळातून खूप भव्य दिसतो. पंतप्रधानांनी विचारले की तुम्ही तुमच्यासोबत गाजराचा हलवा घेतला आहे का? तुम्ही तो तुमच्या मित्रांना खायला दिला का? यावर शुभांशूने सांगितले, हो, मी तो माझ्या मित्रांसोबत बसून खाल्ला. ३, ४ आणि ८ जुलै रोजी त्यांनी तिरुअनंतपुरम, बेंगळुरू आणि लखनऊ येथील ५०० हून अधिक विद्यार्थ्यांशी हॅम रेडिओद्वारे संवाद साधला.

## सरन्यायाधीश रूग्णालयात

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १४ :**
सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या प्रकृतीत हैदराबादमधील एका विधी विद्यापीठाच्या कार्यक्रमादरम्यान बिघाड झाल्याची माहिती असून, त्यांना उपचारार्थ रूग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती आहे.



न्यायमूर्ती भूषण गवई यांनी १४ मे २०२५ रोजी भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून पदाची शपथ घेतली. सरन्यायाधीश पदाची शपथ घेतल्यावर न्या.गवई सातत्याने दौरे करत आहेत. मे महिन्याच्या अंतिम आठवड्यात न्या. गवईंनी लंडनचा दौरा केला.

अमरावती, नागपूर, छत्रपतीसंभाजीनगर, मुंबई मध्ये आयोजित कार्यक्रमात न्या.गवई यांनी विविध सत्कार सोहळ्यात सहभाग घेतला. अलिकडेच हैदराबादमध्ये एका विधी विद्यापीठाच्या कार्यक्रमात ते सहभागी झाले होते. यात त्यांनी न्यायव्यवस्थेत बदल करण्याबाबत मत व्यक्त केले होते. या कार्यक्रमादरम्यान त्यांच्या प्रकृतीत बिघाड झाल्याची माहिती आहे.

शपथ घेतल्यापासून सातत्याने दौरे करत असल्यामुळे त्यांच्या प्रकृतीवर विपरित परिणाम झाला. हैदराबादमधून परतल्यावर त्यांना दिल्ली येथील रुग्णालयात तातडीने भरती करण्यात आले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असून ते त्याला प्रतिसाद देत असल्याची माहिती आहे. रुग्णालयात असल्यामुळे न्या. गवई सर्वोच्च न्यायालयाच्या कारवाईत सोमवारी सहभागी होऊ शकले नाही. येत्या दोन-तीन दिवसात ते पुन्हा कामावर रूजू होण्याची शक्यता आहे.

## राज्यात धर्मांतराविरोधात लवकरच कायदा

■ **महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. १४ :**
राज्यात अनेक ठिकाणी धर्मांतर करण्याच्या घटना घडत असल्याचा मुद्दा भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी विधान परिषदेत मांडला. यावर पंकज भोयर यांनी स्पष्टीकरण देत समिती स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले.



पंकज भोयर म्हणाले, महाराष्ट्रात कुठेही जबरदस्तीने धर्मांतर करण्याची परवानगी नाही. साधे सरळ जे लोक असतात त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न काही संस्था करत असतात. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली असून पुढील महिन्यात याचा अहवाल येणार आहे.

शिवसेना नेत्या मनीषा कायंदे यांनी प्रश्न उपस्थित केला की देशातील १० राज्यांमध्ये धर्मांतर विरोधी कायदा लागू करण्यात आला आहे, आपल्या राज्यात लागू होणार का? यावर पंकज भोयर म्हणाले ११ वे राज्य हे महाराष्ट्र असणार आहे आणि अतिशय कडक कायदा केला जाणार आहे.

## सुवर्ण मंदिर उडवण्याची धमकी

### टास्क फोर्स आणि पोलीस हाय अलर्टवर

■ **वृत्तसंस्था, अमृतसर, दि. १४ :**
पंजाब येथील अमृतसरमधील सुवर्ण मंदिर उडवून देण्याची धमकी देण्यात आली आहे. ही धमकी ई-मेलद्वारे देण्यात आली. यानंतर, शिरोमणी गुरुद्वारा प्रबंधक समितीचे टास्क फोर्स सुवर्ण मंदिराच्या आत आणि बाहेर पोलिस तैनात करण्यात आले आहेत.

सुवर्ण मंदिराला सोमवारी एक ई-मेल आला. त्यात फऊने ते उडवून देण्याचा उल्लेख होता. त्यात वेळ देखील लिहिली होती आणि लोकांना सतर्क राहण्यास सांगण्यात आले होते. असे दिसते की भीतीचे वातावरण निर्माण करण्यासाठी हे केले गेले आहे.

धमकीनंतर सुवर्ण मंदिराची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार रोखता यावा यासाठी संशयास्पद व्यक्तींची चौकशी करण्यासाठी टास्क फोर्सला विशेष सूचना देण्यात आल्या आहेत.



■ **मुंबई :** *छत्रपती शिवाजी महाराज यांनी बांधलेले १२ किल्ले युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट झाल्याच्या पार्श्वभूमिवर आज सोमवारी विधीमंडळ अधिवेशनाच्या तिसऱ्या आठवड्यातील पहिल्या दिवशी महायुती सरकारचे मंत्री आणि आमदारांनी छत्रपतींच्या पुतळ्याजवळ जल्लोष केला. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, चंद्रकांत पाटील, ॲड. आशिष शेलार यांच्यासह अनेक मंत्री आणि आमदार उपस्थित होते.*

## विजयी मेळावा केवळ मराठी पुरताच..

### ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स कायम

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**
राज्यात महापालिका निवडणुकांची तयारी सुरू असताना ठाकरे बंधूंच्या संभाव्य युतीने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.



मुंबईत मराठीच्या मुद्द्यावर झालेल्या विजयी मेळाव्यानंतर उद्धव आणि राज ठाकरे तब्बल वीस वर्षांनी एका व्यासपीठावर एकत्र आले. त्यानंतर या दोघांची पालिका निवडणुकीत एकत्र येण्याची शक्यता अधिकच वाढली होती.

मात्र, विजयी मेळावा मराठी पुरताच होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे विधान राज ठाकरे यांनी केले आहे. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा पुन्हा अनिश्चिततेच्या वाटेवर गेली आहे.

सध्या नाशिकमध्ये मनसेचे तीन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. आजपासून या शिबिराला सुरुवात झाली असून मनसे प्रमुख राज ठाकरे हे शिबिरासाठी इगतपुरी येथे दाखल झाले आहेत. यावेळी त्यांनी अनौपचारिक गप्पांदरम्यान विजयी मेळाव्याबाबत भूमिका स्पष्ट केली. त्यामुळे ठाकरे बंधूंच्या युतीचा सस्पेन्स आणखी वाढला आहे.

मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही, असे राज ठाकरे यांनी म्हटले. तसेच नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

मनसेने नेते आणि पदाधिकाऱ्यांसाठी विशेष शिबिराचे आयोजन केले असून, या शिबिराला आजपासून इगतपुरी येथे सुरुवात झाली आहे. हे शिबीर तीन दिवस चालणार आहे.

## मुख्यमंत्री महाराष्ट्र पिंजून काढणार

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :**
आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाच्या वतीने तयारी सुरू करण्यात आली आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यासाठी आता महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत. या आधी देखील फडणवीस यांनी महाजनादेश यात्रेच्या माध्यमातून महाराष्ट्र पिंजून काढला होता. तशीच तयारी यावेळी देखील सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

स्थानिक पातळीवर पक्ष, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी या निवडणुका महत्त्वाच्या मानल्या जातात. भारतीय जनता पक्ष हा कायमच निवडणुकीच्या मोड मध्ये असतो, असे म्हटले जाते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक मतदारसंघाचा आढावा या माध्यमातून देवेंद्र फडणवीस घेणार आहेत. त्यानुसार, ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांनाही भेटतील.

## हरियाणा व गोव्यात नवीन राज्यपाल

### लडाखचे उपराज्यपाल बदलले

■ **वृत्तसंस्था,नवी दिल्ली,दि. १४ :**
राष्ट्रपतींनी हरियाणा, गोव्याचे राज्यपाल आणि लडाखचे उपराज्यपाल बदलले आहेत.
निवृत्त ब्रिगेडियर डॉ. बीडी मिश्रा यांनी लडाख या केंद्रशासित प्रदेशाच्या उपराज्यपालपदाचा राजीनामा दिल्यानंतर, त्यांच्या जागी कविंदर गुप्ता यांची नवीन उपराज्यपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

याशिवाय, प्राध्यापक आशिम कुमार घोष यांची हरियाणाच्या राज्यपालपदी आणि पुष्पती अशोक गजपती राजू यांची गोव्याच्या राज्यपालपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

कविंदर मिश्रा हे जम्मू आणि काश्मीरचे उपमुख्यमंत्री राहिले आहेत. त्यावेळी लडाख जम्मू आणि काश्मीर राज्याचा एक भाग होता. प्राध्यापक आशिम कुमार घोष यांना हरियाणाचे १९ वे राज्यपाल बनवण्यात आले आहे. यापूर्वी बंडारू दत्तात्रेय हे राज्यपाल होते.

## शिवसेना पक्ष, धनुष्यबाण कुणाचा?

# ३ महिन्यांत निकालाचे संकेत

**२० ऑगस्टला पुन्हा सुनावणी**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**
सर्वोच्च न्यायालयात आज शिवसेनेच्या वादावर सुनावणी झाली. त्यात सुप्रीम कोर्टाने हे प्रकरण पुढील ३ महिन्यांत निकाली काढण्याचे स्पष्ट संकेत दिले. त्यामुळे शिवसेना हे नाव व धनुष्यबण हे निवडणूक चिन्ह कुणाचे? यावर ऑक्टोबर किंवा नोव्हेंबर महिन्यात फैसला येण्याची दाट शक्यता आहे.

दरम्यान, सुप्रीम कोर्टात जून २०२२ पासून शिवसेनेचा वाद प्रलंबित आहे. यावरील सुनावणी वारंवार पुढे ढकलण्यात येत असल्यामुळे मोठी नाराजी व्यक्त केली जात आहे.

शिवसेनेत २०२२ मध्ये मोठी बंडखोरी झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले होते. निवडणूक आयोगाच्या या आदेशांना उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते. त्यांच्या या याचिकेवर आज सुप्रीम कोर्टाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती जॉयमल्ल्या बागची यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

त्यात खंडपीठाने हे प्रकरण ऑगस्टमध्ये सुनावणीसाठी घेण्याचे संकेत दिले. तत्पूर्वी ठाकरे गटाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तोंडावर असल्यामुळे या प्रकरणी आजच सुनावणी घ्या असा आग्रह धरला. पण कोर्टाने आज प्रकरण ऐकण्यास स्पष्ट नकार दिला.

या प्रकरणी पुढील महिन्यात एखादी जवळची तारीख दिली जाईल, असे कोर्ट म्हणाले. त्यानंतर सायंकाळी कोर्टाने या प्रकरणी पुढील सुनावणीसाठी २० ऑगस्ट ही तारीख निश्चित केली.

दरम्यान, या प्रकरणात पुढील दोन ते तीन महिन्यात सुप्रिम कोर्टाचा निकाल येण्याची शक्यता असून, दोन्ही पक्षांच्या वकिलांनीही आज माध्यमांशी बोलतांना तसे संकेत दिलेत.

# राज्यात जलसंधारण क्षेत्रात ऐतिहासिक निर्णय

### ८६६७ पदांच्या भरतीला मंजुरी ● मंत्री संजय राठोड यांची विधानपरिषदेत घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
राज्यातील जलसंधारण कामांना वेग देण्यासाठी मृद व जलसंधारण विभागाने ८६६७ रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरू करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी आज विधान परिषदेत दिली.

२०१७ पासून रखडलेली भरती अखेर मार्गी

सन २०१७ मध्ये मृद व जलसंधारण विभाग स्थापन झाला, तेव्हा १६,४२३ पदांचा आकृतीबंध तयार करण्यात आला होता. ही पदे जलसंपदा व कृषी विभागांकडून वर्ग होणार होती. मात्र, विविध कारणांमुळे ही भरती रखडली होती.

मंत्री राठोड म्हणाले, राज्यातील बदलत्या परिस्थितीचा सखोल अभ्यास करून विभागाने नव्याने आकृतीबंध तयार केला. या आकृतीबंधातील ८६६७ पदांना उच्चस्तरीय समितीने मान्यता दिली असून लवकरच भरती प्रक्रिया सुरू होईल.

या निर्णयामुळे विभागाची कार्यक्षमता वाढून जलसंधारण कामांना वेग येणार आहे, तसेच राज्यातील सिंचन व्यवस्था बळकट होणार आहे, याचा थेट फायदा शेतकऱ्यांना मिळेल, असा आत्मविश्वास राठोड यांनी व्यक्त केला.

**प्रलंबित योजना रद्द**

**गरज भासल्यास पुनरावलोकन**

याचबरोबर मंत्री राठोड यांनी विधान परिषदेत आणखी एक महत्त्वाची घोषणा केली. ज्या योजनांना लोकांचा विरोध होता, वनजमिनीच्या कारणाने अडथळे होते, किंवा ज्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळूनही सुरूवात झाली नव्हती, त्या योजनांचा आढावा घेऊन त्या रद्द करण्यात आल्या आहेत. मात्र, भविष्यात गरज भासल्यास त्यांचे पुनरावलोकन करून निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



# विधीमंडळ अधिवेशन

## अनधिकृत बांधकामांना सरकार पाठीशी घालणार नाही : शिंदे



**मुंबई :** मुंबईतील अनधिकृत बांधकामांच्या विरोधात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सभागृहात बोलताना म्हणाले, मुंबई महापालिका आयुक्तांना निर्देश देतो की वेगवेगळ्या भागात जिथे अनधिकृत बांधकाम आहेत, त्याची यादी करा, त्याचे वर्गीकरण आपण करू आणि नियमानुसार कारवाई करू. एएमसी जर चुकीच्या पद्धतीने कोणाला प्रोटेक्ट करत असेल तर त्याची चौकशी करून कारवाई करू.

## 'चड्डी बनियान' शब्दावरून जुंपली



**मुंबई :** चड्डी बनियान शब्दावरून विधानसभेत आदित्य ठाकरे आणि नीलेश राणे या दोघांत चांगलाच कलगीतुरा रंगल्याचे पाहायला मिळाले. विधानसभेत बोलताना शेवटी आदित्य ठाकरे मुख्यमंत्र्यांकडे मागणी करताना म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी खूप सहनशीलता दाखवली आहे.

आता त्यांनी मुंबईकरांच्या मागण्या असतील, शहरातल्या मागण्या असतील आणि जे काही हे चड्डी बनियान गँगचे चालू आहे त्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. यानंतर शिवसेना शिंदे गटाचे नीलेश राणे यांनी चड्डी बनियान शब्दावरून आक्रमक पवित्रा घेतल्याचे पाहायला मिळाले. चड्डी बनियान शब्द रूलिंगमधून काढून टाकण्यात यावा, अशी मागणी राणे यांनी केली. तसेच हिंमत असेल तर चड्डी बनियान कोण हे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट करावे, असे ते म्हणाले.

## विधानसभेत गाजला ड्रगचा मुद्दा
### आमदार भुमरेंची कारवाई करण्याची मागणी



**मुंबई :** विधानसभेत आज छत्रपती संभाजीनगर येथील ड्रग्ज रॅकेटचा मुद्दा गाजला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी शिवसेनेचे आमदार विलास संदिपान भुमरे यांनी हा मुद्दा उपस्थित करत या प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. त्यावर राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः उत्तर देत यासंबंधीच्या कायद्याला विधिमंडळाची मंजुरी मिळाल्यानंतर निश्चितच अशा प्रकारची कारवाई केली जाईल अशी ग्वाही दिली. त्यामुळे भविष्यात ड्रग्ज प्रकरणातील आरोपींवर मकोका अंतर्गत कारवाई होणार हे स्पष्ट झाले आहे.

## चाकण पाणीपुरवठा प्रकल्पात घोटाळा



**मुंबई :** चाकण नगरपरिषदेमधील पाणीपुरवठा प्रकल्पात एकाच कामासाठी दोन वेगवेगळ्या योजना वापरण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे.

या प्रकरणाची विभागीय आयुक्तांमार्फत सखोल चौकशी करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिले.

या प्रकरणावर सदस्य भास्कर जाधव यांनी प्रश्न उपस्थित केला होता. यावर उत्तर देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, चाकण नगरपरिषदे अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानाच्या जिल्हास्तर योजनेतर्गत पाणीपुरवठा कामास २४ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रशासकीय मान्यता व १३ मार्च २०२४ रोजी कार्यादेश देण्यात आला होता. या कामाची मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढवण्यात आली होती. ठेकेदाराने अद्याप काम पूर्ण न केल्याने विलंबदंड वसूल करण्याची तरतूद चाकण नगरपरिषदेकडून करण्यात आली आहे,ह्वअशी माहितीही उपमुख्यमंत्र्यांनी दिली.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, या कामासाठी राज्यस्तर योजनेअंतर्गतही आदेश दिले गेले होते. याची माहिती मिळताच काम थांबविण्याच्या सूचना संबंधितांना देण्यात आल्या आहेत. मात्र, राज्यस्तर योजनेतून कोणतेही देयक अदा करण्यात आलेले नाही. या प्रकाराची विभागीय आयुक्तांमार्फत चौकशी केली जाईल आणि दोषींवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सभागृहाला दिले.

# प्रवीण गायकवाड हल्ला प्रकरण
# योग्य ती कारवाई होणार : मुख्यमंत्री

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:** सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट इथे सकल मराठा समाजाच्या कार्यक्रमासाठी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड गेले होते. तिथे त्यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आला. या प्रकरणाची माहिती मी स्वतः घेतली असून आरोपींनी संघटनेचे संभाजी नाव का ठेवले, छत्रपती संभाजी महाराज नाव का नाही ठेवले असा वाद करून शाईफेक करण्यात आली. या प्रकरणातील आरोपींना अटक करण्यात आली असून, आवश्यक ती कलमे लावण्यात येतील व योग्य ती कारवाई करण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिले.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना गाडीतून बाहेर खेचून पाडण्यात आले, काळे फासण्यात आले. हा त्यांचा जीव घेण्याचा प्रयत्न होता असा आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला.



संभाजी ब्रिगेडचे गायकवाड यांच्यावर अमानुषपणे हल्ला झाला. या प्रकरणी संबंधित आरोपी एका पक्षाचा कार्यकर्ता असून त्याची गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे. त्याच्यावर पिस्तूल बाळगण्याचा गुन्हा आहे, त्याने चुलत भावाची हत्या केली म्हणून तुरुंगवास ही भोगला आहे. एका पक्षाचा तो कार्यकर्ता आहे, ह्याच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे. हल्ला होणार यांचे इंटेलिजन्स नव्हते का? या कार्यक्रमात पोलिस बंदोबस्त का नव्हता? असा सवाल वडेट्टीवार यांनी स्थगनच्या माध्यमातून उपस्थित करण्याचा प्रयत्न केला.

गायकवाड हे निर्भिडपणे काम करत आणि त्यांच्यावर हा भ्याड हल्ला करण्यात आला आहे त्यामुळे कठोर कारवाईची मागणी वडेट्टीवार यांनी केली.

या विषयावर सभागृहात बराच वेळपर्यंत आरोपांच्या फैरी घडल्या . यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी सबंधित आरोपींना पोलिसांनी अटक केल्याची माहिती सभागृहाला दिली. तसेच या प्रकरणात योग्य कारवाई करण्याचे आश्वासन सभागृहात दिले.

## काळे फासणाऱ्या काटेकडे पिस्तूल

### रोहित पवारांचा दावा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाई फेकण्यात आली तसेच त्यांना धक्काबुक्की करत तोंडाला काळे फासण्यात आले होते. या घटनेचा विरोधकांनी जोरदार विरोध करत महायुती व भाजपवर टीका केली आहे. तसेच हा हल्ला ज्याने केला त्याच्याकडे पिस्तूल असल्याचा खळबळजनक दावा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे.




विधानसभा परिसरात रोहित पवार हे काळ्या रंगाचा शर्ट परिधान करून आले होते. तसेच त्यांनी एक फलक देखील सोबत आणला होता. या फलकावर दाभोळकर, पानसरे, गौरी लंकेश, कलबुर्गी यांचा फोटो होता.

यावेळी पत्रकारांशी बोलताना रोहित पवार म्हणाले, पुरोगामी विचारासाठी लढणारे प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकण्यात आली आहे. दीपक काटे नावाच्या भाजप कार्यकर्त्याने जे कृत्य केले त्याचा आम्ही निषेध करतो.

दाभोळकर, पानसरे, गौरी लंकेश, कलबुर्गी यांनी जो समाजाला जो विचार दिला तो त्यांना पटला नाही म्हणून त्यांची हत्या करण्यात आली.

आता प्रवीण गायकवाड जो पुरोगामी विचार घेऊन जात आहेत तो त्यांना पटला नाही म्हणून त्यांच्यावर शाई फेकण्यात आली. पुढे बोलताना रोहित पवार म्हणाले, या काटेकडे आधी पिस्तूल सापडले तसेच २८ जीवंत काडतुसे सापडली. प्रवीण गायकवाड लढणारे आहेत, ते घाबरणारे नाहीत. ते बाजूला जाऊन थांबले. परंतु, काटे प्रवीण गायकवाड यांना पुन्हा घेऊन आला. त्याच्याकडे बंदूक होती, अशी माहिती मिळाली आहे.

कुठेतरी गायकवाड यांना मारण्याचा प्रयत्न होता. त्या काटेने स्वतःच्या भावाला देखील सोडले नाही, त्याला सुद्धा मारले आहे, असा आरोप रोहित पवारांनी केला आहे.

## संभाजी ब्रिगेडवर कारवाईचे जनसुरक्षा बिलाद्वारे षडयंत्र

### प्रदेशाध्यक्ष मनोज आखरेंचा आरोप
### हल्लेखोरांचा काटा काढणार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:** संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे करण्यात आलेल्या हल्ल्याचा संभाजी ब्रिगेड राजकीय पक्षाने तीव्र निषेध केला आहे.

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष मनोज आखरे यांनी हल्लेखोर दीपक काटेवर कारवाईची मागणी केली असून, त्या काटेचा काटा आम्ही काढणार असल्याचा तीव्र इशाराही दिला आहे. तसेच नुकत्याच पास केलेल्या अर्बन नक्षलवादी बिलाद्वारे पहिली कार्यवाही संभाजी ब्रिगेडवर करायचे षडयंत्र असल्याचा आरोप मनोज आखरे यांनी सरकारवर केला. मुद्द्याची लढाई मुद्द्याने आणि गुद्द्याची लढाई गुद्द्याने लढणे हा संभाजी ब्रिगेडचा इतिहास असल्याचे म्हणत तीव्र शब्दांत इशारा दिला आहे.

प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झालेली घटना अत्यंत निंदनीय आहे. संभाजी ब्रिगेड ही शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचाराला मानणारी संघटना आहे. गेल्या २८ वर्षापासून महाराष्ट्रात वैचारिक चळवळीत प्रचंड मोठे परिवर्तन केले आहे. नुकतेच अर्बन नक्षलवादी बिल पास केले आहे. त्यानंतर पहिली कार्यवाही संभाजी ब्रिगेडवर करायचे षडयंत्र या सरकारने केले आहे. त्यामुळे या हल्ल्याकडे आपण वेगळ्या दृष्टीने बघितले पाहिजे. षडयंत्र रचून हा हल्ला केला आहे. प्रवीण गायकवाडांवर हल्ला करणाऱ्यावर तत्काळ कार्यवाही करत संभाजी ब्रिगेडला न्याय मिळवून दिला पाहिजे, असे ते म्हणाले.

## मनसे प्रमुख राज ठाकरेंवर
# गुन्हा दाखल करा
### डीजीपींकडे लेखी तक्रार दाखल



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४:** राज्यात सध्या सुरू असलेल्या मराठी-हिंदी भाषेच्या वादाच्या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात पोलिस महासंचालकांकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

वरळी येथील ठाकरे बंधूंच्या विजयी जल्लोष मेळाव्यात राज ठाकरे यांनी भडकाऊ भाषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. ही तक्रार अ‍ॅड. नित्यानंद शर्मा, अ‍ॅड. पंकजकुमार मिश्रा आणि अ‍ॅड. आशिष राय यांनी संयुक्तपणे केली आहे.

अ‍ॅड. नित्यानंद शर्मा, अ‍ॅड. पंकजकुमार मिश्रा आणि अ‍ॅड.. आशिष राय यांच्या म्हणण्यानुसार, सध्या महाराष्ट्रात परप्रांतीयांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर देशाची राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली असून, या प्रकाराला राज ठाकरे मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे त्यांच्या विरोधात राष्ट्रीय सुरक्षा अधिनियम अंतर्गत कारवाई करण्यात यावी, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. तसेच, मुंबईतील भाषणाच्या अनुषंगाने राज ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचीही मागणी पोलीस महासंचालकांना पत्राद्वारे करण्यात आली आहे.

मराठी ही महाराष्ट्राची प्रादेशिक भाषा असून तिचा सन्मान करणे हे प्रत्येक भारतीय नागरिकाचे कर्तव्य आहे. मात्र, अलीकडच्या काही दिवसांमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांकडून इतर राज्यांतून आलेल्या नागरिकांवर भाषेसंदर्भात मारहाण, अत्याचार व सार्वजनिक अपमानाच्या अनेक घटना घडत आहेत. ही परिस्थिती गंभीर असून राज्यातील सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेला धक्का देणारी व संविधानविरोधी ठरते.

५ जुलै रोजी मनसेचे राष्ट्रीय अध्यक्ष राज ठाकरे यांनी वरळी डोम, मुंबई येथे आयोजित जाहीर सभेमध्ये केलेल्या भाषणात भडकाऊ, द्वेषमूलक आणि उत्तेजक विधाने केली. विशेषतः, त्यांच्या भाषणात असा उल्लेख आढळतो की, परप्रांतीयांसोबत अशा कोणत्याही घटनेचा पुरावा म्हणून व्हिडिओ काढू नका, ही सूचना अत्यंत गंभीर असून पूर्वनियोजित गुन्ह्यांना सहकार्य करणारी व त्यांना प्रोत्साहन देणारी आहे. या विधानामधून पुरावे नष्ट करण्याचा अथवा लपवण्याचा उद्देश स्पष्टपणे दिसून येतो. त्यामुळे भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार हे गंभीर गुन्हे ठरतात, असे पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

राज ठाकरे यांच्या भाषणानंतर त्यांच्या पक्षाचे कार्यकर्ते अधिक आक्रमक झाले असून त्यांनी इतर राज्यांतून आलेल्या नागरिकांविरोधात आंदोलनात्मक कारवाया सुरू केल्या आहेत. या भाषणानंतर राज्यभरात अनेक ठिकाणी अशा घटना घडल्या, ज्यामध्ये इतर राज्यांतून आलेल्या व्यक्तींना मराठी भाषा बोलण्यास जबरदस्ती करण्यात आली. या प्रकारामुळे महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये सामाजिक तेढ निर्माण होत असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## गायकवाडांवरील हल्ल्याशी भाजपचा संबंध नाही

### मंत्री बावनकुळे यांची स्पष्टोक्ती

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४:** शिवधर्म फाउंडेशनचे दीपक काटे यांनी संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर शाई फेकून त्यांच्या तोंडाला काळे फासले होते.

मात्र, प्रवीण गायकवाड यांच्यावर हल्ला करणारा दीपक काटे हा भाजपचा सक्रिय पदाधिकारी असल्याचा आरोप होत आहे. याबाबत भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी याच्याशी भाजपचा काहीही संबंध नसल्याचे म्हटले आहे.

यासंबंधी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, प्रवीण गायकवाड यांच्यावरील हल्ल्याचा भारतीय जनता पक्षाशी काही संबंध नाही. अशा खालच्या पातळीवरचे कृत्य करणे हे भाजपच्या रक्तात नाही. प्रवीण गायकवाड यांच्याबाबत झालेल्या घटनेची पोलिसांनी चौकशी करायला



हवी. याच्याशी आमचा संबंध नाही. दीपक काटे हा भाजपचा कार्यकर्ता आहे. पण त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. तो कोणत्याही पक्षाचा असेल तरी तो आरोपी असल्याचे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. प्रवीण गायकवाड यांना अक्कलकोट मध्ये काळे फासण्यात आले होते. संभाजी ब्रिगेड संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना अक्कलकोट मध्ये काळे फासण्यात आले होते.

प्रवीण गायकवाड हे संभाजी ब्रिगेड संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आहेत. ते राज्यभर दौरे करत असतात. अक्कलकोट येथे एका कार्यक्रमाच्या निमित्ताने ते आले होते. या कार्यक्रम स्थळी त्यांचे स्वागत होत असतानाच ही घटना घडली. शिवधर्म फाउंडेशनच्या पदाधिका ?यांच्या वतीने प्रवीण गायकवाड यांच्यावर छत्रपती संभाजी महाराज यांचा एकेरी भाषेत उल्लेख करत असल्याचा आरोप केला होता. या घटनेमध्ये प्रवीण गायकवाड यांना मारहाण देखील करण्यात आली असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे घटना घडल्यानंतर प्रवीण गायकवाड आपल्या गाडीमध्ये बसले होते. मात्र त्यानंतर त्यांना गाडीतून बाहेर काढून देखील मारहाण करण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

## मंत्री उघडे नागडे फिरत आहेत..
# त्यांना कपडे द्या!



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:** सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या नोटांच्या बंडलांसोबतच्या व्हिडिओमुळे सत्ताधारी शिवसेनेची चांगलीच कोंडी झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधान परिषदेतील सदस्य अनिल परब यांनी सोमवारी या व्हिडिओ प्रकरणाची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली.

सध्या चड्डी -बनियन गँग किंवा चड्डी - टॉवेल गँगचे व्हिडिओ महाराष्ट्रभर फिरत आहेत. राज्याचे मंत्री उघडे - नागडे फिरत आहेत. त्यांना कपडे द्या. या प्रकरणाची एसआयटी चौकशी करा, असे ते म्हणालेत.

मंत्री संजय शिरसाट यांचा एक व्हिडिओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते कॉटवर उघडे बसून सिगारेट पित असताना दिसून येत आहेत. विशेषतः त्यांच्या जवळ एक पैशांची बॅग पडली असल्याचेही दिसून येत आहे. ठाकरे गटाने ही बॅग त्यांना मिळालेल्या ५० खोक्यांपैकी १ असल्याची टीका केली आहे.

या प्रकरणी त्यांच्यावर टीकेची झोड उठली असताना आता हा मुद्दा थेट विधिमंडळातही पोहोचला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अनिल परब यांनी सोमवारी हा मुद्दा व्धिान परिषदेत उपस्थित केला. तसेच या प्रकरणी योग्य ती कारवाई करण्याची मागणी केली.

अनिल परब म्हणाले की, सध्या चड्डी बनियन गँग किंवा चड्डी टॉवेल गँगचे व्हिडिओ सध्या महाराष्ट्रभर फिरत आहेत. या गँगचे व्हिडिओ विशेषतः एका मंत्र्याचे बेडरूममधील व्हिडिओ बाहेर येत आहेत. हे सगळे उघडे फिरत आहेत. त्यांना सरकारतर्फे एक-दोन कपडे तर द्या.

काय चाललंय महाराष्ट्रात? मंत्री उघडे नागडे फिरत आहेत. बेडरूमधला व्हिडिओ आला कसा बाहेर? बेडरूममधले व्हिडिओ बाहेर येत आहेत याचा अर्थ मंत्री सुरक्षित नाहीत. बेडरूममध्ये सूट घालून झोपा असे मी सांगितलेच नाही. पण तुमची यंत्रणा बेडरूमपर्यंत पोखरली गेली आहे असे मला सांगायचे आहे. डिझिटलायझेशन फ्रॉड हा थेट मंत्र्यांच्या घरापर्यंत गेला आहे. त्यामुळे मंत्रीच सुरक्षित नसतील तर सर्वसामान्यांचे काय हाल असतील? हे सांगणे न बरे. त्यामुळे याची उच्चस्तरीय चौकशी लावून आलेला व्हिडिओ खरा आहे की खोटा आहे, हे तपासण्यासाठी तो न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवा. त्यावर एसआयटी नेमा. सर्वप्रथम मंत्र्यांना सुरक्षा द्या. त्यानंतर जनतेला सुरक्षा द्या असे माझे २१८ च्या माध्यमातून म्हणणे आहे.

या प्रकरणी सभागृहात सविस्तर चर्चा घ्यावी. मंत्र्यांच्या सुरक्षेवर अडीच तासांची चर्चा ठेवा. कारण, आज मंत्रीच सुरक्षित नसतील तर सर्वसामान्य जनता काय सुरक्षित राहणार? म्हणून मंत्र्यांच्या आपण कोणत्या नियमाखाली आपण हा विषय घेणार याचे रुलिंग द्या, असे अनिल परब सरकारवर निशाणा साधताना म्हणाले.

गत आठवड्यात सत्ताधारी शिवसेनेचे बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांचा एक व्हिडिओ व्हायरल झाला होता. विशेष म्हणजे आमदार गायकवाड सदर कर्मचाऱ्याला मारहाण करत होते, तेव्हा त्यांच्या अंगावर बनियन व टॉवेल होती. त्यामुळे अनिल परब यांनी त्यांच्या या पेहरावाचा दाखला देत विधान परिषदेत राज्यातील मंत्रे उघडे फिरताहेत, त्यांना कपडे द्या, असे म्हटले.

# मोदींच्या स्वप्नपूर्तीसाठी योजना कधी लागू करणार?

### जयंत पाटलांचा प्रश्न : मुख्यमंत्र्यांचा टोला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४:** राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील यांनी विधानसभेत बोलताना डीबीटीचा मुद्दा उपस्थित केला.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून म्हटले की, डीबीटी करण्याचे जे पंतप्रधान मोदींचे स्वप्न आहे, ते साकारण्यासाठी अतिशय चांगली संधी आहे. ही योजना कधी सुरू करण्यात येणार? असा प्रश्न जयंत पाटलांनी उपस्थित केला. यावर मुख्यमंत्री टोला लगावत म्हटले, आजकाल जयंत पाटलांना मोदी साहेबांच्या योजना आवडायला लागल्या आहेत.

जयंत पाटील म्हणाले, प्रत्येकाच्या खात्यावर पैसे देण्याची योजना आता सुरू करावी. आता जर याची बेरीज केली तर आत्ता ६० लाख बेनेफिश्यरी आहेत. ३० लाख जे आहेत त्यांना दोन पेट्या वाटण्यात येतात. ६ हजारची पेटी २ हजारलाही कोणी घेणार नाही, जर आपण बाजारात बघितले तर. त्यामुळे अध्यक्ष महोदय तीन-साडे तीन हजार रुपयांच्या फरकाने आपण पेट्या खरेदी करतो आणि जे काही निकष आहेत टेंडरचे ते ठराविक लोकांनाच टेंडर मिळावे, असे निकष आखण्याचे काम गेले अनेक वर्ष चालू आहे.

पुढे बोलताना जयंत पाटील म्हणाले, माझा प्रश्न असा आहे की, हा गोंधळ महाराष्ट्रात इतका चालू आहे की आता एजंट चालू झाले आहेत. प्रत्येक तालुक्यात एजंट आहे. तुम्हाला आमकं मिळवून देतो, तुम्हाला पेन्शन मिळवून देतो. मुश्रीफ मंत्री असताना हे महामंडळ





निर्माण झाले आहे.

अध्यक्ष महोदय एवढा मोठा एजंटचा महाराष्ट्रात सुळसुळाट सुरू आहे. म्हणून माझी मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की पंतप्रधानांचे स्वप्न आहे की डीबीटी सुरू व्हावी, तर ही योजना सुरू करणार का? आणि जे एजंट सुरू झाले आहेत, यावर निर्णय घ्यावा.

**योजना आवडायला लागल्या**

जयंत पाटलांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर उत्तर देताना फडणवीस यांनी टोला लगावला. ते म्हणाले, जयंत पाटलांना मोदी साहेबांच्या सगळ्या योजना आवडायला लागल्या आहेत. आणि मोदी साहेबांच्या योजना लागू करा, असा आग्रह हा देखील मला स्वागतार्ह वाटतो, असे म्हणत फडणवीसांनी जयंत पाटलांना टोला लगावला.

पुढे ते म्हणाले, यात कामगारांच्या हिताचे काय आहे, पण आपण जे सांगितले आहे एजंट तयार झाले आहेत, तर माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी तयार करून या योजनेत जास्तीत जास्त कसे पारदर्शकपणा आणता येईल या संदर्भातला प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले आहे.

## स्टेम पोदार लर्न स्कूल, ब्रम्हपुरी येथे शिक्षक प्रशिक्षण सत्र

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** स्टेम पोदार लर्न स्कूलच्या वतीने शिक्षकांचे अध्यापन कौशल्य वाढविण्याच्या उद्देशाने व्यापक शिक्षक प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. या सत्राचे संचालन पोदार इंटरनॅशनल स्कूल, बेसा, नागपूरचे मुख्याध्यापक एस. एन. शाहू यांनी केले. क्रिएटिंग हार्मनी इन द क्लासरूम' या विषयावरील या प्रशिक्षण सत्रात शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. विविध संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून या सत्राने शिक्षकांना मौल्यवान अंतदृष्टी आणि शिकण्याच्या संधी उपलब्ध करून दिल्या.स्टेम पोदार लर्न स्कूलच्या मुख्याध्यापिका डॉ. भावना डोंगरदिवे यांनी आकर्षक व माहितीपूर्ण सत्र दिल्याबद्दल शाहूंचे आभार मानले.

## डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी येथे शाळाबाह्य विद्यार्थीनीला प्रवेश

**ब्रम्हपुरी, दि. १४ जुलै :** डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रम्हपुरी. येथे.चंद्रपूर जिल्ह्यात १ ते १५ जुलै दरम्यान शाळाबाह्य विद्यार्थी शोध मोहीम सुरू असल्यामुळे, शाळाबाह्य शोध मोहीम सर्वे करताना कोमल चंदू दांडेकर ही विद्यार्थिनी निदर्शनास आली. त्या विद्यार्थिनीला डॉ.आंबेडकर विद्यालय, ब्रह्मपुरी.येथे RTE Ac नुसार इयत्ता सातवी मध्ये वयानुरूप प्रवेश देऊन इयत्ता सातवीचे पाठ्यपुस्तक व गणवेश देण्यात आले. हा उपक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्ही.डब्ल्यू.नन्नावरे साहेब,पर्यवेक्षिका शेळके, तालुका समन्वय शाळाबाह्य ब्रह्मपुरीचे गट साधन केंद्राचे नरेश रामटेके , तसेच विद्यालयातील शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# निवडणूक विभाग व निर्वाचक गणाचे प्रारूप प्रभाग रचना प्रसिध्द

### जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक - २०२५.

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** चंद्रपूर जिल्हा परिषद क्षेत्रातील निवडणूक विभागाची व त्याअंतर्गत पंचायत समित्यांमधील निर्वाचक गणाच्या प्रारुप प्रभाग बाबतीत निवडावयाची सभासद संख्या निश्चित केलेली आहे. त्यानुसार जि.प. निवडणूक विभाग ५६ व पंचायत समिती निर्वाचक गणांची प्रभाग रचना ११२ करण्यात आली आहे.

वरीलप्रमाणे निश्चित केलेल्या निवडणूक विभाग व निर्वाचक गण रचनेचे प्रारूप परिशिष्ट ५ (अ) व ५ (ब) मधील अधिसूचना व अनुसूची तयार करून ती शासन राजपत्रात, १४ जुलै २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, पंचायत समिती कार्यालयील सूचना फलक / संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर प्रारूप प्रभाग रचनेवरील हरकती व सूचना २१ जुलै २०२५ पर्यंत जिल्हाधिकारी /संबंधित तहसीलदार यांच्या कार्यालयात स्वीकारण्यात येणार आहे, असे उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी यांनी कळविले आहे.

अशी आहे जिल्ह्यातील निवडायची सदस्य संख्या : सन २०११ च्या जनगणनेनुसार ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्या १४ लक्ष २३ हजार ३४९ आहे. अनुसूचित जातीची लोकसंख्या १ लक्ष ९८ हजार २८ असून अनुसूचित जमातीची लोकसंख्या ३ लक्ष १८ हजार ३७३ अशी आहे. जिल्ह्यातील जिल्हा परिषद निवडणूक विभाग ५६ व पंचायत समिती निर्वाचक गणांची प्रभाग रचना ११२ निश्चित करण्यात आली आहे. यात चिमूर (जि.प. सदस्य संख्या -५, पंचायत समिती सदस्य संख्या - १०), नागभीड (जि.प. सदस्य संख्या -४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८), ब्रम्हपुरी (जि.प. सदस्य संख्या -५, पंचायत समिती सदस्य संख्या - १०), सिंदेवाही (जि.प. सदस्य संख्या -४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८), भद्रावती (जि.प. सदस्य संख्या -४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८), वरोरा (जि.प. सदस्य संख्या -५, पंचायत समिती सदस्य संख्या - १०), चंद्रपूर (जि.प. सदस्य संख्या -५, पंचायत समिती सदस्य संख्या - १०), मूल (जि.प. सदस्य संख्या - ३, पंचायत समिती सदस्य संख्या - ६), सावली (जि.प. सदस्य संख्या - ४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८), पोंभुर्णा (जि.प. सदस्य संख्या - २, पंचायत समिती सदस्य संख्या - ४), गोंडपिपरी (जि.प. सदस्य संख्या -३, पंचायत समिती सदस्य संख्या - ६), बल्लारपूर (जि.प. सदस्य संख्या -२, पंचायत समिती सदस्य संख्या - ४), कोरपना (जि.प. सदस्य संख्या -४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८), जिवती (जि.प. सदस्य संख्या - २, पंचायत समिती सदस्य संख्या - ४) आणि राजूरा (जि.प. सदस्य संख्या -४, पंचायत समिती सदस्य संख्या - ८) अशी आहे.

# प्रा.आ. केंद्र भिसी येथे डेंगू आजार जनजागृतीला उत्तम प्रतिसाद



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. १४ जुलै :** सध्या पावसाळा सुरू असल्यामुळे डेंगू, मलेरिया, चिकन गुनिया, आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही, भिसी नगरपचायत यांच्या कचरा संकलन गाड्यांवर ध्वनी क्लिप द्वारे आवाहन करून आठ दिवसांपासुन जनजागृती करण्यात येत आहे,

मागच्या वर्षी पावसाळ्यात भिसी नगरपंचायत परिसरात एन एस- १ या डेंगू आजाराने थैमान घातले होते त्या अनुषंगाने प्रा आ केंद्र भिसी येथील आरोग्य कर्मचारी यावर्षी सतर्क झाले असून, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ, प्रकाश साठे व तालुका आरोग्य अधिकारी डॉ, मोहनीज गिरी यांच्या आदेशाने प् भिशीचे वैद्यकीय अधिकारी डॉ, कुंदन बावनकुळे व डॉ, प्रियांका कष्टी यांच्या मार्गदर्शनाने सर्व आशा वर्कर ह्या दररोज गावामध्ये तापाचे रुग्ण शोधणे व कंटेनर सर्वेक्षण करण्यात येत आहे, तसेच आरोग्य सेवक जे टी धानके यांनी आपल्या आवाजाने बनवलेली ध्वनी क्लिप कचरा संकलन गाडीवर लावून डेंगू आजाराचा प्रादुर्भाव वाढू नये याकरिता आवाहन करून जनजागृती करण्यात येत आहे,

यामध्ये डेंगू आजाराची लक्षणे एकाएकी तीव्र ताप, डोकेदुखी, अंगदुखी, सांधेदुखी, थकवा, मळमळ, उलटी, अंगावर पुरळ येणे,अशक्तपणा, भूक मंदावणे, हिरड्यातून रक्त येणे, तहान लागून तोंड कोरडे पडणे, इत्यादी लक्षणे जाणवत असतात

यासाठी डेंगू आजार उद्‌घावू नये म्हणून नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे, खबरदारीचे उपाय पुढील पमाणे ,, पाणी गाळुन, उकळून थंड करून प्यावे, दररोज रात्री झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा, घराच्या आजूबाजूला असलेले गाड्यांचे टायर, पाणी भरलेले मडके रिकामे करावे, घराशेजारी टाके, डबके ,खड्डे साचलेले पाणी वाहते करावे, घरातील फुलदाणी दिवसाआड स्वच्छ कराव्या, खिडक्यांना प्रतिबंधक जाळ्या बसवाव्या, घरातील पिण्याचे पाणी झाकून व्यवस्थित ठेवावे, नगर पंचायत मार्फत धूर फवारणी करावी, एक दिवस कोरडा पाळावा,

तरी डेंगू संदर्भात कोणतीही लक्षणे आढळल्यास जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात जाऊन डेंगू आजाराची तपासणी करून घ्यावी असे आवाहन चिमूरचे तालुका पर्यवेक्षक आशिष देशमुख व कीटक शास्त्रज्ञ संगीता तलमले यांनी केले आहे.

# छत्रपती नगर येथील योगभवनाच्या कामाचे आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** आमदार किशोर जोरगेवार यांनी प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेतर्गत तयार होणार असलेल्या छत्रपती नगर येथील कुमरे लेआऊटमध्ये मंजूर केलेल्या ५० लाख रुपयांच्या सुसज्ज योगभवनाच्या बांधकामाचा भूमिपूजन सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांना सुसज्ज आणि आरोग्यदायी योगाभ्यासासाठी भक्कम पायाभूत सुविधा उपलब्ध होणार आहेत. नियमित योगाभ्यासासाठी आधुनिक हॉल, स्वच्छ सुविधा आणि आवश्यक साहित्य या भवनात उपलब्ध राहणार आहे.

या वेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, जिल्हा खनिज प्रतिष्ठानचा निधी फक्त आकड्यांपुरता न राहता खरोखरच लोकांच्या हितासाठी वापरला जावा, हा आपला प्रयत्न आहे.

या योगभवनामुळे नागरिकांचे आरोग्य जपण्यासाठी मोठी मदत होईल. जिल्हा खनिज प्रतिष्ठानच्या माध्यमातून खनिज संपत्तीचा लाभ स्थानिक नागरिकांच्या विकासासाठी आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मिळावा, हीच आपली भूमिका आहे.

त्यामुळे आरोग्यदायी जीवनशैलीला चालना देणाऱ्या या उपक्रमासाठी निधी मंजूर करून कामाला गती दिली. या इमारतीत नागरिकांना नियमित योगाभ्यास करता येईल, महिलांना, तरुणांना आणि ज्येष्ठ नागरिकांना व्यवस्थित जागा आणि सुविधा मिळतील. शरीर आणि मन निरोगी ठेवण्यासाठी ही आधुनिक सुविधा मोलाची ठरेल, असे ते यावेळी म्हणाले.

### दत्त नगर येथील ४५ लाख रुपयांच्या विकासकामांचे उद्‌घाटन.

दत्त नगर येथे स्थानिक विकास निधीतून ४५ लाख रुपयांच्या खर्चाने उभारण्यात आलेल्या खुले रंगमंच, ओपन स्पेसचे सौंदर्यीकरण आणि कंपाऊंड वॉलच्या बांधकामाचा उद्‌घाटन सोहळा रविवारी आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते पार पडला. यावेळी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, माजी नगरसेवक सुरेश पचारे, महानगरपालिकेचे पवार, विजय चंदावार, सुधाकर श्रीपूरवार, कैलास रोडे, प्रा. प्रेमानंद खंडाळे, हरिदास कापटे, उमेश्वर आश्रम, प्रकाश कासार्लेवार आदींची उपस्थिती होती. या विकासकामांचा शुभारंभ उत्साहात झाला असून, परिसरातील नागरिक, स्थानिक मंडळी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सार्वजनिक उपयुक्ततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या विकासकामामुळे नागरिकांना सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी आधुनिक आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत. खुले रंगमंच आणि ओपन स्पेसमुळे विविध कार्यक्रम, मेळावे, सांस्कृतिक सादरीकरणे आणि सामाजिक उपक्रमांसाठी भक्कम पायाभूत सुविधा निर्माण झाली आहे.

# गाव खेडयातील विदयार्थ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप

### रंगला गुणवंत गौरव सोहळा.



**महासागर प्रतिनिधी**

**नागभीड, दि. १४ जुलै :** गाव खेडयातील गुणवंत जे निखळ मेहनत घेऊन विपरीत परिस्थितीत कौतुकास्पद शैक्षणिक वाटचाल करतात मात्र शाबासकीची थाप त्याच्या पाठीवर पडण्याचे सौभाग्य विरळच. मात्र ईश्वर-सखुमाई चव्हाण स्मृती प्रित्यर्थ गत ७ वर्षापासून मिंथूर येथील समाज मंदिरात आयोजीत गाव खेडयातील गुणवंत विदयार्थी गौरव सोहळा हृदयस्पर्शी ठरला. उपस्थित पाहुण्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले.

ईश्वर रखुमाई चव्हाण स्मृती प्रित्यर्थ चव्हाण परिवारांतर्फे मिंतूर आणि नवगाव या खेडेगावातील वर्ग दहावी आणि वर्ग बारावी प्राविण्य प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ दिनांक १२ जुलै २०२५ रोजी संपन्न झाला. शालेय वस्तू ,मोमेंटो , समान पत्र व रोख रक्कम देऊन त्यांचा गुणवंताचा गौरव करण्यात आला. या मधूर कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. संदीप गेडाम सहसंचालक(आरोग्य विभाग) हे होते तर गुणवंताना

भविष्याची दिशादर्शन करण्याकरीता विनोद छगनलाल भैया मुख्याध्यापक ने . ही. हायस्कूल नवेगाव पांडव, पा. महेश पानसे राज्य उपाध्यक्ष राज्य पत्रकार संघ अरुणजी चव्हाण सेवानिवृत्त शिक्षक बाळापुर , ॲड. शर्मिलाताई रामटेके माजी सरपंच नवेगाव पांडव हे होते. विशेष उपस्थिती सौ. विशाखा ताई डोंगरे सरपंच मिंथुर यांची होती. सर्व मान्यवरांनी मुलांना मार्गदर्शन करूनयशाचा व पगतीचा कानमंत्र दिला. यावेळी गाव खेडयातील गुणवंताच्या पाठीवर कौतुकाची थाप देण्याकरिता भीमरावजी उंदीरवाडे चंद्रपूर, शांताताई गेडाम नागपूर, निखिल शेंडे ब्रह्मपुरी हे प्रामुख्याने उपस्थित झाले होते. दोन्ही गावातील गुणवंतांचे पालक आवॅजुन उपस्थित झाले होते. कार्यक्रमाचे सुंदर संचालन शिक्षिका सौ. प्रियंका उंदीरवाडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजन पमुख रतिराम चव्हाण यांनी तर सर्वांचे आभार अंगद अरुण चव्हाण यांनी मानले. गत अनेक वर्षापासून चव्हाण परिवार गावापती, गाव परिसरापती आपले देणे गुणवंत विदयार्थ्यांचे पाठीवर शाबासकीची थाप देण्यासाठी सदर हृदयस्पर्शी कार्यक्रयाचे आयोजन करुन पार पाडतात. नवेगाव पांडव व मिंभूर येथील गावकरी, विदयार्थी या कौतुकाची उत्सुकतेने वाट बघताते विशेष.

## पिक विमा काढण्याचे शेतकऱ्यांना आव्हान.

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. १४ जुलै :** तालुक्यात मोठया प्रमाणात शेती केल्या जात असून या व्यवसायात अनेक जोखीम आहेत यात निसर्गाचे लहरीपणामुळे दुष्काळ, अतिवृष्टी, नैसर्गिक आपत्ती, वातावरणीय बदलाचे परिणाम व कीड - रोगांचा प्रादुर्भाव अश्या नानाविध संकटान्ना शेतकऱ्यांना तोंड देत शेती करावी लागते त्यामुळे शेतकऱ्यांची जोखीम कमी करून हमखास उत्पनाची हमी मिळण्याकरिता केंद्र शासनाने प्रधान मंत्री पिक विमा योजना लागू केली आहे. मागील काळात १ रुपयात पिक विमा काढण्याची योजना महाराष्ट्र शासनाने लागू केली होती त्यात शासन विमा हप्त्याची रक्कम शासनकडून भरू पिकांचा विमा उतरवीला जात होता. मात्र सन २०२५-२६ खरीप हंगामा पासून सादर १ रुपयात पिक विमा योजना बंद करून परत पूर्वीप्रमाणेच विमा हप्त्याचे २ टक्के रक्कम शेतकऱ्याला भरावी लागणार असून उर्वरित २ टक्के रक्कम शासन भरणार आहे. सदर योजनेत पिक कापणी प्रयोगावर आधारित विमा नुकसान दिल्या जाणार असून एकंदर महसूल मंडळाचे उंबरठा उत्पन्नाचे आधारे नुकसान परिगणना करून विमा मदत मिळणार आहे. सदर योजनेचा प्रचार प्रसार कारणे करीता कृषि विभाग प्रयत्नतर असून नुकतेचे सावली तहसील कार्यालयाचे प्रांगानातून तहसीलदार प्रांजली चिराडे यांचे प्रमुख उपस्थितीत प्रचार कार्यक्रमास सुरुवात करण्यात आले. प्रसंगी तहसीलदार व तालुका कृषि अधिकारी ललित राऊत तांनी पिक विमा योजणेबाबत माहीती देऊन यजनेचा लाभ घेण्याचे शेतकऱ्यांना आव्हान केले तसेच योजनेचे प्रचार प्रसार गावोगावी करणेबाबत उपस्थित कृषि कर्मचारी यांना निर्देश दिले. योजनेत सहभागी होने करीता शेतकऱ्यांनी फार्मर आय.डी. काढणे अनिवार्य असून पिक विमा काढणे करीता ७/१२, बँक पासबुक, आधार कार्ड व पिक पेरा प्रमाणपत्र घेऊन नजीकचे शेतू केंद्रात विमा हप्त्याची २ टक्के रक्कम भरून पिक विमा काढणे बाबत माहीती देण्यात आली.

### राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मुल तर्फे स्व.महेंद्र कोडापे यांच्या कुटुंबीयांना

# ५० हजार रुपयांची आर्थिक मदत

**▪ तालुका अध्यक्ष मंगेश पोटवार यांनी घेतला पुढाकार, माणुसकीचे जिवंत उदाहरण**



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. १४ जुलै :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री नाम.अजितदादा यानी सांगितलेल्या सामाजिक मार्गानुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यकर्त्यांच्या पाठीशी फक्त राजकीय दृष्टिकोनातूनच नाही, तर माणुसकीच्या नात्यानेही नेहमी उभा असतो, हे पुन्हा एकदा सिद्ध झालं आहे. अपघातात दुर्दैवी मृत्यू झालेल्या मूल येथील निष्ठावान कार्यकर्ते दिवंगत महेंद्र कोडापे आगडी यांच्या पत्नी श्रीमती नयनाताई महेंद्र कोडापे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे ५०,००० रुपयांची रोख मदत प्रदान करण्यात आली.

या मदतीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष मा.मंगेश भाऊ पोटवार यांनी स्वतः पुढाकार घेतला. दिवंगत कार्यकर्त्याच्या पत्नीला सन्मानपूर्वक मदतीची रक्कम सुपूर्त केली. त्यांच्या या संवेदनशील आणि आपुलकीने भरलेल्या कृतीमुळे उपस्थितांमध्ये भावनिक वातावरण निर्माण झाले. एका निष्ठावान कार्यकर्त्याच्या निधनानंतर पक्षाने दाखवलेली ही साथ म्हणजे एका कर्तव्यनिष्ठ कार्यकर्त्याच्या त्यागाला दिलेला नम्र सन्मान आहे.

दिवंगत महेंद्र कोडापे यांनी पक्षाच्या कार्यात नेहमी अग्रेसर राहून सहभाग घेतला होता. प्रत्येक आंदोलन,कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमात त्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता.त्यांच्या निधनाने पक्षाला मोठा धक्का बसला आहे, पण त्यांच्या पश्चात कुटुंबियांच्या दुःखात सहभागी होऊन राष्ट्रवादी काँग्रेसने माणुसकीचा खरा अर्थ जपला आहे.

या प्रसंगी बोलताना मंगेश पोटवार म्हणाले, महेंद्र कोडापे हे फक्त कार्यकर्ता नव्हते, तर आमच्या पक्षाचे एक खंबीर शिलेदार होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून काढणे कठीण असले तरी त्यांच्या कुटुंबाला आपण कधीही एकटं पडू देणार नाही.

पक्षाच्या या मदतीने कोडापे कुटुंबाला नवा विश्वास मिळाला आहे. उपस्थित कार्यकर्त्यांमध्ये देखील पक्षाच्या या माणुसकीच्या भावनेने एक वेगळीच ऊर्जा आणि बांधिलकी निर्माण केली आहे. 'पक्ष हा कुटुंब आहे', हे राष्ट्रवादी काँग्रेसने पुन्हा एकदा कृतीतून दाखवून दिले. यावेळी

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मुल शहराध्यक्ष आकाश येसनकर, दिव्यांग सेल जिल्हाध्यक्ष रोहित कामडे, महिला विधानसभा अध्यक्ष संगीताताई गेडाम,तालुका अध्यक्ष शीतलताई वाढगुरे,मूल महिला महिलांच्या मुल शहर अध्यक्ष धारा मेश्राम, ओबीसी आघाडीचे मुल तालुका अध्यक्ष वासुदेव पीपरे,माला शेंडे, सुवर्णाकक्षी रामटेके, रजत कुकडे, अल्पसंख्याक शहराध्यक्ष आशु खान, सोहेल भसारकर, शंकर पुरमशेट्टीवार,गौरव

# विद्यार्थ्यांच्या हाकेला दिव्यदीप फाऊंडेशनची मदत

### अभ्यासिकेला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन पुस्तके भेट




**महासागर प्रतिनिधी**

**ब्रम्हपुरी, दि. १४ जुलै :-** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या चांगल्या भविष्यासाठी गंभीर व्हावे तसेच त्यांनी शासन प्रशासनात मोठी भागीदारी निर्माण करावी यासाठी दिव्यदीप फाउंडेशन ब्रम्हपुरी कडून ज्ञानवाहिनी अभ्यासिका हळदाला विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पुस्तके त्यांच्या मागणीनुसार भेटस्वरूपाने देण्यात आले. यावेळी आयोजित छोटेखानी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून हळदा चे सरपंच दौलत गरमळे तर प्रमुख अतिथी म्हणून संजय लोणारे, लूमदेव खेवले,ज्ञानेश्वर झरकर,धनराज राऊत,सचिन बदन तसेच दिव्यदीप फाऊंडेशनच्या अध्यक्ष डॉ.स्निग्धा कांबळे हे सर्व मान्यवर उपस्थित होते.

डॉ.स्निग्धा कांबळे यांनी यावेळी आयोजित कार्यक्रमावेळी हळदा येथील ज्ञानवाहिनी अभ्यासिका निर्माण करणारे लोक ही कर्तबगार माणसे असून त्यांचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी संजीवनीच उपलब्ध करून दिली आहे. ग्रामीण विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधीचं सोनं कराव असे आवाहन केले. प्रशासकीय सेवेमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी आपली सेवा देण्याच स्वप्न नक्की साकार करतील असा आशावाद व्यक्त करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच तळागाळातील सर्वांसाठी काम करणे हा दिव्यदीपचा उद्देश असून त्याअणवय्ये आम्ही हा उपक्रम राबवत आहोत असे मत मांडले.

अध्यक्षीय भाषणात दौलत गरमळे यांनी शासनाच्या योजनांचा लाभ अभ्यासिकेसाठी मिळवण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन दिले.ज्ञानेश्वर झरकर यांनी हळदा गावातील अभ्यासिका भविष्यात वटवृक्षात रूपांतरित होईल अशी आशा व्यक्त केली.

संजय लोणारे व लुमदेव खेवले यांनी गावविकासासाठी सदैव तत्पर राहण्याची ग्वाही दिली. धनराज राऊत यांच्या शैक्षणिक कार्याची माहिती रुपेश काळबांधे यांनी आपल्या मनोगतातून दिली.प्रफुल्ल टेंभुर्णे यांनी अभ्यासाची भूक आणि पुस्तकांचे आयुष्यातील महत्त्व विषद करत विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवण्याचे आवाहन केले तसेच दिव्यदीप ने उपलब्ध करून दिलेल्या पुस्तकांसाठी आपल्या मनोगतात आभार व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संचालन व आभार मंगेश नंदेश्वर यांनी केले. यावेळी दिव्यदीप फाउंडेशन चे सदस्य नरेश राहाटे, संजय बिंजवे उपस्थित होते. गावातील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घेतला.

# जन सुरक्षा बिलात जनतेची सुरक्षा कुठे?

जन सुरक्षा बिल हे सर्वसामान्य जनता तर सोडा पण बऱ्याच शिकलेल्या लोकांना सुद्धां समजलेले नाही. नाव जरी जन सुरक्षा बिल असले तरीही सुशिक्षित, जागृत व सरकार विरोधात बोलणाऱ्या खऱ्या माणसाला गुलाम बनवण्याची प्रक्रिया म्हणजे जन सुरक्षा बिल. बर जनसुरक्षा बिल म्हणजे नेमकं काय? जन सुरक्षा बिलाचा फायदा कोणाला आणि कसा होणार याचे उत्तर आहेत का? एवढे कायदे असतांना जन सुरक्षा कायद्याची काय गरज? बरं चला विचार करूया. हुंडा बंदी कायदा, दारु बंदी कायदा अस्तित्वात असतांना हुंडाबंदी झाली का? अवैध दारू मिळणार नाही असे एखादे गाव असेल का? याचा जर विचार केला तर जन सुरक्षा बिल जनतेला नेमकं काय देणार आहे? जन सुरक्षा विधेयकाद्वारे जनतेची सुरक्षा नेमकी कोण आणि कोणा पासुन करणार आहे? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न कोणी करणार नाही. कारण बऱ्याच लोकांना प्रश्नच पडत नाहीत.

---------------

संविधानाने प्रत्येक माणसाची सुरक्षा करून ठेवली आहे. परंतु आजही संविधानाची योग्य अंमलबजावणी होत नाही म्हणून लोकांना संविधानीक सुख सुविधांचा लाभ मिळत नाही तो भाग वेगळा.

आपण संविधान समजून घेतले तर आपल्या लक्षात येईल की कलम क्रमांक १९ हे खुप महत्त्वाचे कलम आहे. कारण याच कलमा द्वारे प्रत्येक भारतीयांना कोणत्याही प्रकारचा भेद न करता अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिले आहे. अभिव्यक्ती स्वातंत्र्यात देशातील कोणताही व्यक्ती आपले मत भाषणातुन, लिखाणातुन निर्भीड पणे मांडू शकतो.

देशातील कोणतेही नागरिक कलम क्रमांक १९ अंतर्गत निःशस्त्र एकत्र येऊन सभा घेऊ शकतात, आंदोलन करू शतकात, सरकारच्या चुकिच्या ध्येयधोरणाचा निषेध करू शकतात, कलम १९ अंतर्गत देशातील कोणतेही नागरिक देशात संघटना स्थापन करू शकतात. थोडक्यात सांगायचे झाल्यास जनतेच्या हितासाठी हातात शस्त्र न घेता भाषण, लिखाण, सभा संमेलन, आंदोलन व सरकारच्या चुकिच्या निर्णयाच्या विरोधात आवाज उठवून सरकार वर दबाव निर्माण करण्याचे काम कलम क्रमांक १९ नुसार देशातील प्रत्येक व्यक्ती करू शकतो.

बरं जन सुरक्षा विधेयक जर बघितले तर त्यात जनतेची सुरक्षा कशी आणि कोणापासून होणार याचा उल्लेख आहे का? या कडे कोणाचे लक्षच नाही. जन सुरक्षा बिल हे व्यक्तीच्या विरोधात नसुन संघटनेच्या विरोधात आहे . राज्याचे मुख्यमंत्री म्हणाला. कोणत्या संघटना तर ज्या डाव्या विचारसरणीच्या आणि कडवट विचाराच्या आहेत आणि जे संविधान मानत नाहीत त्यांच्या विरोधात हा कायदा आहे.

असे असेल तर या कायद्याचे स्वागत करायलाच पाहिजे. कारण संविधान मानणे हे राष्ट्रीय कर्तव्यच आहे. नाही मानले तर देशद्रोह आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री खरचं प्रामाणिक असतील आणि त्यांना संविधान महत्वाचे वाटत असेल तर जनसुरक्षा विधेयका अंतर्गत सर्वात पहिली कार्यवाही भाजप पक्ष व आरएसएस संघटना यावर होईल.

अशोक स्तंभ हटवणे, संविधान बदलण्याची भाषा करणे, एवढेच काय तर असंविधानीक शब्दांचा वापर करणे, धार्मिक तेढ निर्माण होईल असे वक्तव्य करणे, हे भाजप व आरएसएसचे लोक करत असतात.

उदाहरणार्थ भारत अथवा इंडिया असे देशाचे नाव असताना हिंदुस्थान वापरणे देशद्रोहच आहे. बिजेपी आरएसएसचे लोक या शब्दाचा वापर करतात. संविधानाने शस्त्र शिवाय सभा रँलीची परवानगी दिली आहे हातात तलवारी घेऊन दहशत निर्माण करणारे संघटन कोणते आहे? हे त्यांना माहिती आहेच. मग यांच्यावर कारवाई होणार का? हा प्रश्न आहेच आणि याचे उत्तर सर्वांना माहिती आहे.



विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव, ता. मेहकर
९१३०९७९३००

जनसुरक्षा विधेयकामध्ये अजून एक तरतुद आहे आणि ती म्हणजे सरकार विरोधात अपप्रचार करणाऱ्यांवर कार्यवाही होणार. सरकार विरोधात बोलण्यावर लिहल्यावर जनतेवर कार्यवाही होत असेल तर मग सुरक्षा कोणाची? जनतेची की सरकारची?

सरकारने जनतेची कामे नाही केली तर लोकप्रतिनिधीवर कार्यवाही व्हायला पाहिजे अशी तरतूद पाहिजे असताना लोकांना सरकार विरोधात सरकारच्या चुकिच्या ध्येयधोरणाविरोधात बोलण्याचा अधिकार बंद करणे म्हणजे कलम क्रमांक १९ चे उल्लंघन करणे होय. कलम क्रमांक १९ चे उल्लंघन करणे संवैधानीक आहे का?

हजारो करोडो रुपये जनतेचे खर्च करून रस्ते बनण्याचे नाटक केले तरीही सरकार विरोधात बोलायचे नाही का? समृद्धी महामार्ग, मेट्रो, इतर ठिकाणचे अनेक रस्ते, फुल उद्घाटनाच्या काही दिवसातच खराब झाले. यालाच इमानदार सरकार म्हणायचे का?

प्रचंड खर्च करून पहिल्याच पावसात बांधकाम खराब होत असतील तर गरिबाच्या झोपड्या परवडल्या मग एवढा पैसा खर्च झाला कुठे? याला भ्रष्टाचार नाही का म्हणायचे?

एक व्यक्ती या विरोधात काही करू शकत नाही. परंतु संघटनेच्या माध्यमातून भ्रष्टाचार, राजकीय नेत्यांचे अनैतिक कृत्य यावर बोलले आंदोलने केले तर त्यांच्यावर सरकार विरोधी, नक्षलवादी संघटना म्हणून कार्यवाही होईल. हणजे जन सुरक्षा विधेयकाच्या माध्यमातून सरकारची सुरक्षा आहे.

एखाद्या संघटनेने देश विघातक, सामाजिक तेढ निर्माण करणारे कृत्य केले तर त्यांच्या वर कारवाई व्हायलाच पाहिजे मग ती संघटना कोणतीही असो. परंतु देशविघातक, सामाजिक तेढ निर्माण करणारे कृत्य याबद्दल स्पष्टता हवी आणि निरपेक्ष कारवाई हवी. पण मजीद तोडायला मी गेलो होतो म्हणणारा व्यक्ती सत्तेत असेल तर तो व्यक्ती खरचं निरपेक्ष वागु शकतो का?

जन सुरक्षा विधेयकात सरकार विरोधात, देश हिताच्या विरोधात कोणी व्यक्ती व संघटना कृत्य करत असेल तर त्याची संपती जप्त होणार म्हणजे जनतेची सुरक्षा आहे का? ज्या मतदारसंघात विकासच झाला नाही त्या लोकप्रतिनिधीची संपत्ती जप्त करून, उच्च स्तरीय चौकशी करून, भ्रष्टाचार उघड करून त्याला पुन्हा निवडून लढता येणार नाही अशा बिलाची खरं तर जनतेला गरज आहे. असे बिल आणले तर नेत्यांच्या घरात असलेला गोरगरीब लोकांचा पैसा बाहेर येईल आणि भ्रष्ट लोक घरी बसून राजकारणात शंभर टक्के नवीन लोक येतील.

सरकार व अधिकारी यांनी केलेला भ्रष्टाचार, नेत्यांनी केलेले बलात्कार, यावर जनतेने बोलले तर, जनतेने लोकप्रतिनिधी, प्रशासन यांना प्रश्न विचारले तर जनतेला संरक्षण पाहिजे असा कायदा पाहिजे असताना जनतेच्या नावाखाली भ्रष्ट सरकारची सुरक्षा करून जनतेला मात्र गुलाम बनवण्याचे काम सुरू आहे.

जन सुरक्षा विधेयक नाही तर जन गुलाम आणि लगाम विधेयक असुन याद्वारे सरकार विरोधात, सरकारने केलेल्या कामाविरोधात, शिक्षण रोजगार संदर्भात कोणाला काहीच बोलता येणार नाही. लिहता येणार नाही. मुख्यमंत्री लोकशाहीची चिंता असल्याचे भासवत आहेत. परंतु लोकशाही नष्ट करण्याचे काम त्यांच्या पक्षाने व संघटनेने केले हे ते सोईस्कर लपवत आहेत.

लोकशाही टिकवायची असेल तर सक्षम विरोधी पक्ष पाहिजे. यांनी देशात आणि राज्यात विरोधी पक्ष ठेवला काय? प्रसार माध्यमांनी विरोधी पक्षाची भुमिका बजावली पाहिजे पण प्रसार माध्यमे सरकारची प्रवक्ते झालेले असलेल्या ठिकाणी लोकशाही आहे असे कसे म्हणता येईल.

सर्वसामान्य व्यक्तीचा आरोप आहे इव्हिएमच्या माध्यमातून मताची चोरी होऊन नको ते लोक निवडून येतात म्हणून पेपर वर निवडून व्हायला पाहिजे ही जनतेची मागणी असताना, जनतेला पेपरवर निवडून घेण्यात सुरक्षा वाटत असताना सरकार इव्हिएम वर निवडून घेत असेल तर यात सुरक्षा आहे तरी कोणाची? जन सुरक्षा बिलाचे कायद्यात रुपांतर झाले तर इव्हिएम वर बोलताही येणार नाही विरोध करणे तर दुरच. कारण इव्हिएम वर बोलणे लिहणे म्हणजेच सरकार विरुद्ध अपप्रचार व संविधान विरोधी कृत्य माणल्या जाईल.

बिजेपी व आरएसएस करेल तेच संविधानीक व देशहिताचे आहे असे आज चित्र उभे केले आहे. बिजेपी व आरएसएसला विरोध म्हणजे धर्माला देशाला विरोध असे मानसिक रुग्ण तयार केले आहेत.

सरकार कोणतेही असले तरी विरोधी पक्ष, मिडिया आणि नागरिक सक्षम पाहिजे. परंतु आज विरोधी पक्ष नाही, मिडिया लाचार आहे, आणि जन सुरक्षा अंतर्गत विरोध करणाऱ्यां संघटनांची मुस्कटदाबी करून लोकशाही नाही तर हुकुमशाही मजबूत करण्याचे षडयंत्र केले जात आहे. कारण सुरक्षा जनतेची नसुन भ्रष्टाचार, इव्हिएम आणि अनैतिक कार्याची असेल हेच सत्य आहे.

(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)

■ ■ ■

# वेगळ्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बसवणे अयोग्यच

श्री गणेशाचे रूप कसे आहे? याचे यथोचित वर्णन श्री गणपती अथर्वशीर्षात आहे. गणेशचतुर्थीच्या निमित्ताने घरोघरी तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांत बसवण्यात येणाऱ्या गणेशमूर्तीही तशाच असायला हव्यात; मात्र प्रत्यक्षात असे घडताना दिसत नाही.

हल्ली बहुतांश सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमध्ये श्री गणेशाच्या मूर्तीपेक्षा सजावटीला अधिक प्राधान्य दिले जात असल्याने त्यानुरूप विविध वेशभूषेतील मुर्त्या आणल्या जातात. मुंबईतील काही मंडळांत भव्य गणेशमूर्ती हेच गणेशभक्तांचे आकर्षण केंद्र असल्याने काहीतरी वेगळे करायचे म्हणून दरवर्षी वेगवेगळ्या स्वरूपात आणि अन्य देवतांच्या, अवतारांच्या वेशभूषेत गणेशमूर्ती साकारल्या जातात.

गणेशमूर्ती बनवणाऱ्या कारखान्यांमध्ये फेरफटका मारला असता यंदाही अनेक गणेशोत्सव मंडळांनी छत्रपती शिवाजी महाराज, भगवान श्रीकृष्ण, प्रभू श्रीराम, भगवान श्री शंकर, श्रीविष्णू, स्वामी समर्थ, साईबाबा आदींच्या वेशभूषेत गणपतीच्या मूर्ती बनवण्यासाठी ऑर्डर्स दिल्या आहेत.

सर्व देवता आणि अवतार हे भक्तांचे कल्याण आणि दृष्ट प्रवृत्तीचा संहार करणाऱ्याच असल्या तरी प्रत्येक देवतेचे कार्य वेगवेगळे आहे, तसे त्यांचे उत्सवही वेगवेगळे आहेत, कृष्णजन्माष्टमीला आपण श्री गणेशाची मूर्ती घरी आणत नाही किंवा श्री रामनवमीला श्री गणेशाची शोभायात्रा काढत नाही मग श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशाला विविध वेषभूषांत का दाखवतो?

हिंदू धर्मातील प्रत्येक देवतेला विशिष्ट आकार आणि विशिष्ट वेशभूषा आहेत. त्यातून सिद्ध होणाऱ्या प्रतिमेतून अथवा मूर्तीतून त्या त्या देवतेचे तत्व आणि चैतन्य प्रक्षेपित होते असे धर्मशास्त्र सांगते. त्यामुळे मूर्तीला श्रीरामाच्या मूर्तीचा आकार दिला आणि शीर केवळ श्रीगणेशाचे लावले कि ती मूर्ती शत प्रतिशत श्रीगणेशाची होत नाही. कारण शरीराचे अन्य अवयव आणि वेशभूषा ही श्रीरामाचीच असणार आहे. त्यामुळे श्रीगणेशमूर्तीवर असे प्रयोग करणे योग्य नाही.

स्वामी समर्थांचे काही भक्त घरी स्वामींच्या वेशभूषेतील गणपती आणतात. साईबाबांचे भक्त साईबाबांच्या वेशभूषेतील गणेशमूर्ती बनवून घेतात तर छत्रपती शिवरायांचे कट्टर शिवभक्त चक्क छत्रपती शिवरायांच्या वेशातील गणेशमूर्ती बनवून घेतात.

अशा प्रकारच्या गणेशमूर्ती गणेशचतुर्थीच्या दिनी घरी आणणाऱ्याचा त्या त्या संतांविषयी आणि महापुरुषांविषयी श्रद्धेचा भाग असला तरी अशा प्रकारे आपल्या प्रतिमेला विघ्नहर्त्या श्रीगणेशाच्या स्वरूपात दाखवणे स्वामींना किंवा छत्रपती शिवरायांना कधीतरी आवडले असते का, याचा विचार का करत नाहीत.

घरातील बच्चे कंपनीवर कार्टून विश्वातील पात्र, सुपरमॅन, बॅटमॅन यांसारख्या व्यक्तीरेखा यांचा प्रभाव मोठ्या प्रमाणात असतो त्यामुळे त्यांना खुश करण्यासाठी या पात्रांच्या रूपात गणेशमूर्ती साकारण्याच्या ऑर्डर्स पालकांकडून दिल्या जातात.

अशा काल्पनिक पात्रांच्या वेशात श्रीगणेशाला साकारणे हा श्रीगणेशाचा अवमान नव्हे का ? गणेश चतुर्थीच्या दिवशी घरी आणल्या जाणाऱ्या गणेशमूर्तींच्या माध्यमातून साक्षात श्रीगणेशच आपल्या घरी अवतरणार आहेत. जोपर्यंत ते आपल्या घरी विराजमान आहेत तोपर्यंत त्यांची आपल्याला मनोभावे सेवा करायची आहे.

हा भाव २४ तास जागृत राहण्यासाठी श्रीगणेशमूर्तीही शास्त्रात सांगितल्याप्रमाणे चौरंगावर किंवा आसनावर विराजमान असलेली हवी. वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या स्वरूपातील श्रीगणेशाला १० दिवस पुजून अनंत चतुर्दशीला या पुजलेल्या मूर्तीचे जेव्हा आपण विसर्जन करतो तेव्हा हे विसर्जन नेमके श्री गणेशाच्या मूर्तीचे होते कि अन्य देवता, संत आणि महापुरुष यांच्या मूर्तीचे? याचा विचार अशा मुर्त्या घरी आणणाऱ्यांनी करायला हवा.

काही मंडळांमध्ये किंवा घरच्या सजावटींमध्ये श्री गणेशमूर्तीला चलचित्राच्या स्वरूपात दाखवले जाते, काही ठिकाणी पेटित पैसे टाकल्यावर श्रीगणेशमूर्ती उभी राहून पैसे टाकणाऱ्याला लाडूचा प्रसाद देतानाचे प्रयोजन केलेले असते. फळांपासून, सुक्यामेव्यापासून, चॉकलेटपासून गणेशमूर्त्या बनवल्या जातात. हासुद्धा श्रीगणेशाचा अवमानच आहे.

गणेशोत्सवाच्या दरम्यान काही कंपन्या व्यावसायीक हेतूने श्रीगणेशाचा वापर आपल्या जाहिरातींमध्ये करतात. अशांवर गणेशाची कृपा होईल का? आपल्याला पुरेसे धर्मशास्त्र ज्ञात नसल्याने धार्मिक सणांच्या आणि उत्सवांच्या बाबतीत 'मला सर्व कळते' या विचाराने आपण हवे तसे वागतो, हवे तसे करतो. धार्मिक सण शास्त्रीय दृष्ट्या कसे साजरे करावेत याबाबतचे लिखाण ऋषीमुनींनी प्राचीन धर्मग्रंथांत हजारो वर्षांपूर्वीच मांडून ठेवले आहे. ते तसे साजरे केल्याने मनुष्याला उचित लाभ होतो आणि आनंदही मिळतो.

याउलट आपण आपल्याच मनाप्रमाणे कारण्याचा प्रयत्न केल्यास लाभ तर होणार नाही उलट हानीच होण्याचा अधिक संभव असतो.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

■ ■ ■

## वाचक लिहितात

### अविस्मरणीय क्षण...

संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना अर्थात युनेस्कोने छत्रपती शिवाजी महाराजांचे बारा गडदुर्ग जागतिक वारसा स्थळांच्या यादीमध्ये समाविष्ट केले आहेत. ही संपूर्ण महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे. सतराव्या ते एकोणिसाव्या शतकामध्ये बांधले गेलेल्या दुर्गांपैकी अकरा दुर्ग महाराष्ट्र तर एक दुर्ग तमिळनाडूमध्ये आहे.

पॅरिसमध्ये झालेल्या युनेस्कोच्या जागतिक वारसा समितीच्या सत्तेचाळीसाव्या बैठकीमध्ये हे घोषित करण्यात आले. याला मराठा मिलिटरी लँडस्केप असे नाव देण्यात आले आहे. यामुळे मराठा इतिहास आणि वारसा यांना आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आहे.

आतापर्यंत भारतातील एकूण चव्वेचाळीस वारसा स्थळे जागतिक वारसा सूचीमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या गडदुर्गांचा ऐतिहासिक असा आंतरराष्ट्रीय स्तरावर अधोरेखित झालेला आहे. भारतासाठी हा गौरवाचा क्षण आहे.

असे असले तरी युनेस्कोने दिलेला जागतिक दर्जाचा वारसा कायमस्वरूपी टिकून राहण्यासाठी काही निकषांचे पालन करणे आवश्यक आहे. या निकषांचे पालन न केल्यास युनीस्कोला हा दर्जा काढून घेण्याचे अधिकार आहेत. यासाठी हा दर्जा कायमस्वरूपी टिकून राहावा म्हणून गडदुर्गांचे संवर्धन आणि देखभाल करणे हे आता सरकारचे दायित्व आहे. गडदुर्गांवरील अनधिकृत बांधकामे तात्काळ काढून टाकण्याचा निर्णय लवकरात लवकर घ्यायला हवा. राज्यसरकारने उपलब्ध निधीमधून गडदुर्गांचे संवर्धन आणि देखभाल करावी आणि गडदुर्गांची होत असलेली दुर्दशा थांबवण्यासाठी शासनाने आणि दुर्गप्रेमींनी प्रयत्न करावेत. तरच छत्रपती शिवाजी महाराजांचे ऐतिहासिक वैभव या जगासमोर येईल.

■ भीमराव साळुंखे

### जगात मुस्लिम लोकसंख्येचा विस्फोट होणार!

संपूर्ण जग आज तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे आहे. कधी युद्धाचा भडका उडेल हे सांगता येत नाही. राक्षशी महत्वकांक्षा, विस्तारवादी वृत्ती, व्यापार युद्ध म्हणजे आर्थिक गणितं यामुळे संपूर्ण जग होरपळत असताना, त्यात आतंकवादाचे चटकेही जग रोज सोसतच आहे. अशा सर्व स्फोटक परिस्थितीत अमेरिकेच्या प्यु रिसर्च सेंटरच्या अहवालाने जगाची झोप उडवली आहे.

या सेंटरच्या अहवालानुसार जगात मुस्लिम लोकसंख्येचा विस्फोट होणार आहे. २०१० ते २०२० पर्यंतच्या अभ्यासावरून काढलेल्या निष्कर्षात या दहा वर्षात मुस्लिम लोकसंख्येत ३४.७ कोटींनी वाढ झाली आहे. त्यामुळे इस्लाम हा जगातील सर्वात वेगाने वाढणारा धर्म ठरला. संपूर्ण जगातले मुस्लिम साधारण १५ ते ४९ या वयोगटातील आहेत. जगात हिंदूंची संख्या १.२ अब्ज आहे. भारतात मुस्लिमांची १४.३ टक्क्यांवरून १५.२% झाली.. आहे. म्हणजेच भारतातल्या मुस्लिम लोकसंख्येमध्ये ३.५६ कोटींची वाढ झाली आहे. मात्र गेल्या दहा वर्षात हिंदूंच्या प्रमाणात १% घट झाली आहे.

मुस्लिम समाजातील लोकसंख्या जलद गतीने वाढण्याचे कारण म्हणजे त्यांची सरासरी तरुण लोकसंख्या आणि अधिक प्रजनन दर असल्याचे अहवालात नमूद केले आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारत हा आधीच जगात पहिल्या क्रमांकावर आहे. अशा परिस्थितीत भारतातील लोकसंख्या (विशेषतः मुस्लिमांची) अशीच वाढत राहिली तर, भविष्यात नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास तर होईलच पण अन्नधान्याचा तुटवडा आणि प्रचंड बेरोजगारीला आळा घालण्याचे मोठे आव्हान आपल्यासमोर असेल.

जगात भारत मुस्लिम लोकसंख्येचा सर्वात मोठा देश होणार .भारताने या अहवालाकडे दुर्लक्ष न करता त्वरित कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. सध्या आपल्या देशात हिंदू जोडप्यांचा सर्वसाधारणे एकच मूल हवे चा नारा आहे. परंतु या पुढची पायरी सुद्धा काही उच्च विभूषित जोडप्यांमध्ये, कलाकार मंडळीत दिसून येते, ती म्हणजे मुलच नको. करिअरच्या नावाखाली चैनी वृत्ति दिवसेंदिवस वाढत चालली आहे. स्वार्थापुढे देशहित नगण्य अशी मानसिकता आहे .आपल्या या मानसिकतेचे भविष्यात किती भयावह परिणाम दिसतील याचा विचार केला का ?

■ सौ. माधवी पत्की
नागपूर.

# आता दुसऱ्या पायरीच्या न्यायाची प्रतिक्षा!

२ जुलै २०२५ हा महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण क्षेत्रातील एक ऐतिहासिक आणि क्रांतिकारी दिवस! मागील पंचवीस वर्षांपासून एम.फिल. अर्हता धारक प्राध्यापकांचा प्रलंबित प्रश्न अखेर निकालात निघाला आणि तब्बल १४२१ प्राध्यापकांना NET/SET पासून सूट देण्यास विद्यापीठ अनुदान आयोगाने (युजीसी) मान्यता दिली.

ही सवलत त्यांच्या एम.फिल. अर्हता संपादन दिनांकापासून लागू राहणार आहे. हा निर्णय केवळ धोरणात्मक नाही, तर अनेक दशकांपासून अन्याय सहन करत असलेल्या प्राध्यापकांच्या सन्मान, व्यावसायिक स्थैर्य आणि मानसिक समाधानाची पुनर्प्राप्ती आहे.

१९९३ पूर्वीच्या काळात एम.फिल. ही अर्हता प्राध्यापक पदासाठी ग्राह्य मानली जात होती. त्यानंतरचा काळ विशेषतः १४ जून २००६ ते ११ जुलै २००९ या कालावधीत नेमले गेलेले प्राध्यापकही या सवलतीस पात्र होते. मात्र १९९४ ते २००९ या दरम्यान एम.फिल. मिळवून कार्यरत असलेल्या प्राध्यापकांसाठी हा कालखंड अजब विसंगतींचा ठरला.

या गटातील शेकडो प्राध्यापकांना NET किंवा SET परीक्षा न दिल्यामुळे नोकरी टिकली असली, तरी पदोन्नती, निवड श्रेणी, वेतनवाढ, सातवा वेतन आयोगाचे लाभ, सेवा शुद्धीकरण आदी बाबतीत या तांत्रिक अडचणी, व्यवस्थेतील विसंगती आणि धोरणातील अपवादांमुळे अनेक प्राध्यापकांची कारकीर्द अर्धवट वाटचाल करणारी ठरली होती.

ही परिस्थिती केवळ कारकीर्द रोखणारी नव्हती, तर ती मानसिकरीत्या उद्विग्न करणारी ठरली. अनेक प्राध्यापकांनी आपल्या सहकाऱ्यांच्या वेगाने होत गेलेल्या पदोन्नतीकडे पाहताना निराशेचे पाणी गिळले. अशा अनामिक शेकडो शैक्षणिक कुटुंबांची सामाजिक प्रतिष्ठा आणि आत्मविश्वास या विसंगतीच्या विळख्यात अडकून पडला होता.

सत्य पाठपुराव्याचे पडद्यामागील संघर्ष

२५ वर्षाच्या काळात याआधीही अनेक संचालक आले-गेले, संघटनांनी ठरवलेले कार्यक्रम झाले, चर्चा रंगल्या, मात्र वास्तविक कृती फारच थोड्यांची झाली. यामध्ये उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळांकर यांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांची न थकणारी राजकीय इच्छाशक्ती निर्णायक ठरली.

ज्यांनी या विषयात वैयक्तिकरित्या हा विषय लाऊन धरला या प्रक्रियेला धोरणात्मक दिशा देणारे प्रा. डॉ. एस. पी. लवांडे अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राध्यापक संघटना आणि प्रा. डॉ. पी. बी. रघुवंशी नुटा अध्यक्ष तथा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य प्राध्यापक संघटना यांनीही वेळोवेळी संचालक,मुख्यमंत्री, सचिव, मंत्री यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून विषय लावून धरला. त्याची परिणीती म्हणन एम.फिल. अर्हता धारक प्राध्यापकांना मिळालेला ऐतिहासिक न्याय मिळाला.

**श्रेयवाद नव्हे, कृतीवाद हवा !**

एखाद्या ऐतिहासिक निर्णयानंतर श्रेयासाठी चढाओढ होणे हे नवे नाही. या निर्णयानंतरही, ज्यांचा या लढ्याशी दुरदूरचा संबंध नव्हता, त्यांनी हे आमच्यामुळे घडले असे जाहीर करण्यास विलंब केला नाही.

अशा वेळी ग्रामीण म्हण आठवते, त्यात म्हटलं जात होत हौसे, नवशे, गवसे श्रेय घेत आहे. तेव्हा असे म्हणावसे वाटते की, मेहनत करे मुर्गा, अंडा खाए फकीर ही म्हण येथे लागू होते.

काहीजण ज्यांचा या लढ्याशी संबंधही नाही, त्यांनी हे आमच्यामुळे घडले असे सांगण्याची घाई केली. या पार्श्वभूमीवर सत्य म्हणजेच श्रेय योग्यतेने ओळखणे गरजेचे ठरते. संघर्ष करणाऱ्यांचा सन्मानच त्या निर्णयाला खरी श्रद्धांजली ठरत आहे.

या प्रश्नाला वैधानिक मान्यता मिळवून देण्यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न झाले. हा निर्णय म्हणजे फक्त सुट नाही, तर व्यवस्थेमधील विसंगती दूर करण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे. मात्र, निर्णयानंतर लगेच काही प्रश्न उद्भवत आहेत.

**शासनाने आता पुढील गोष्टी स्पष्ट कराव्यात :**

१. एम.फिल. प्राप्तीच्या तारखेपासून सूट प्रभावी असेल, याबाबत स्पष्ट निर्देश तातडीने द्यावेत. तो निर्णय ५ व्या,६ व्या वेतन आयोगानुसार देणार काय किवा कसे?

> हा निर्णय म्हणजे नक्कीच एक विजय आहे, पण तो अर्धवट राहता कामा नये. सर्व प्राध्यापकांनी पुन्हा नव्याने कार्यालयांचे उंबरठे झिजवावेत, असे होऊ नये. शासनाने प्राध्यापकांचा आत्मसन्मान राखून तातडीने पुढील निर्णय जाहीर करावा. राजकीय श्रेयवादापेक्षा व्यवस्थात्मक निर्णयक्षमतेला प्राधान्य दिल्यासच शिक्षणव्यवस्था खऱ्या अर्थाने सशक्त होईल, हे मात्र निर्विवाद सत्य आहे! खरे काम करणाऱ्यांचा सन्मान होणे गरजेचे आहे, कारण सच्चा संघर्ष कधीही मूळ विसरू देत नाही.
>
> **प्राचार्य. सुभाष गवई**

२. या निर्णयामुळे स्थान निश्चिती व पदोन्नती कशा प्रकारे ठरवण्यात येतील, यासाठी सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात.

३. सातव्या वेतन आयोगाच्या लाभांमध्ये ही सवलत कशी आणि कुठून प्रभावी होईल, याबाबत कार्यवाही आराखडा जाहीर करावा.

४. संपूर्ण न्याय म्हणजे केवळ सूट नव्हे, तर त्याचे आर्थिक, प्रशासकीय आणि सेवाविषयक लाभही अंमलबजावणीत निश्चितपणे दिसले पाहिजेत.

या बाबींची त्वरित अंमलबजावणी होण्यासाठी शासनाने एकच ठोस शासन निर्णय काढणे गरजेचे आहे. संचालक कार्यालयाने त्यानुसार अंमलबजावणीचे आदेश दिल्यासच हा निर्णय खऱ्या अर्थाने यायकारी ठरेल.

शेवटी एवढेच म्हणता येईल की, एम.फिल. धारकांना मिळालेला हा निर्णय म्हणजे सामूहिक इच्छाशक्ती, सातत्यपूर्ण संघर्ष आणि दूरदृष्टीपूर्ण राजकीय नेतृत्वाचा विजय आहे. परंतु, न्यायाचा दुसरा टप्पा म्हणजेच पदोन्नती, वेतनवाढ, स्थान निश्चिती, सेवा शुद्धीकरण आणि सातवा वेतन आयोगाचे लाभ हे सर्वही तितक्याच स्पष्टतेने, पारदर्शकतेने आणि तत्परतेने दिले गेले पाहिजेत.



प्रा. डॉ. प्रशांत विघे
राज्यशास्त्र विषयाचे लेखक
भारतीय महाविद्यालय,
अमरावती.
९३२६८७७७४९

# उपाशी पोटी चहा प्यायल्याने ॲसिडिटी वाढते का?



भारतीय आणि चहाचं रोजचं नातं आहे. चहा शिवाय अनेकांची दिवसाची सुरुवात होत नाही.

सकाळी उठल्यावर चहाचे दोन घोट घेतल्यानंतर फ्रेश वाटतं. त्यामुळे अनेक जण सकाळी उठल्याबरोबर चहाचा कप तोंडाला लावतात. पण उपाशी पोटी चहा प्यायल्याने आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतो माहिती आहे का?

यामुळे पोटात आम्लता वाढते. यामुळे पचनक्रियेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे तुम्हाला चहा पिण्याची सवय असेल तर काही गोष्टी लक्षात ठेवणं आवश्यक आहे. जर या नियमांचं पालन केलं तर नक्कीच आरोग्याचं नुकसान होणार नाही.

एम्स दिल्लीत गॅस्ट्रोलॉजी विभागाच्या माजी डॉ. अनन्य गुप्ता यांच्या मते, जेव्हा तुम्ही झोपेतून उठता तेव्हा तुमचा पोट रिकामी असतं. यामुळे पोटात गॅस्ट्रिक ज्यूस म्हणजेच ॲसिड अधिच सक्रिय असते. अशा वेळी तुम्ही जर चहा (दूध असलेला चहा) घेता तेव्हा ॲसिड वाढतं. त्यामुळे ॲसिडिटी, पोटात जळजळ, गॅस आणि ब्लोटिंगसारखी समस्या होते.

चहामध्ये कॅफीन आणि टॅनिन असते. त्यामुळे पचन प्रक्रिया खराब होऊ शकते. टॅनिनमुळे पचनप्रक्रिया मंद होते आणि भूक मरते. यामुळे उपाशी पोटी चहा घेतल्याने नैसर्गिक प्रक्रियेला नुकसान होऊ शकतं. यामुळे गॅस्ट्रिक समस्या वाढण्याची शक्यता असते.

सकाळी चहा प्यायल्याने पोट भरल्यासारखं वाटतं. तसेच आंबट ढेकर आणि गळ्यात जळजळ होते. भूक लागत नाही आणि जेवायची इच्छा राहात नाही. दुपारपर्यंत पोटात गॅस आणि ब्लोटिंग राहते. जर अशी लक्षणं वारंवार दिसत असतील तर सकाळचा चहा तुमच्यासाठी चांगला नाही.

पोषण तज्ज्ञांच्या मते, जर सकाळी रिकाम्या पोटी चहा पिण्याची सवय बराच काळ राहिली तर त्यामुळे पोटातील तीव्र आम्लता आणि जठराची सूज यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात. ॲसिडिटीपासून वाचण्यासाठी चहा पिण्यापूर्वी काहीतरी खा. भिजलेले बदाम, केळं किंवा सुखा टोस्ट खा. चहासाठी पर्याय शोधा. हर्बल किंवा ग्रीन टी प्या. यामध्ये कॅफीनचं प्रमाण कमी असतं. सकाळी कोमट पाणी किंवा लिंबू पाणी पोट शांत करतं. जर चहा प्यायचाच झाला तर नाश्ता करताना किंवा केल्यानंतर प्या.

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### वाढती लोकसंख्या

कुऱ्हाडीचा दांडा
जसा गोत्यास काळ
अतिरीक्त लोकसंख्या
आमची कर्दनकाळ ..

वाढत्या लोकसंख्येने
देश झालाय त्रस्त
म्हणून तर वाढलय
बेकारीचं प्रस्थ..

बेकारी, दारिद्रय
अनाचार, भ्रष्टाचार
अतिरिक्त लोकसंख्येचे
आहेत मुलाधार..

हिंदू खिश्चन की
असो मुसलमान
हम दो हमारे दो
राबवा अभियान ..

# फ्लिपकार्टकडून फूड फेस्ट २.0 मध्ये गॉरमेट फूड डिस्कव्हरीचा उत्सव

**बंगळुरू, १४ जुलै :** भारतातील देशांतर्गत ई-वाणिज्य बाजारपेठ असलेल्या फ्लिपकार्टने फूड फेस्ट २०२५ च्या दुसऱ्या आवृत्तीचे यशस्वीरित्या आयोजन केले. हा भारताच्या विकसित होत असलेल्या खाद्य संस्कृतीचा एक अद्वितीय उत्सव आहे. या कार्यक्रमाचे आयोजन ८ आणि ९ जुलै रोजी बेंगळुरूमधील फ्लिपकार्ट कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आले होते. हा महोत्सव ५ जुलै ते १० जुलैदरम्यान क्युरेटेड सेलद्वारे ऑनलाइन विस्तारित करण्यात आला. त्यामुळे ग्राहकांना उत्कृष्ट ब्रँड्समधील गोरमेट फूड कलेक्शन, नवीन उत्पादने आणि मर्यादित काळासाठी ऑफर्सची सुविधा मिळाली. या कार्यक्रमाने देशभरातील प्रसिद्ध शेफ, सर्वोत्तम क्रिएटर्स, ख्यातनाम ब्रँड आणि खाद्यप्रेमींना एकत्र आणले. त्यामुळे भारतातील गोरमेट फूड डिस्कव्हरी आणि कॉमर्सचे भविष्य घडवण्याच्या फ्लिपकार्टच्या वचनबद्धतेची खात्री झाली.

फ्लिपकार्ट फूड फेस्ट २.0 मध्ये प्रचंड प्रमाणात गर्दी झाली. या वेळी २५,000 हून अधिक लोकांनी भेट दिली, ४0+ एंगेजमेंट झोन, १0 ब्रँड लाँच, ३0+ ब्रँड शोकेस, १00 दशलक्षाहून अधिक ऑनलाइन इंप्रेशन आणि भेटी आणि इन्फ्लुएन्सर्स आणि उपस्थितांनी तयार केलेल्या १000 हून अधिक मूळ कंटेंटचाही समावेश होता. गॉरमेट फूड डिस्कव्हरी आणि ब्रँड व्हिजबिलिटीवर आधारित या फेस्टमध्ये शुगर फ्री, डाबर, हॅपिलो, सफोला आणि इतर ब्रँड्सच्या नवीन लाँचचा समावेश होता. इमर्सिव्ह ब्रँड एक्सपिरियन्स आणि कंटेंटवर आधारित ॲक्टिव्हेशन्सनी फ्लिपकार्टच्या वेगाने वाढणाऱ्या अन्न आणि पेय श्रेणीला अधोरेखित केले आणि




गॉरमेट फूड डिस्कव्हरीसाठी एक प्रमुख ठिकाण म्हणून स्थान ठरले.

फ्लिपकार्टचे ग्राहकोपयोगी वस्तू (सौंदर्य, एफएमसीजी आणि आरोग्यसेवा) विभागाचे वरिष्ठ संचालक निशांत दलाल म्हणाले, फूड फेस्ट २०२५ मधून आम्ही केवळ अन्न पदार्थ साजरे करत नाही आहोत, तर आम्ही गोरमेट फूड शोध, कथाकथन आणि समुदाय-नेतृत्वाखालील व्यापाराचे एक नवीन युग निर्माण करत आहोत. फ्लिपकार्टला प्रत्येक भारतीयासाठी प्रेरणा, आनंद किंवा नावीन्याच्या शोधासाठी एक उत्तम ठिकाण बनवण्याचे आमचे ध्येय आहे. या फेस्टने निर्माते, शेफ, सेलिब्रिटी, ब्रँड आणि ग्राहकांना चव आणि तंत्रज्ञानाच्या उत्सवात एकत्र आणले. फ्लिपकार्ट तंत्रज्ञान, मनोरंजन आणि जीवनशैलीचे मिश्रण करून ई-कॉमर्सची पुनर्कल्पना करत असताना, आम्ही आमच्या भागीदारांसाठी ग्राहक सहभाग, श्रेणी नवसंशोधने आणि शाश्वत वाढ यांना चालना देणारे प्लॅटफॉर्म तयार करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

हॅप्पिलोचे संस्थापक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विकास नाहर म्हणाले की, फूड फेस्ट २०२५ साठी फ्लिपकार्टसोबत भागीदारी केल्याने आम्हाला आमच्या कलाकृतींचे प्रदर्शन एका उत्साही, ग्राहककेंद्री परिसंस्थेत करण्याची संधी मिळाली. कार्यक्रमाची व्याप्ती, विचारपूर्वक तयार केलेले विभाग आणि प्रेक्षकांची ऊर्जा यामुळे हा ब्रँडसाठी महत्त्वाचा उपक्रम ठरला. आम्हाला आमच्या उत्पादनांबद्दल प्रचंड प्रेम दिसले आणि ऑनलाइन आणि प्रत्यक्ष स्वरूपात आहारप्रेमी ग्राहकांशी थेट संपर्क साधून मौल्यवान माहिती मिळाली.

झायडस वेलनेसचे विक्री विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष ललित आहुजा म्हणाले, फ्लिपकार्ट फूड फेस्ट २०२५ ने आमच्या उत्पादनाची कथा आकर्षक आणि शैक्षणिक स्वरूपात जिवंत करण्यासाठी सर्वात योग्य व्यासपीठ दिले आहे. चर्चासत्रे, ब्रँड संवाद आणि थेट डेमोद्वारे आम्ही ग्राहकांशी कनेक्ट होऊ शकलो आणि विज्ञानावर आधारित वेलनेस सोल्यूशन्ससाठी आमची वचनबद्धता स्पष्ट करू शकलो. फ्लिपकार्टच्या एकात्मिक, प्रभाव निर्माण करण्याच्या क्षमतेमुळे आम्हाला चव, कथाकथन आणि नाविन्यपूर्णतेद्वारे आरोग्याबाबत जागरूक ग्राहकांच्या नवीन आणि विस्तृत पिढीशी जोडले जाण्यास मदत झाली.

## सोनी इंडियातर्फे डब्ल्यूएफ-सी७१0एन इयरबड्स सादर



**नवी दिल्ली, १४ जुलै :** सोनी इंडियाने आज डब्ल्यूएफ-सी७१0एन हे खऱ्या अर्थाने वायरलेस नॉइज कॅन्सलिंगची वैशिष्ट्ये असणारे इयरबड्स सादर केले. हे इयरबड्स सोनीच्या प्रगत नॉइज कॅन्सलेशन तंत्रज्ञानासह, दीर्घकाळ टिकणाऱ्या बॅटरीसह आणि एआय-आधारित उच्च दर्जाच्या कॉलिंगसह सुसज्ज आहेत. डब्ल्यूएफ-सी७१0एनमध्ये उत्कृष्ट ऑडिओ, नवीन आकर्षक रंगसंगती (विशेषत: ग्लास ब्लू) आणि बहुपर्यायी डिझाइन ही वैशिष्ट्ये देण्यात आली आहेत. हे इयरबड्स वापरण्यास अतिशय सुलभ असून त्या दृष्टीने त्यात विविध सुविधा आहेत. अगदी लहान आकाराचे हे इयरबड्स परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध आहेत.

डब्ल्यूएफ-सी७१0एन इयरबड्समध्ये सभोवतालचा आवाज टिपण्यासाठी दोन मायक्रोफोन्स आहेत. पूर्वीच्या मॉडेलपेक्षा यामध्ये नॉइज कॅन्सलिंगची अधिक सुधारित क्षमता आहे. हे दोन्ही मायक्रोफोन्स सोनीचे ड्युअल नॉइस सेन्सर तंत्रज्ञान वापरून बाहेरील आवाज फिल्टर करतात. त्यामुळे वापरकर्त्यांना कोणत्याही व्यत्ययाशिवाय संगीताचा आनंद घेता येतो. या इयरबड्समध्ये ॲम्बियंट साउंड मोडदेखील आहे. त्याने सभोवतालचा नैसर्गिक आवाज टिपला जातो. त्यामुळे आपण आपल्या आजूबाजूच्या वातावरणाशी संपर्कात राहूनही संगीताचा आनंद घेऊ शकतो. तसेच, सोनी साउंड कनेक्ट या ॲपद्वारे वापरकर्ते ॲम्बियंट साउंडची तीव्रता २0 स्तरांपर्यंत ॲडजस्ट करू शकतात, तसेच इयरबड्स काढण्याची गरज न पडता व्हॉइस पासथ्रू मोड वापरून सहज संभाषण करू शकतात.

## सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत आपला लुक डिझाईन करून गौरव चोप्रा कॉस्च्युम डिझाईनर बनला



**मुंबई, १४ जुलै :** सोनी सबवरील पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत प्रोफेसर राजवीर शास्त्री ही वकीलाची व्यक्तिरेखा आपल्या दमदार अभिनयाने जिवंत करणाऱ्या अभिनेता गौरव चोप्राचे कौतुक होत आहे. पुष्पा (करुणा पांडे)च्या कायद्याच्या शिक्षणाच्या प्रवासात प्रो. राजवीर तिला आव्हान देतो तसेच मदत देखील करतो. पडद्यावरील दमदार उपस्थिती आणि व्यक्तिरेखेतील बारकावे साकारण्याची हातोटी यांच्या बळावर गौरव या मालिकेला एक आगळेच चैतन्य बहाल करतो. आपल्या डिझाईनिंगच्या कौशल्याने त्याने अभिनयासोबतच पडद्याच्या मागेही आपली जादू दाखवली आहे.

अनेकांना हे माहीत नसेल की, गौरव एक प्रशिक्षित फॅशन डिझाईनर आहे. नॅशनल इंस्टीट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी मधून शिकलेल्या गौरवकडे पहिल्यापासून सौंदर्यदृष्टी आहे आणि यावेळी थेट कपडेपट विभागात त्याने आपल्या या कौशल्याचा उपयोग केला आहे. शब्द आणि स्केचेस यांच्या जगात वावरणाऱ्या या योद्धा प्रकृतीच्या, विचारांत सखोलता, सर्जनशीलता असलेल्या आणि स्वच्छंद वृत्तीच्या वकीलाचा लुक कसा असावा याबाबत गौरव आणि मालिकेची क्रिएटिव्ह टीम यांनी प्रो. राजवीरच्या व्यक्तिरेखेवर काम करत असताना सखोल विचार केला होता. आपल्या व्यक्तिरेखेसाठी जरा मातकट रंगाचे लिनन शर्ट आणि पॅन्ट ठरवण्यापासून पडद्यावर दिसणारे त्याचे विविध पोशाख हे स्वत: गौरवनेच डिझाईन केले आहेत.

प्रोफेसर राजवीर शास्त्रीची भूमिका करणारा अभिनेता गौरव चोप्रा म्हणतो, डिझाईनिंग हे माझे पहिले प्रेम आहे तर ॲक्शन हे कायमसाठीचे पॅशन आहे. पुष्पा इम्पॉसिबल मालिकेत मला दोन्हीची सांगड घालता आली. राजवीरचे कपडेही त्याच्या विचारांइतक्याच मोठ्याने बोलले पाहिजेत, असे मला वाटत होते. हे कपडेही त्याच्या सारखेच एकापेक्षा जास्त स्तर असणारे, मातीच्या रंगाचे आणि काहीसे अनपेक्षित आहेत.

## टाटा डिजिटल आणि झोमॅटो यांची भागीदारी टाटा नेउ एचडीएफसी बँक क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाइन फूड ऑर्डरवर अनलिमिटेड रिवॉर्ड्स देणार




**नागपूर, १४ जुलै :** लाखो भारतीयांना फूड ऑर्डरिंग आणि डिलिव्हरी प्लॅटफॉर्मवर फूड ऑर्डरिंगचा जास्तीत जास्त अनुभव प्रदान करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, झोमॅटोने टाटा डिजिटलसोबत एका रोमांचक भागीदारीची घोषणा केली आहे. या भागीदारीच्या माध्यमातून डिस्काउंट ऑफर प्रोग्राम सादर करण्यात आला आहे. हा डिस्काउंट प्रोग्राम टाटा नेउ एचडीएफसी बँक क्रेडिट कार्ड (नेउकार्ड) वापरून झोमॅटोवर त्यांच्या फूड ऑर्डरसाठी पैसे देणाऱ्या युजर्सना आकर्षक लाभ प्रदान करेल. नेउकार्ड हे टाटा डिजिटलचे को-ब्रँडेड क्रेडिट कार्ड आहे, ज्यामध्ये टाटा डिजिटल को-ब्रँडिंग भागीदार आहे आणि एचडीएफसी बँक कार्ड जारीकर्ता आहे. या धोरणात्मक भागीदारीअंतर्गत, झोमॅटोवर नेउकार्ड वापरणारे ग्राहक आता प्लॅटफॉर्मद्वारे केलेल्या प्रत्येक व्यवहारावर झोमॅटो मनीच्या स्वरूपात १0% पर्यंत कॅशबॅक मिळवू शकतील. ही ऑफर किमान ९९ रुपयांच्या ऑर्डर रकमेसह सर्व फूड डिलिव्हरी ऑर्डरवर लागू असेल. भविष्यातील ऑर्डरसाठी हे क्रेडिट्स सहजपणे रिडीम केले जाऊ शकतात, ज्यामुळे ऑनलाइन ऑर्डर केलेल्या पदार्थांची किंमत प्रभावीपणे कमी होते आणि युजर्सना अधिक वारंवार खरेदी करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल.

झोमॅटोचे व्हीपी (प्रॉडक्ट) राहुल गुप्ता म्हणाले, आमच्या ग्राहकांचा अनुभव आणखी वाढवण्यासाठी टाटा नेउसोबत भागीदारी केल्याचा आम्हाला आनंद होत आहे. आमचे ध्येय अधिकाधिक लोकांना चांगले अन्नपदार्थ उपलब्ध करून देणे आहे आणि ही भागीदारी त्या ध्येयाच्या दिशेने एक पाऊल आहे. आता, नेउकार्ड युजर्ससाठी विशेष लाभामध्ये पात्र ऑर्डरवर झोमॅटो मनीमध्ये १0% पर्यंत कॅशबॅक समाविष्ट आहे. झोमॅटोवरील भविष्यातील ऑर्डरवर हा कॅशबॅक वापरता येतो आणि टाटा नेउच्या अखंड आणि मजबूत डिजिटल इकोसिस्टमद्वारे पुढील बचत करता येते.

टाटा डिजिटलच्या फायनान्शियल सर्व्हिसेसचे अध्यक्ष श्री. गौरव हजरती म्हणाले, झोमॅटोसोबतची ही भागीदारी परिपूर्ण आहे. आम्ही आमच्या ग्राहकांची जीवनशैली वाढवण्यासाठी वचनबद्ध आहोत आणि आपल्या आवडीच्या अन्नपदार्थांचा आस्वाद घेण्यापेक्षा जास्त मोठा आनंद काय असू शकतो? आजच्या डिजिटल-फर्स्ट जगात, ही भागीदारीआम्हाला आमच्या नेउकार्ड धारकांना आणखी सुविधाजनक आणि मूल्य देण्यास सक्षम बनवते.

भारतात डिजिटल पेमेंट आणि ऑनलाइन फूड डिलिव्हरी वेगाने वाढत असताना, ही भागीदारी देशभरातील तंत्रज्ञान-जाणकार, सुविधा शोधणाऱ्या ग्राहकांना अधिक फायदे आणि अधिक मूल्य प्रदान करण्यासाठी दोन्ही भागीदारांचा एक सामायिक दृष्टीकोन प्रतिबिंबित करते.

ही ऑफर आता सुरु झाली आहे आणि सर्व नेउकार्ड धारकांसाठी उपलब्ध आहे. ग्राहक त्यांचे नेउकार्ड लिंक करू शकतात आणि झोमॅटोवर व्यवहार करून त्वरित रिवॉर्ड्स मिळवू शकतात.

## अविवा इंडियाकडून निमशहरी कुटुंबांना आपल्या मुलांच्या भवितव्याचे रक्षण करण्यास मदत करण्यासाठी अविवा भारत बाल विकास योजनेचे अनावरण

**नवी दिल्ली, १४ जुलै :** अविवा इंडिया या आघाडीच्या खाजगी जीवन विमा कंपनीने आपली नवीन जीवन विमा ऑफर अविवा भारत बाल विकास योजना, ही एक नॉन-लिंक्ड नॉन-पार्टिसिपेटिंग लाइफ इन्शुरन्स सेव्हिंग प्लॅन्स आणण्याची घोषणा केली आहे. तिचा उद्देश ग्रामीण आणि निमशहरी भारतातील कुटुंबांना त्यांच्या मुलांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्यास मदत करणे हा आहे. दरमहा फक्त १,000 रूपयांपासून सुरू होणाऱ्या प्रीमियमसह ही योजना हमी मॅच्युरिटी लाभ आणि जीवन कव्हर एकत्र आणते. त्यामुळे कुटुंबांना उच्च शिक्षण, कौशल्य विकास किंवा अगदी लहान व्यवसाय सुरू करणे अशा महत्त्वाच्या टप्प्यांसाठी आत्मविश्वासाने योजना आखण्यास मदत होते.

या योजनेत किमान वय ३ वर्षे आणि कमाल प्रवेश वय ५0 वर्षे आहे. पॉलिसीची मुदत १२ ते ३0 वर्षे आणि मॅच्युरिटी वय ८0 वर्षांपर्यंत आहे. त्यामुळे ती जीवनाच्या विविध टप्प्यांसाठी आणि आर्थिक उद्दिष्टांसाठी योग्य बनते. त्याचे लवचिक प्रीमियम पेमेंट पर्याय - मासिक, तिमाही, सहामाही किंवा वार्षिक - विविध घरगुती बजेटमध्ये बसणे सोपे करतात.

जीवन विमेदाराच्या पॉलिसी टर्ममधील मृत्यूच्या दुर्दैवी घटनेत नामनिर्देशिताला खालीलपैकी एक सर्वाधिक मिळेल:
डेथ सम इन्शुअर्ड किंवा
मृत्यूच्या तारखेला सरेंडर व्हॅल्यू (गॅरंटीड सरेंडर व्हॅल्यू किंवा स्पेशल सरेंडर व्हॅल्यू यापैकी जास्त असेल ते), किंवा
एकूण प्रीमियम प्रदानाच्या X %** (किमान १0५%)

या अनावरणाबाबत बोलताना अविवा इंडियाचे मुख्य मार्केटिंग अधिकारी विनित कपाही म्हणाले, अविवा भारत बाल विकास योजना ही महानगरांच्या पलीकडे असलेल्या कुटुंबांच्या प्रत्यक्ष, दैनंदिन आकांक्षांवर आधारित आहे. ही योजना त्यांच्या मुलांच्या स्वप्नांचे संरक्षण आणि संगोपन करू इच्छिणाऱ्या पालकांसाठी एक सोपी, ध्येय-केंद्रित योजना आहे. त्यात आर्थिक उत्पादनांशी संबंधित गुंतागुंती नाहीत. ही योजना पॉलिसी टर्मच्या शेवटी हमी दिलेल्या सम एश्युअर्डच्या स्वरूपात मॅच्युरिटी बेनिफिट्स देते. त्यामुळे मुलाच्या भविष्यासाठी आर्थिक आधार मिळतो. प्रचलित कायद्यांनुसार कर लाभ देखील देते. त्यामुळे आर्थिक सुरक्षा आणि भविष्य-केंद्री बचत दोन्ही शोधणाऱ्या कुटुंबांसाठी ही एक व्यावहारिक निवड बनते.

हे अनावरण अविवाची आर्थिक समावेशनाप्रती वाढती वचनबद्धता प्रतिबिंबित करते तसेच संरक्षणाची सर्वाधिक आवश्यकता असलेल्या केवळ महानगरांमध्येच नाही तर खऱ्या भारतात पोहोचते.

** प्रत्यक्ष टक्केवारी तपासण्यासाठी अविवा इंडियाची वेबसाइट तपासा



## शरद आणि निहारिका यांनी दिल्लीच्या चांदणी चौकच्या गल्लीबोळांमध्ये मारला फेरफटका!

**मुंबई, १४ जुलै :** झी टीव्हीवर नुकतीच सुरू झालेली ही मालिका तुम से तुम तक प्रेक्षकांसमोर एक अशी प्रेमकथा सादर करते जी वय, वर्ग आणि सामाजिक अपेक्षांच्या सीमारेषा पार करण्याचे धाडस दाखवते. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे एक ४६ वर्षांचा यशस्वी उद्योजक आर्यवर्धन (शरद केळकर) आणि एक सामान्य कुटुंबातील १९ वर्षांची मुलगी अनु (निहारिका चौक्सी) यांच्यातील भावनिक संबंध. त्यांचा प्रवास अंतर्गत संघर्ष, बाह्य दबाव आणि विश्वास, प्रेम व आदराच्या टप्प्यांतून जातो. या कथेला अधिक आकर्षक बनवते ती मालिकेची पार्श्वभूमी नवी दिल्लीसारख्या सदैव गजबजलेल्या, आत्म्याला भिडणाऱ्या शहरात घडणारी ही गोष्ट आहे.

दिल्लीतील शूटिंगचा निर्णय हा केवळ दृश्यात्मकदृष्ट्या मोहक नव्हता, तर ती एक जाणीवपूर्वक केलेली सर्जनशील निवड होती. चांदणी चौकच्या अरुंद गल्ल्यांपासून ते इंडिया गेटच्या भव्यतेपर्यंत आणि कुतुब मिनारच्या ऐतिहासिक आकर्षणांपर्यंत, दिल्लीने मालिकेतील दृश्यांना एक वेगळाच खोलपणा आणि वास्तविकता दिली आहे. कलाकार आणि क्रूने केवळ या शहरात शूटिंगच केले नाही, तर ते शहर अक्षरशः जगलेही. अनेक दिवसांच्या शूटिंगदरम्यान आणि भावनिक प्रसंगांच्या चित्रीकरणात, शरद आणि निहारिकाने दिल्लीच्या प्रसिद्ध स्ट्रीट फूडचा देखील मनमुराद आनंद घेतला पराठेवाली गल्लीतल्या झणझणीत पराठ्यांपासून ते कुतुब मिनारच्या आसपास मिळणाऱ्या कुल्हड चहापर्यंत, चाटचे चविष्ट अनुभव आणि उन्हापासून दिलासा देणाऱ्या थंड लस्सीपर्यंत. दिल्लीचा हा खाद्यप्रवास खुद्द शूटिंगचा अविभाज्य भाग बनला होता आणि त्यांच्या शूटिंग डायरीतील एक संस्मरणीय भाग ठरला.

या अनुभवाबद्दल बोलताना शरद केळकर म्हणाला, दिल्लीमध्ये शूटिंग करणे हा एक असा अनुभव आहे जो माझ्या कायम लक्षात राहील. प्रत्येक लोकेशन चांदणी चौकपासून कुतुब मिनारपर्यंत आमच्या सीन्समध्ये एक वेगळीच ऊर्जा घेऊन आले. मला आठवतंय की, एक भावनिक सीन करत असताना मी शरद न राहता आर्यवर्धन बनून विचार करू लागलो होतो. कलाकार आणि पात्र यांच्यातली सीमा कुठेतरी मिटली होती. असे क्षण फार कमी वेळा येतात. स्थानिक वातावरणात हरवून जाणे, शुटिंग ब्रेकमध्ये कुल्हडमधून चहा पिणे, उसाचा रस प्यायचा आणि गरमागरम जलेबीची मजा घेणे सगळंच खास होतं. आम्ही उन्हाळ्यात शूट करत होतो, त्यामुळे थंडगार लस्सी आणि सोडा हे आमचे 'सर्व्हायवल कीट' होते! आणि माझी सहकलाकार निहारिका हिला मी पूर्ण श्रेय देईन, कारण तिनेच दिल्लीतील फूड स्पॉट्सची यादी बनवली होती. त्यामुळे आम्ही सगळ्यांनी मिळून अशा ठिकाणांचा शोध घेतला, जे आमच्या अनुभवाला अजून खास आणि अविस्मरणीय बनवणारे ठरले. दिल्लीची एक वेगळीच लय आहे अनपेक्षित, विद्युतसंचारित आणि भावनिकदृष्ट्या खोल आणि मला वाटतं हीच लय 'तुम से तुम तक'मध्येही झळकणार आहे.

आपला अनुभव सांगताना निहारिका चौक्सी म्हणाली, तुम से तुम तकच्या दिल्लीतील शूटिंगदरम्यान आम्ही या शहराला अतिशय जवळून पाहिले. प्रत्येक गल्ली, प्रत्येक कोपऱ्यात काही ना काही कथा दडलेली होती. मी याआधीही दिल्लीला गेले आहे, पण यावेळी काहीतरी वेगळे होते इथे राहणे आणि इथेच काम करणे, यामुळे एक वेगळीच नाळ जुळली. मी फूडी आहे आणि दिल्लीच्या प्रसिद्ध स्ट्रीट फूडबाबत मी फारच उत्साही असते. जेव्हा मला कळले की आम्ही चांदणी चौकसारख्या ठिकाणी शूट करणार आहोत, तेव्हा मी लगेचच माझी फूड बकेट लिस्ट तयार केली. पराठेवाली गल्लीतला पराठा, ब्रेकमध्ये उसाचा रस, मसालेदार चाट, आणि शेवटी गोडावून टाकणारे आइस्क्रीम या सगळ्यामुळे शूटिंग एक मजेशीर आणि आनंददायक अनुभव बनला. अनु या व्यक्तिरेखेद्वारे मी प्रेम आणि आयुष्य यांचा अनुभव नव्याने घेत आहे. दिल्लीच्या पार्श्वभूमीने हे सगळे अधिक खरे, हृदयाला भिडणारे आणि व्यक्तिगत बनवले.

दिल्लीचा आत्मा या कथानकात इतक्या सहजतेने गुंफलेला आहे की तुम से तुम तक ही प्रेमकथा अधिक खऱ्यासारखी, प्रामाणिक आणि भावनिकदृष्ट्या खोल ठरते. प्रेक्षकांसाठी पाहणे उत्सुकतेचे ठरेल की आर्यवर्धन आणि अनु हे सामाजिक बंधनांना मागे टाकू शकतात का?


## आज का अंदाज

मंगळवार १५ जुलै २०२५

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ६ | ९ | ० | ३ | ४ | ७ | ८ |
| ३४६ | १६९ | २३४ | ३८९ | १४८ | १५८ | २६९ | १८९ |
| ४९० | ३४९ | ४५० | ४७९ | ६७० | ३४७ | ४५८ | ३७८ |
| ५८० | २६८ | ५६८ | ५६९ | २२९ | २५७ | ३५९ | ४४० |
| ३१ | ६१ | ९७ | ०७ | ३९ | ४९ | ७२ | ८२ |
| ३२ | ६२ | ९४ | ०४ | ३२ | ४० | ७५ | ८५ |
| ३८ | ६८ | ९५ | ०५ | ३१ | ४१ | ७६ | ८६ |

१५ जुलै : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४० | ५२ | ८२ |
| ११ | ४१ | ५६ | ८६ |
| १७ | ४७ | ५३ | ८३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


## लोकप्रिय अभिनेता नसिर खान झी टीव्हीवरील तुम से तुम तकमध्ये आर्यवर्धनच्या विश्वासू सहकाऱ्याच्या रूपात

**मुंबई, १४ जुलै :** झी टीव्हीने नेहमीप्रमाणे प्रगत आणि भावनिक थरांनी भरलेल्या कथा मांडण्याची आपली परंपरा जपत, आपली नवीन मालिका तुम से तुम तक सह प्रेक्षकांच्या मनात ठसा उमटवायला सुरुवात केली आहे. धाडसी आणि भावनिकदृष्ट्या गुंफलेल्या कथानकामुळे ही मालिका लक्षणीय ठरत आहे. या असामान्य प्रेमकथेच्या केंद्रस्थानी आहे दोन अत्यंत वेगवेगळ्या विश्वांतील व्यक्तींमधील एक हळवा बंधअनु, एक १९ वर्षांची बिनधास्त आणि साध्या घरातील मुलगी, आणि आर्यवर्धन, ४६ वर्षांचा आत्मनिर्भर व्यावसायिक, जो आपल्या शिस्त, संयम आणि भावनिक नियंत्रणासाठी ओळखला जातो.

नसीरखान म्हणाले, झी टीव्हीवर परत येणे नेहमीच माझ्यासाठी घरी परतल्यासारखे वाटते. प्रत्येक अभिनेत्याच्या आयुष्यात अशी एक भूमिका असते जी त्याला आव्हान देते, उत्सुकता निर्माण करते आणि सेटवर नव्या जोमाने परत यावंसं वाटायला लावते तुम से तुम तक माझ्यासाठी नेमकं तसंच एक प्रोजेक्ट ठरलं. ही कथा नवीन आहे, थरारक आहे आणि भावनिकदृष्ट्या अतिशय सशक्त आहे. मला सर्वात जास्त आकर्षित केले ते झेंडेच्या पात्राने तो निष्ठावान आहे, चतुर आहे आणि भावनिकदृष्ट्या खूप गुंतागुंतीचा आहे. तो ज्या व्यक्तीप्रती निष्ठावान आहे, त्याचे रक्षण करण्यासाठी कठीण आणि कधी कधी कठोर निर्णय घ्यायलाही मागेपुढे पाहत नाही. अशा भूमिका वारंवार मिळत नाहीत, आणि मला त्याला साकारण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे. हा माझ्यासाठी केवळ आणखी एक प्रोजेक्ट नाही, तर प्रेक्षकांशी पुन्हा नाते जोडण्याची आणि एक अशी व्यक्तिरेखा साकारण्याची संधी आहे, जी मी याआधी कधीच साकारलेली नाही. मला खरोखर आशा आहे की प्रेक्षक झेंडेच्या व्यक्तिरेखेशी आणि तुम से तुम तकच्या विश्वाशी जोडले जातील, आणि आजपर्यंत जसा प्रेम आणि पाठिंबा दिला, तसाच पुढेही देत राहतील.

## राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस नोकरी आणि व्यवसायाच्या बाबतीत मिश्रित राहील. तुम्हला व्यवसायात फायदा मिळेल. पण यासाठी तुम्हाल खूप कष्टही करावे लागतील. तुमची कमाई होत राहील.

**वृषभ :** आज तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत मजामस्करीत वेळ घालवाल. त्यामुळे नातेसंबंध अधिक घट्ट होतील. आज घरात नवीन पाहुणे येऊ शकतात. अनोळखी व्यक्तीशी बोलणे टाळा.

**मिथुन :** आजचा दिवस फायदेशीर राहील. तुम्हाला आज नशिबाची साथ मिळेल. धर्म, कर्म आणि आध्यात्मिक विषयांमध्ये तुमची आवड वाढेल. तुम्ही मेहनतीने कामाच्या ठिकाणी यश मिळवाल. मिळेल.

**कर्क :** आज इतरांशी वाद घालणे टाळा. अन्यथा तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी अनावश्यक व्यत्यय येऊ शकतो. प्रवासादरम्यान मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्या.

**सिंह :** या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. आज तुमची धर्माविषयीची आवड वाढेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमच्या जबाबदाजया समजतील. आज शेजाजयांशी वाद होऊ शकतो.

**कन्या :** आजचा दिवस मिश्रित राहील. आज तुम्ही आपल्या मुलांच्या समस्येबद्दल काळजीत असू शकता. आर्थिक व्यवहारांच्या बाबतीत तुम्हाला आज काळजी घेणे आवश्यक आहे.

**तुळ :** आज तुम्ही तुमच्या अपूर्ण योजना राबविण्यात यशस्वी व्हाल.न्यायालयीन प्रकरणांमध्ये तुम्हाला यश मिळेल. राजकीय क्षेत्रात सावधगिरी बाळगा. अन्यथा, तुमची प्रतिष्ठा कलंकित होऊ शकते.

**वृश्चिक :** नोकरीसाठी तुमचा शोध पूर्ण होईल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला तुमच्या वरिष्ठांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. शेअर बाजारात गुंतवणूक करणाजयांसाठी आजचा दिवस चांगला असेल.


**धनु :** मुलांकडून आज तुम्हाला चांगली बातमी मिळू शकते. जीवनसाथीसोबत आज वेळ घालवाल. जे लोक नोकरी शोधत आहेत, त्यांना आज आपल्या प्रयत्नांमध्ये यश मिळेल घराच्या नुतनीकरणाचं काम होईल.

**मकर :** तुमचे विरोधक आणि शत्रू आज मजबूत राहतील, त्यामुळे आज तुम्हाला त्यांच्यापासून सावध राहण्याची गरज आहे. आज तुमचा मूड खराब होऊ शकतो. अनोळखी लोकांपासून सावध रहा.

**कुंभ :** आज तुम्ही कोणतीतरी भेटवस्तूही घेऊ शकता. वैवाहिक जीवनात कोणताही अडथळा असेल तर तो संपेल. तुमची मौल्यवान वस्तू चोरी होण्याची शक्यता आहे, त्यामुळे आपल्या वस्तूंची काळजी घ्या.

**मीन :** आज, काही महत्त्वाचे काम विनाकारण व्यत्यय आणू शकते. किंवा काम बिघडू शकते. कामाच्या ठिकाणी नवीन सहकारी फायदेशीर ठरतील. नोकरदारांचा आनंद नोकरीत वाढेल.

## शब्दकोडे क्रमांक २१६५



**आडवे शब्द :-**
१) आयातकर
४) वंदनीय
५) वर्षाव, भडीमार
७) हिशोबातील खर्चाच्या विरुद्धची
९) रममाण
११) *** बिलावल संगीतातील एक राग
१२) बालकाच्या डोक्यावरील जन्मजात केस
१३) व्याघ्र
१४) उपहास, चेष्टा
१५) खणणे
१७) वर्ष, साल
१८) चबुतरा
१९) योग्य, उचित
२१) उपयोग
२३) पडदा
२५) तुरुंग
२६) इंद्राचा हत्ती
२८) कुंभाराची भट्टी
३०) गाढव
३१) लक्ष्मीचे एक नाव
३२) स्तुती करणारा
३३) वजन
३४) उजाड, ओसाड, निर्जन
३५) वेल
३७) वेळ, यम
३८) बाई
४०) फक्त, केवळ
४१) होडी, सैन्याचा तळ
४३) अटीची भाषा
४५) फळावरील आवरण
४७) कपोल
५०) नवारीने बाज विणणे
५२) म गांधीजींचे अखेरचे शब्द
५४) सहाय्य
५५) श्वसनेंद्रिय
५६) लाकूड कापण्याचे हत्यार
५७) जंगल
६०) ललाट
६२) माल साठविणे
६३) स्वामी, पती
६४) गंध
६६) नवा, न वापरलेला
६७) एक रत्न
६८) द्रव पदार्थ
७०) एक सुगंधी वनस्पती

**उभे शब्द :-**
१) जयाचा नामघोष
२) कार्य
३) शरीर
४) फसव्या
५) जादू, भ्रम
६) एक ज्वालाग्रही पदार्थ
७) भारतीय सैनिक
८) एक मराठी महिना
९) भात शिजताना होणारा आवाज
१०) जरच्या बरोबरचा शब्द
१२) गमन करणे
१६) रमापती
१७) पावसाची धार
१८) पातक
२०) आश्रय
२२) मान्य, आवडलेला
२४) सैन्यदल
२६) लोहाराकडचे एक साधन
२७) मसाल्यातील एक पान
२८) नभ
२९) मार्ग, रस्ता
३०) बाईट, नासलेला
३३) हिंदुस्थान
३६) ज्वर
३७) गेरु
३८) कळलाव्या मुनी
३९) सोपे, सहज जमण्यासारखे(हिं, )
४०) सामान
४२) वाम
४४) समुद्र
४६) सत्ता
४७) गीत
४८) बेडकांचे ओरडणे
४९) कामदेव
५१) धोबी
५२) परराष्ट्रात गुप्त बातम्या काढणारा
५३) अभिप्राय
५४) आचार्य अत्रे यांच्या दैनिकाचे नाव
५६) अचानक उठणारी वेदनेची उसळी
५८) संगत
५९) लबाडीचा हेतू
६१) कबूतर
६२) पुण्याजवळचे आ, अत्रे यांचे जन्मगाव
६३) निराश, नाखूष
६५) युद्ध
६९) फुरसत
७१) दारुचा एक प्रकार
७४) बारीक केस
७२) वरपांगी
७३) पाणी
७५) मऊ
७६) सगा, नातेवाईक
७७) लग्नासाठी जमलेले सगे सोयरे

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



चंद्रपूर महासागर



## जिल्हास्तरीय महिला लोकशाही दिन

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** समस्याग्रस्त व पीडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी सक्षम व्यासपीठ उपलब्ध व्हावे, तसेच त्यांच्या तक्रारी व अडचणींवर शासकीय यंत्रणेमार्फत प्रभावी मार्गाने कार्यवाही व्हावी, यासाठी महिला व बाल विकास विभागामार्फत दरमहा 'महिला लोकशाही दिन' राबविण्यात येतो. सदर उपक्रमांतर्गत, ज्या महिलांना व्यक्तिगत स्वरूपाच्या तक्रारी, अडचणी किंवा निवेदने आहेत, त्यांनी महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवसांपूर्वी आपली तक्रार दोन प्रतींत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, चंद्रपूर यांच्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.

## राजुरा येथील समस्या सोडविण्याची मागणी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १४ जुलै :** शालेय वर्ग सुरू झालेले असून राजूरा शहरात नागपूर हैदराबाद महामार्गावरच श्री. शिवाजी महाविद्यालय, ज्योतीबा महाविद्यालय, इंफंट शाळा, जिल्हा परिषद महाविद्यालय, असे मोठ मोठे शाळा व महाविद्यालये आहेत. त्यामुळे साहजिकच शाळा भरता वेळेस व सुटकेचा वेळेस ह्या महामार्गावरील वर्दळ वाढून अपघाताचा धोका निर्माण होण्याची दाट शक्यता असते या वेळेत वाहतूक पोलिसांना ह्या मार्गावर उपस्थित राहण्याची मागणी करण्यात आली. त्या सोबतच श्री. शिवाजी महाविद्यालय जवळच असलेल्या रेल्वे गेट ची उंची कमी असल्यामुळे तेथून येणाऱ्या ओवर लोड बांबूचे ट्रक मधून बांबू पडून दुर्घटना होऊ शकते.

# मलनिःसारण योजनेअंतर्गत रस्ते दुरुस्तीच्या कामांना गती

## १३ पैकी ७ किमी रस्त्यांचे दुरुस्तीकरण पूर्ण नवीन काम हाती न घेण्याचे कंत्राटदारास निर्देश

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** चंद्रपूर शहरात मलनिःसारण योजना राबविण्यात येत असून, त्याअंतर्गत विविध भागांमध्ये सांडपाणी वाहिन्यांचे जाळे टाकण्यात आले आहे. या कामासाठी एकूण १३ किलोमीटर लांबीचे सिमेंट व डांबरी रस्ते खोदण्यात आले होते. सदर कामांमुळे निर्माण झालेल्या अडचणी लक्षात घेता, महानगरपालिकेने तात्काळ रस्ते दुरुस्तीला प्राधान्य दिले असून आतापर्यंत ७ किलोमीटर रस्त्यांचे दुरुस्तीकरण पूर्ण करण्यात आले आहे.



यासंबंधी नुकतीच मा. आमदार किशोर जोरगेवार यांनी सदर कामाला भेट दिली होती. तसेच इतरही लोकप्रतिनिधींनी रस्ते खोदण्यासंबंधी तक्रारी दिल्या होत्या त्यानुषंगाने आयुक्त विपीन पालीवाल यांनी उर्वरीत कामे त्वरीत पूर्ण करण्याचे तसेच पावसाळा संपेपर्यंत कुठलेही नवीन काम हाती न घेण्याचे निर्देश कंत्राटदाराला दिले आहे. नागरिकांना त्रास होईल अश्या स्वरूपाचे काम निदर्शनास आल्यास दंडात्मक कारवाई करण्याचेही आदेश त्यांनी दिले आहेत.

नागरिकांना पुन्हा एकदा पूर्ववत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. स्वच्छता व पर्यावरणपूरक उपाययोजनांना चालना. शहरातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० योजनेअंतर्गत महत्त्वाचे प्रकल्प मनपातर्फे हाती घेण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत वाढीव पाणीपुरवठा यंत्रणा तसेच मलनिःस्सारण योजनेच्या कामासाठी शहरातील विविध

> सदर कामांमुळे काही भागांतील नागरिकांना तात्पुरती गैरसोय झाली असली, तरी या दीर्घकालीन प्रकल्पांमुळे शहराला भक्कम व टिकाऊ पायाभूत सुविधा प्राप्त होणार आहेत. चंद्रपूर महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

भागांमध्ये अनेक रस्त्यांवर खोदकाम करावे लागले होते. या रस्त्यांचे पुनर्बांधकाम, मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम टप्प्याटप्प्याने करण्यात येत आहे.

मलनिःस्सारण योजनेअंतर्गत ३२ किलोमीटर पाईपलाईन टाकण्यात आली असुन बालाजी वॉर्ड, ठक्कर कॉलनी, समाधी वॉर्ड, लालपेठ, बाबुपेठ येथील रस्त्यांचे काम पुर्ण करण्यात आले आहे. शहराची वाढती लोकसंख्या बघता मलनिःस्सारणाची योग्य व्यवस्था हे दीर्घकालीन नियोजनाचे पाऊल आहे.

यामुळे मोकळ्या नाल्यांमध्ये सांडपाणी जाण्याऐवजी ते प्रक्रिया केंद्रात गेल्याने शहरात दुर्गंधी आणि घाणीचे प्रमाण कमी होणार आहे. पुनर्वापर केलेले सांडपाणी बागायती, सिमेंट उद्योग, औद्योगिक वापर, वाटर स्प्रे बांधकामासाठी वापरता येईल.

खुल्या नाल्यांमुळे रोगकारक जंतु व जी दुर्गंधी पसरते त्यावर मलनिःस्सारण प्रकल्पामुळे आळा घालता येऊ शकतो. तसेच यामुळे सुदृढ आरोग्य पातळीत वाढ होऊन मच्छरांचा त्रासही कमी होतो.

## शिवसेना (उबाठा गट) तर्फे वन परिक्षेत्र अधिकाऱ्यांना दिले निवेदन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १४ जुलै :** चुनाळा परिसरातील अवैध सागवान लाकूडतोड व रेती तस्करी रोखण्याबाबत तातडीने कठोर कारवाई करणे बाबत.

राजुरा तालुक्यातील मौजा चुनाळा येथील जंगल परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून सर्रासपणे अवैध लाकूडतोड सुरू आहे. विशेषतः मौल्यवान सागवान व इतर मूल्यवान झाडांची निर्दयपणे तोड करून ते लाकूड गुप्त मार्गाने बाहेर पाठवले जात आहे. ही तोड केवळ चोरी नाही, तर संपूर्ण पर्यावरण व्यवस्थेचा बेकायदेशीर खात्मा आहे. या प्रकारात वनविभागाच्या बिट रक्षकांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंतच्या कर्मचाऱ्यांचा थेट अथवा अप्रत्यक्ष सहभाग असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत आहेत.

त्याचबरोबर चुनाळा व लगतच्या परिसरातून मोठ्या प्रमाणावर अवैध रेती तस्करी देखील सुरू आहे. हे सर्व काही दिवसाढवळ्या होत असून, शासन यंत्रणा व आपला विभाग मुंग गिळून गप्प असल्याचे दिसते. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व असंतोष आहे.

शासनाच्या वनसंवर्धन धोरणांना थेट हरताळ फासणाऱ्या या कारवायांकडे दुर्लक्ष करणे ही प्रशासनाची जबाबदारी झटकण्याची वृत्ती मानली जाईल.

म्हणून, शिवसेना (उबाठा गट) राजुरा शहर शाखेच्या वतीने विविध मागण्या करण्यात आल्या आहेत

चुनाळा परिसरातील अवैध लाकूडतोड व रेती तस्करी प्रकरणी तातडीने विशेष तपास पथकाची नियुक्ती करण्यात यावी. या प्रकरणात दोषी आढळलेल्या वनकर्मचाऱ्यांवर तत्काळ निलंबन व गुन्हे दाखल करण्यात यावेत. जंगल क्षेत्रात नियमित गस्त आणि ड्रोन सर्वेक्षण सुरू करून कायदा व सुव्यवस्थेची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यात यावी. नागरिकांनी दिलेल्या तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून अहवाल सार्वजनिक करण्यात यावा. भविष्यात कोणत्याही प्रकारची बेकायदेशीर कारवाई होऊ नये यासाठी सीसीटीव्ही, चौकी आणि गुप्त माहिती यंत्रणा प्रभावीपणे राबविण्यात यावे.

वरील मागण्या त्वरित मान्य न झाल्यास, शिवसेना (उबाठा) राजुरा शहर शाखा तर्फे आंदोलनात्मक पावले उचलण्यास बाध्य होईल असे निवेदन शिवसेना उपजिल्हा प्रमुख नितीन भाऊ पिपरे यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आले. या प्रसंगी बंटी उर्फ शुभम पीपरे शहर प्रमुख, युवासेना राजुरा यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

## स्टेम पोद्दार लर्न स्कूलमध्ये विद्यार्थी परिषदेचे गठन



**ब्रम्हपुरी, दि. १४ जुलै :** स्टेम पोद्दार लर्न स्कूल मध्ये विद्यार्थी परिषदेचे गठन करून विविध पदी विद्यार्थ्यांची नेमणूक करण्यात आली. या कार्यक्रमाची सुरुवात एका सुंदर प्रार्थनेने विद्यार्थ्यांनी केली. तसेच मुख्याध्यापिका यांनी विद्यार्थ्यांना शपथविधी समारंभात विद्यार्थ्यांनी त्यांच्या नवीन भूमिकांची मूल्ये आणि जबाबदाऱ्या पार पाडण्याचे वचन दिले. निधी ढोरे या विद्यार्थिनीची विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून तर प्रेम डोंगरवार याची विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून ब्रह्मपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद बनबळे हे होते व त्यांनी विद्यार्थ्यांच्या मनावर नेतृत्व व जबाबदारीचे महत्व अधोरेखित केले आणि त्यांचे अभिनंदन करून भूमिकांची मूल्ये आणि तत्वे जपण्यास प्रोत्साहित केले. तसेच मुख्याध्यापिका डॉ. भावना डोंगरदिवे यांनी विद्यार्थ्यांना नेतृत्व व जबाबदारीचे महत्त्व पटवून देत, विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या, तसेच कार्यक्रमाला उपस्थित असलेले ट्रस्टी डॉ. नितीन उराडे व ट्रस्टी को- ऑर्डिनेटर श्रीमती वैशाली श. उराडे यांनी देखील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# शहरतिल गौतम नगरमध्ये 'रेडिएशनचा स्फोट

## तिसऱ्या मोबाईल टॉवरविरोधात शिवसेनेचा एल्गार

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. १४ जुलै :** भद्रावती शहरात गौतम नगर स्नेहल नगर मध्ये सुरू असलेल्या तिसऱ्या मोबाईल टॉवरच्या उभारणीविरोधात शिवसेनेच्या वतीने नगर परिषद भद्रावतीच्या मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

सदर परिसरात २० मीटर व १०० मीटर अंतरावर दोन मोबाईल टॉवर आधीच उभारले गेले असून, आता तिसरा टॉवर उभारल्यास परिसरातील नागरिकांवर रेडिएशनचा गंभीर धोका निर्माण होणार आहे. यामुळे ४ ते ५ हृदयरोगी वृद्ध नागरिकांचे आयुष्य धोक्यात येत आहे.

मोबाईल टॉवरमधून होणाऱ्या रेडिएशनमुळे कर्करोग, हृदयविकार, झोपेचे विकार, मानसिक तणाव, लहान मुलांमध्ये बौद्धिक परिणाम, प्रजनन क्षमतेवर घातक परिणाम, असे आजार वाढीस लागतात, हे शास्त्रशुद्धपणे सिद्ध झाले आहे.

या पार्श्वभूमीवर संतप्त नागरिकांनी ही तक्रार शिवसेनेचे शिवसैनिक सुरज शाहा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख नितीन मत्ते यांच्या नेतृत्वात नगर परिषद मुख्याधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

शिवसेनेच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला आहे की, जर सदर मोबाईल टॉवरचे काम तात्काळ थांबवण्यात आले नाही, तर जनहितार्थ तीव्र आंदोलन उभं करण्यात येईल.

यावेळी शिवसैनिक सुरज शाहा, शिवसैनिक सुमित हस्तक, उपतालुकाप्रमुख सिंगलदीप पेंदाम, शिवसैनिक दीप गारघाटे, शिवसैनिक राज चव्हाण, सुधीर मत्ते, निखिल उताने, रोशन चोधरी, अरुण मत्ते, शिवाजी तेलंग, बंडू कोरडे, नितीन रामटेके, मनोज गेडाम, लता मत्ते, सुनीता उताने, वैशाली तेलंग, प्रिया तेलंग, नंदा ठमके, संजू ठमके, गंगा ठमके, सरस्वती दानव, प्रगती शिंदे, जोशना फुकट, नंदा कोरडे, उज्वला चिलके, मीना अरोरा, अश्विनी मत्ते व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# मी काँग्रेस पक्षात जाणार नाही : सुदर्शन निमकर

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. १४ जुलै :** जिल्हा सहकारी बँक निवडणुकीत राजुरा तालुक्यात अ गटातून काँग्रेस पक्षाच्या सहकार्याने सुदर्शन निमकरांचा विजय झालं. सुदर्शन निमकर यांचा विजयात सुभाष धोटे यांचा सिंहाचा वाटा होता यात काही शंका नाही. सुदर्शन निमकर यांच्या विजय नन्तर निमकर आपल्या समर्थका सोबत सुभाष धोटे यांच्या आभार मानायला त्यांच्या घरी गेले. तसेच सुभाष धोटे यांनी सुदर्शन निमकर यांना अलिंगन देऊन त्यांना शुभेच्छा दिले.

एकमेकांना पाहण्यात पाहणारे दोन्ही माजी आमदारांचे दिलजमाई झाल्याने भविष्यात सुदर्शन निमकर हे काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची चर्चेला उधाण आले. मात्र मी भाजप मध्ये राहणार असून काँग्रेस मध्ये जाणार नाही अशी प्रतिक्रिया सुदर्शन निमकर यांनी महासागर तालुका प्रतिनिधी जवळ बोलून दाखविले.



तसेच सुदर्शन निमकर यांनी सांगितले कीं, बँक उपविधित बदल झाल्याने फक्त अ आणि ब गटांना बँकेच्या निवडणुकीत उभे राहण्याच्या अधिकार होता. काँग्रेस जवळ राजुरा तालुक्यात अ गटात उमेदवार नसल्याने काँग्रेस पक्षाने सुदर्शन निमकर यांना बिन शर्त समर्थन दिले. या समर्थनाच्या बदल्यात आगामी जिल्हा परिषद निवडणुकीत मी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला समर्थन देणार ही फक्त अफवा आहे यात काहीच तथ्य नाही आहे.तसेच बँकेच्या निवडणुकी पुर्वी सुदर्शन निमकर, संजय धोटे आणि सुभाष धोटे यांनी चंद्रपूर येथील रेस्ट हाऊस मध्ये चर्चा झाली ही निव्वळ अफवा आहे अशी आमच्या तिघांत बँकेच्या निवडणुकी पुर्वी कोणतीच बैठक व चर्चा झाली नसल्याचे सुदर्शन निमकर यांनी स्पष्ट केले.

यापुवी सुद्धा सुदर्शन निमकर गट आणि सुभाष धोटे यांनी राजुरा बाजार समिती मध्ये युती केलेले आहे. आता जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत पुन्हा एकदा दोन्ही माजी आमदार जवळ आल्याने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत युती होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# घुग्घुस संत श्री.साईबाबा बहुउद्देशीय मंडळातर्फे गुरुपौर्णिमेनिमित्त महाप्रसादाचे आयोजन कार्यक्रम संपन्न

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घुस, दि. १४ जुलै :** घुग्घुस येथील दि. १० जुलै २०२५ गुरूवार रोजी गुरुपौर्णिमा चे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे संत श्री.साईबाबा बहुउद्देशीय संस्था नगर परिषद जवळ घुग्घुस येथे गुरु पौर्णिमेचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमांमध्ये मतदारसंघातील लोकप्रिय आ.किशोरभाऊ जोरगेवार यांचे समर्थक भा.ज.पा.नेते मा.श्री. आशीषभाऊ मासीरकर, काँग्रेस नेते रोशनभाऊ पचारे, पवन आगदारी, शिवसेना (उबाठा) अध्यक्ष चेतन (बंटी) घोरपडे, सुधाकर चिकनकार, योगेश भादककर, युवा नेते अमित बोरकर, मधुकर मालेकर, निळकंठ थेरे यांच्या उपस्थितीत श्री.साईबाबा यांच्या प्रतिमेस पूजन-अर्चन करून पुष्पमाला अर्पण करण्यात आले.तसेच द्विपजवलीत करण्यात आले घटस्थापना ठिक बारा वाजता यांच्या हस्ते दुपारी बारा वाजता करण्यात आली व सायंकाळी पाच ते दहा वाजेत दरम्यान भव्य महाप्रसादाला सुरुवात झाली व तसेच पुनवट येथील पदावली भजन



साई भक्तांनी उत्कृष्ट रित्या सादर केले सदर मंडळाचे हे तिसरे वर्ष असून या मंडळाच्या माध्यमातून जनसेवेचे पवित्र कार्य अविरत सुरू आहे समाजाच्या कुठल्याही समस्या असो दिंन दलीत गोरगरीब शेतकरी शेतमजूर अठरापगड जातीच्या लोकांच्या सेवा असो लहान विद्यार्थ्यांना गणवेश वाटप असून नोटबुक वाटप असो की आजारी रुग्णांना फळ वाटप असो गावातील सांडपाण्याचा प्रश्न असो स्वच्छ करण्याचा प्रश्न असो की फवारणीचा प्रश्न असो केवळ एक संस्था म्हणून कार्यरत नसून ही सामाजिक संस्था म्हणून कार्यरत आहे याचे सर्व कारण या गावातील संपूर्ण नागरिकाचे सहकार्य नेहमी आमच्या संस्थेला मिळत राहते.

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री.गणेश शेंडे, उपाध्यक्ष गणेश वझे, कोषाध्यक्ष शंकर कामतवार, सचिव पंकज बावणे, संघटक सचिनजी बोंडे, सहसचिव श्रीकांत पतंगे तसेच तुषार बोबडे, अजय उपाध्ये, रघुनाथ धोंगडे, साहिल, अरविंद पथाडे, बाबूजी कामतवार, मंगेश पचारे, अनिल कामतवार, बोरसरे, राजन धाबेकर, स्वप्निल झाडे, महेश किनाके, दिपक पेदोर, पंकज धोटे व समस्त गावकरी यांच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन कार्यक्रम संपन्न झाला.

# मनपा आरोग्य विभागामार्फत शाळांमध्ये डेंग्यू विषयी जनजागृती

## मनपातर्फे घरोघरी कंटेनर सर्वे

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे राष्ट्रीय कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत डेंग्यू प्रतिरोधक मोहीम पुर्ण क्षमतेने राबविली जात असुन शासकीय तसेच खाजगी शाळांमध्ये मनपा वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्यांमार्फत डेंग्यू विषयी जनजागृती केली जात आहे.



या जनजागृतीमध्ये शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, शालेय विद्यार्थी व पर्यायाने सर्व घरी कीटकजन्य आजारांविषयी जनजागृती करण्यात येत असुन गप्पी मासे हे डेंग्यूवर कसे प्रभावी ठरतात याचे प्रात्यक्षिक आरोग्य बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांमार्फत दाखविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना डेंग्यू कसा पसरतो, त्याची लक्षणे कोणती, आणि त्यापासून बचाव कसा करायचा याबद्दल माहिती दिली जाते. तसेच, शाळांमध्ये डासांची उत्पत्ती थांबवण्यासाठी काय उपाययोजना करायच्या, याबाबत मार्गदर्शन केले जाते. आठवड्यातुन एक दिवस पालकांच्या मदतीने पाणी साठवलेली भांडी तपासणे, कुलर, फ्रिज, फिश पॉट, पाण्याची टाकी तपासणे, डासअळी आढळल्यास पालकांच्या मदतीने भांडे कोरडे करणे व कापडाने पुसुन घेणे इत्यादी कार्यांद्वारे डासोत्पत्ती स्थाने नष्ट करणे ही सर्व कार्ये पालकांच्या उपस्थितीत करण्याचे आवाहन केले जात आहे.

२८ ब्रिडींग चेकर्स, ३२ एएनएम, २२ एमपीडब्लु व १७० आशा वर्कर तसेच स्वच्छता निरीक्षक यांच्याद्वारे डासोत्पत्ती स्थाने तपासणी मोहीम सुरु मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे, घरातील कूलर, टायर, कुंड्या खालील प्लेट, फ्रीज खालील ट्रे, पाण्याचे ड्रम, फिश टँक, एसीचे पाणी पडणारे कंटेनर, भंगारातील वस्तु, डबे इत्यादी डासांच्या उगमस्थानांची तपासणी केली जात आहे. स्वच्छता विभागामार्फत आठवड्यातुन एकदा शहरात प्रत्येक जागी धुरळणी व फवारणी करण्यात येत आहे. गप्पी मासे प्रजनन केंद्रांची निर्मिती करण्यात येऊन पाणी साचलेल्या जागी गप्पी मासे सोडणे अथवा प्रतिबंधात्मक द्रावण सोडण्यात येत आहे.

### डेंग्यु टाळण्यास उपाययोजना

डेंग्यु डास हा स्वच्छ व साचलेल्या पाण्यात आढळतो त्यामुळे आपल्या घराची तपासणी करावी . पाणी साठवण्याची भांडी कोरडी करणे, डासअळी आढळल्यास अबेट द्रावण टाकणे, पाणी साठा मोठा असले तर त्यात गप्पी मासे टाकणे आवश्यक आहे. गप्पी मासे पाण्यातील डासांची अंडी संपवितात ज्याने डासांचा प्रादुर्भाव कमी होतो. आठवड्यातून एक दिवस हा कोरडा दिवस पाळावा.

### डासांची उगमस्थाने

पावसात मोकळे भूखंड, बंद घराची छते, चालु बांधकामाची ठिकाणे, घरी वापर नसलेली ठिकाणे, कूलर, टायर, फ्रिज, फिश पॉट, भंगारातील वस्तु, डबे, स्वच्छ परंतु अनेक दिवसांपासुन जमा असलेले पाणी इत्यादी ठिकाणे डासांची उगमस्थाने आहेत.

### डेंग्युची लक्षणे

डासांमुळे पसरणाऱ्या आजारांमध्ये डेंग्यूताप व डेंग्यू रक्तस्रावी ताप हे मुख्य आजार आहेत. ताप येणे, अंगावर पुरळ येणे, डोळयाच्या खोबणीमधे दुखणे, पाठदुखी, डोकेदुखी, स्नायूमध्ये वेदना, सांधेदुखी ही डेंग्यूची प्रमुख लक्षणे आहेत. वस्तुतः डेंग्यू हा सामान्य आजार आहे परंतु या रोगाबाबत माहिती नसल्याने किंवा अपुरी माहिती असल्याने काही वेळा तो जीवघेणा ठरू शकतो.

# पीएम श्री सावित्रीबाई फुले शाळेचे यश शिष्यवृत्ती परीक्षेत ९ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत




**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. १४ जुलै :** पीएम श्री सावित्रीबाई फुले उच्च प्राथमिक व माध्यमिक मनपा शाळेने यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत मोठे यश मिळवले असुन शाळेतील इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शिष्यवृत्तीस पात्रता मिळवली आहे.

राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत या शाळेच्या उत्तीर्ण १२ पैकी इयत्ता पाचवीतील अक्षित सुहास त्रिपतीवार तर इयत्ता आठवीतील भूमिका पवन निखाडे, कल्याणी संतोष आंबटकर, करण वामन पंधरे, केसीकौर केवलसिंग भोयर, कुमकुम नितेश शास्त्रकार, रिंपा विश्वजीत मुजुमदार, रोझीना रियाझुल सिद्दिकी, सोहम राजू सोरते असे एकुण ९ विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत यश प्राप्त केले आहे. तर राष्ट्रीय ?बॅकस स्पर्धेत शाळेच्या आवेश हसन शेख याने प्रथम तर गणेश अनिल ठाकरे याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात येते. दरवर्षी या परीक्षेत महानगरपालिकेचे हजारो विद्यार्थी सहभागी होतात. ही परीक्षा यंदा ९ फेब्रुवारी २०२५ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी घेण्यात आली होती. विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग वाढावा तसेच निकालात वृद्धी व्हावी, यासाठी महानगरपालिकेचा शिक्षण विभाग विविध उपक्रम राबवित असतो. गेल्या तीन वर्षांपासून शिष्यवृत्ती परीक्षेत महानगरपालिका शाळातील विद्यार्थ्यांचा यशाचा आलेख उंचावत आहे. शाळांमध्ये मागील काही वर्षांपासून शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी वर्गातच करून घेतली जाते. शिक्षकांसाठी कार्यशाळा आयोजित केली जाते. तज्ज्ञ शिक्षकांमार्फत ऑनलाइन शिष्यवृत्ती मार्गदर्शन वर्ग घेतले जातात. या नियोजनबद्ध तयारीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या यशात स्पष्टपणे दिसून येत असल्याचा विश्वास आयुक्त विपिन पालीवाल यांनी व्यक्त केला.

आयुक्त विपिन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात अतिरिक्त आयुक्त चंदन पाटील, उपायुक्त मंगेश खवले यांच्या प्रेरणेने व मुख्याध्यापक नागेश नित यांच्या प्रयत्नाने शाळेला यश प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्राविण्य मिळविण्यात पाचवीचे वर्ग शिक्षक अजय माडोत, प्रणिता देशमुख तसेच आठवीचे वर्ग शिक्षक जोगेश्वर मोहारे, विषय शिक्षक सचिन रामटेके आणि मंगेश अंबादे यांचा मोलाचा वाटा आहे.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक
मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३
※ स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी ※ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)




# मस्त दही रवा सँडविच

**झटपट रेसिपी**

मित्रांनो, नाश्त्याचा प्रश्न आपल्यापुढे आ वासून उभा असतो. तेच ते पदार्थ खाऊन कंटाळा आलेला असतो. अशा वेळी तुम्ही दही रवा सँडविच बनवू शकता.

**सामग्री:** ६ ब्रेड स्लाईस, एक कप रवा, एक कप दही, दोन हिरव्या मिरच्या, एक चमचा आल्याची पेस्ट, चिरलेली कोथिंबिर, तेल आणि चवीनुसार मीठ


**कृती:** हिरव्या मिरच्या बारीक चिरून घ्या. एका भांड्यात दही घेऊन त्यात रवा घाला. हे मिश्रण एकजीव करून दहा मिनिटं झाकून ठेवा. यानंतर त्यात हिरव्या मिरच्या, कोथिंबिर, आल्याची पेस्ट आणि मीठ घाला. प्रत्येक ब्रेड स्लाईसचे दोन त्रिकोणी काप करा. प्रत्येक त्रिकोणी तुकड्याच्या दोन्ही बाजूंना दही आणि रव्याचं मिश्रण लावून घ्या. गॅसवर तवा ठेवा. त्यावर तेल घाला. आता दही रव्याचं मिश्रण लावलेले ब्रेड सोनेरी रंगावर दोन्ही बाजूंनी भाजून घ्या. सॉस किंवा चटणीसोबत खा.



# रात्री अभ्यास करताय?

**स्टडी टिप्स**

सकाळी लवकर उठून अभ्यास करणे सगळ्यांनाच शक्य होत नाही. काही विद्यार्थ्यांना सकाळी जाग येत नाही तर काहीजणांना शाळा, कॉलेज, ट्युशन किंवा इतर जबाबदाऱ्या सांभाळताना सकाळची वेळ पाळता येत नाही. अशा वेळी रात्रीचा अभ्यास हा एक चांगला पर्याय ठरतो. रात्री वातावरण शांत



असते तसेच फोनचे आणि बाहेरचे व्यत्यय कमी असतात. त्यामुळे मेंदू अधिक एकाग्र राहतो आणि अभ्यासाची गुणवत्ता सुधारते. मात्र रात्री अभ्यास करताना काही महत्त्वाच्या टिप्स लक्षात घेतल्या, तर त्या अधिक फायदेशीर ठरतात.

*** चांगली झोप**

दिवसभराची झोप पूर्ण झाल्याशिवाय रात्री अभ्यास करणे कठीण ठरते. काही कारणाने झोप कमी झाली तर थकवा आणि डोळ्यांवर ताण येतो आणि एकाग्रता साधता येत नाही. त्यामुळे रात्री अभ्यास करायचा असेल तर दिवसा ६-७ तासांची शांत झोप घेणे अत्यावश्यक आहे. झोप पूर्ण झाल्यास मेंदू अधिक ताजातवाना राहतो आणि अभ्यास करत राहण्याची क्षमता वाढते.

*** कॉफी**

रात्री अभ्यास करताना झोप येते. अशावेळी कॉफी किंवा ग्रीन टीसारखे पेय मेंदूला सतर्क ठेवतात. विशेषतः कॅफेनमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहतो आणि झोप दूर राहते. मात्र कॉफीचा अतिरेक टाळा. दिवसभरात १-२ कप कॉफी पुरेशी आहे. जास्त कॅफेनमुळे झोपेचे चक्र बिघडू शकते.

*** प्रकाश**

अनेक वेळा विद्यार्थी फक्त टेबल लॅम्प लावतात आणि इतर खोली अंधारात ठेवतात. यामुळे झोप येण्याची शक्यता वाढते. अंधार झोपेस प्रोत्साहन देतो. त्यामुळे संपूर्ण खोलीमध्ये सौम्य पण समप्रकाश असावा. अभ्यास करताना डोळ्यांवर ताण येऊ नये यासाठी प्रकाश थेट पुस्तकावर पडणे आवश्यक आहे. डोळ्यांची काळजी घेतली, तर अभ्यास अधिक वेळ करता येतो.

*** बिछान्यावर अभ्यास करू नये**

बिछान्यावर किंवा गादीवर बसून अभ्यास करणे टाळा. यामुळे शरीर रिलॅक्स मोडमध्ये जाते आणि झोप येते. त्याऐवजी खुर्चीवर बसून, पाठ सरळ ठेवून अभ्यास करा. दर काही वेळाने थोडे चालणे, स्ट्रेचिंग करणे यामुळे रक्तप्रवाह सुरळीत राहतो आणि मेंदू अधिक ॲक्टिव्ह राहतो. अशा सवयी मेंदूची कार्यक्षमता वाढवतात आणि अभ्यासात सातत्य ठेवता येते.

# दिवसाला ४० हजाराचे उत्पन्न!

**अचिव्हर**



केरळमधील लीना आणि जितू ही आई-मुलाची जोडी मशरूम शेतीतील यशामुळे चर्चेत आली आहे. त्यांच्या यशाचा मंत्र म्हणजे सातत्य, जिद्द आणि अथक मेहनत. प्रामाणिक प्रयत्न असतील आणि कामाविषयी उत्कटता असेल तर यश मिळणे निश्चित असते.

लीना थॉमस आणि जितू थॉमस यांनी हा व्यवसाय एक छोटा छंद म्हणून सुरू केला होता. मात्र काळानुरूप त्याचा विस्तार केला आणि तो एक नफा देणाऱ्या व्यवसायात रूपांतरित झाला. हा प्रवास जितूने त्याच्या आईबरोबर फार साध्या पद्धतीने एका मशरूम बेडपासून सुरू केला. छंद म्हणून सुरू झालेला उपक्रम लवकरच अर्धवेळ व्यवसायात बदलला. अनेक प्रयोग, चुकांमधून शिकत त्यांनी यामध्ये नवनवीन कौशल्ये आत्मसात केली. त्यानंतर त्यांनी उच्च-घनतेची मशरूम शेती आणि 'स्पॉन लॅब' स्थापन केली. त्यामुळे अर्धवेळ व्यवसायाचे रूपांतर पूर्णवेळ यशस्वी उद्योगात झाले.

पिरावोम येथे असलेले 'लीनाज मशरूम फार्म' तब्बल पाच हजार चौरस फुटांवर पसरले आहे. या फार्ममध्ये जवळपास वीस हजार मशरूम बेड्स असून महिन्याला चार टन ताजे मशरूम उत्पादन होते. येथे १५ कामगार कार्यरत आहेत. त्यात ऐंशी टक्के महिला कर्मचारी आहेत. मशरूम शेतीसाठी तीस अंश सेल्सिअसपेक्षा कमी तापमान आवश्यक असते. या गरजेनुसार फार्मची रचना करण्यात आली आहे. त्यामुळे एका मर्यादित जागेत अधिक बेड ठेवणे शक्य झाले आहे.

मशरूम पीक अत्यंत नाजूक असते. तापमानातील लहानश्या बदलामुळे किंवा कीटकांमुळे संपूर्ण पीक नष्ट होऊ शकते. यासाठी लीना आणि जितू सातत्याने मशरूमची काळजी घेतात आणि उच्च गुणवत्तेचे पालन करतात. या व्यवसायातून लीना आणि जितू रोज सरासरी ४० हजार रुपये कमवतात. मशरूम थेट किरकोळ विक्रेत्यांना विकले जात असल्याने कोणताही मध्यस्थ नसतो आणि चांगला नफा मिळतो. ताज्या मशरूम व्यतिरिक्त लीना आणि जितू मशरूम स्टार्टर किट्स, स्पॉन, ग्रो रूम, बेड आणि शेतीसंबंधी मार्गदर्शन सेवाही देतात. येथे शेतकऱ्यांना मशरूम शेतीबद्दल मार्गदर्शन केले जाते. लीना आणि जितू यांची कहाणी नव्या पिढीला शेतीमध्ये करिअर घडवण्याची प्रेरणा देते. या मायलेकाच्या कष्टातून कल्पकतेच्या साह्याने शेतीला आधुनिकतेची जोड देत साध्या छंदाला यशस्वी व्यवसायात कसे रूपांतरित करता येते, याचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

# करिअर 'क्लाउड कॉम्प्युटिंग'मधलं

**वेगळ्या वाटा**

'क्लाउड कॉम्प्युटिंग'च्या क्षेत्रात सध्या बऱ्याच संधी निर्माण झाल्या आहेत. सध्याच्या काळात बऱ्याच कंपन्या कॉम्प्युटिंगला पब्लिक क्लाउडवर आणत आहेत. 'क्लाउड कॉम्प्युटिंग' ही एक प्रणाली आहे. यात सर्व्हर्स, स्टोरेज, डेटाबेस, नेटवर्किंग, सॉफ्टवेअर, ॲनालिटिक्स आणि इंटेलिजन्ससारख्या सेवा इंटरनेटच्या माध्यमातून दिल्या जातात. 'गुगल क्लाउड', 'ॲमेझॉन वेब सर्व्हिसेस' आणि 'मायक्रोसॉफ्ट एज्योर' या क्लाउड कॉम्प्युटिंग क्षेत्रातल्या मोठ्या कंपन्या आहेत. खाजगी क्लाउड्सही आपल्या सेवा देत आहेत. त्यांचाही बराच वापर केला जातो. 'एचपी' आणि 'आयबीएम'सारख्या जुन्या आयटी इन्फ्रास्ट्रक्चरसोबतच 'न्यूटॅनिक्स'सारखे नवे गडीही सेवा देत आहेत.

म्हणूनच आजच्या काळात 'क्लाउड कॉम्प्युटिंग' हे अपस्किलिंगसाठी अत्यंत योग्य असं तंत्रज्ञान मानलं जातं. आयटी क्षेत्रात सध्या 'क्लाउड सोल्यूशन आर्किटेक्ट्सना सर्वाधिक वेतन दिलं जातं.

इंजिनिअरींग क्षेत्राशी संबंधित विद्यार्थी क्लाउड कॉम्प्युटिंगमध्ये करिअर करू शकतात. यासोबतच 'जावा लँग्वेज' वर प्रभुत्व असणाऱ्यांसाठीही हे क्षेत्र खुलं आहे. क्लाउड कॉम्प्युटिंगच्या क्षेत्रात 'लॉजिकल रिजनिंग'चं ज्ञान उपयोगी पडेल.




क्लाउड कॉम्प्युटिंगचं ज्ञान मिळवण्याआधी विद्यार्थ्यांना प्राथमिक प्रोग्रामिंग शिकावं लागेल.

क्लाउड कॉम्प्युटिंगचे ऑनलाईन अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. यासोबतच 'गुगल क्लाउड', 'एज्योर' आणि 'एडब्ल्यूएस'सारख्या व्यासपीठांकडूनही तुम्ही प्रमाणपत्रं मिळवू शकता.



# कधी करायचा योगा?

**फिटनेस फंडा**

योगामुळे शारीरिक, मानसिक आणि भावनिक आरोग्य उत्तम रहातं. अधिकाधिक लाभ मिळवण्यासाठी योगा ठराविक वेळी करायला हवा, असं काहींचं म्हणणं आहे. मात्र योगाची नेमकी वेळ कोणती, ठराविक वेळी योग केल्यानेच लाभ होतात का, याबाबत जाणून घेऊ.

योगासनं सकाळच्या वेळी करायला हवीत, असं काही तज्ज्ञ सांगतात. पण ही बाब प्रत्येकाला लागू पडतेच असं नाही. काहीजण रात्री जागतात. त्यांना सकाळी उठणं शक्य नसतं. अशावेळी संध्याकाळीही योगा करता येतो. मुळात योगासनांची योग्य अशी वेळ नसतेच. प्रत्येकाने जीवनशैलीनुसार योगाची वेळ ठरवावी. प्रत्येक वेळेचे लाभ आणि दुष्परिणाम आहेत.

सकाळच्या वेळात योगा केल्याने दिवसाची चांगली सुरूवात होते. चयापचय क्रिया सुधारते, रक्तातल्या साखरेचं प्रमाण नियंत्रणात रहातं आणि दिवसभर पचनसंस्थेचं कार्य उत्तम पद्धतीने सुरू रहातं. सकाळच्या योगामुळे तुमचा मूड चांगला रहातो. उत्साह टिकतो. मनही शांत रहातं. सकाळी योगा केल्याने आपण स्वत:शी जोडले जातो. दुसरीकडे सकाळच्या वेळात आपले स्नायू, हाडं, सांधे ताठर असल्यामुळे आसनं करायला त्रास होऊ शकतो.

संध्याकाळी योगा करताना आपण निवांत असतो. शरीराही मोकळं झालेलं असतं. अशावेळी कठीण आसनंही करता येतात. अनेकांना सकाळपेक्षा संध्याकाळी जास्त उत्साही वाटतं. संध्याकाळी योगा केल्याने अन्नपचन होतं. रात्री शांत झोप लागते. मात्र तीव्र स्वरुपाच्या योगामुळे झोपेत अडथळे येऊ शकतात. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या सोयीनुसार योगा करावा.



# नातं पुढे सुरू ठेवावं का?

**मॅच मेकिंग**

गेल्या तीन वर्षांपासून मी एका मुलाच्या प्रेमात आहे. आम्हाला लग्नही करायचं आहे. पण त्याचं कुटुंब खूप जुनाट विचारांचं आहे. त्याने प्रामाणिकपणे मला हे सगळं सांगितलं. त्यांच्या आदर्श सुनेच्या काही कल्पना आहेत. लग्नानंतर मला पारंपरिक वेशातच रहावं लागेल. शिक्षिकेची नोकरी पत्करून घराकडे जास्त लक्ष द्यावं लागेल. घरातली सगळी कामं सुनेनेच करावी अशी त्यांची अपेक्षा आहे. माझं या मुलावर खूप प्रेम आहे. पण मला माझं बँकिंगमधलं बहरणारं करिअर सोडायचं नाही. मी त्यांचा आदर करते. पण यासाठी मी माझी जीवनशैली बदलू शकत नाही. अशा परिस्थितीत मी या मुलाशी लग्न करावं का? मला तो आवडतो. त्याच्याशी ब्रेक अप झाल्यामुळे मला खूप वाईट वाटेल. मी काय करू?

– तुला वाटणारी काळजी अगदी स्वाभाविक आहे. करिअर, भविष्य पणाला लावता येणार नाही. तुझी ध्येयं, उद्दिष्टं स्पष्ट असतील तर याविषयी प्रियकराशी बोल. यातून सुवर्णमध्य काढणं शक्य असेल तरच हे नातं पुढे नेण्यात अर्थ आहे. तसं होणार नसेल तर हे सगळं इथेच थांबवलेलं बरं.

**ॲप वर्ल्ड**

## व्हॉट्सअॅपचे नवे फीचर





व्हॉट्सअॅपचे नवीन 'एआय सम राइज फीचर' ग्रुप चॅट आणि पर्सनल मेसेज दोन्हीसाठी काम करेल. म्हणजे मित्रांचे ग्रुप चॅट असो किंवा ऑफिसमधील महत्त्वाचे मेसेज, आता तुम्हाला प्रत्येक मेसेज न उघडता काय चालले आहे हे कळेल. हे फीचर तुम्हाला अद्याप न वाचलेल्या सर्व मेसेजची झलक देईल. कोणतीही महत्त्वाची माहिती चुकवावी लागणार नाही आणि तुम्ही नेहमीच अपडेट राहाल. व्हॉट्सअॅप नेहमीच गोपनीयता धोरणाबद्दल गंभीर असते. या वेळीही कंपनीने युजर्सची वैयक्तिक माहिती पूर्णपणे सुरक्षित असेल, असे स्पष्ट केले आहे. हे नवीन एआय फीचर प्रायव्हेट प्रोसेसिंग नावाच्या तंत्रज्ञानावर काम करते. यात तुमचे संभाषण फक्त तुमच्यासाठीच राहील याची खात्री देण्यात आली आहे. व्हॉट्सअॅपच्या मते ही प्रक्रिया 'ट्रस्टेड एक्झिक्युशन एन्व्हायर्नमेंट' (टीईई) नावाच्या सुरक्षित प्लॅटफॉर्मवर होते. त्यामुळे डेटा पूर्णपणे खासगी आणि सुरक्षित राहतो. या नवीन फीचरबद्दल आणखी एक खास गोष्ट म्हणजे ते केवळ संदेशाचा सारांशच देणार नाही, तर कोणते संदेश महत्त्वाचे आहेत आणि कोणते त्वरित वाचण्याची आवश्यकता नाही हेदेखील सुचवेल. याचा अर्थ तुमचा वेळ वाचेल आणि महत्त्वाचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचेल.

**टेक टॉक**

## व्हॉट्सअॅप अकाऊंट दोन फोन्सवर!

तुम्हाला एकाच वेळी दोन वेगवेगळ्या स्मार्टफोनवर एकच व्हॉट्सअॅप अकाऊंट वापरायचे असेल तर आता ते शक्य आहे. पूर्वी हे करणे कठीण होते. कारण पूर्वी फक्त एकाच फोनवर व्हॉट्सअॅप चालवण्याची परवानगी देत असे. पण आता कंपनीने एक नवीन फीचर आणले आहे. त्यामुळे हे काम खूप सोपे झाले आहे. आता व्हॉट्सअॅपच्या मल्टी-डिव्हाइस फीचरमुळे तुम्हाला एकाच वेळी चार डिव्हाइसवर एकच अकाऊंट वापरण्याची परवानगी मिळते आणि यामध्ये दुसऱ्या स्मार्टफोनचा समावेश आहे.




म्हणजेच, आता तुम्हाला फक्त एका फोनपुरते मर्यादित राहण्याची आवश्यकता नाही. दोन फोनवर एक व्हॉट्सअॅप अकाउंट वापरण्यासाठी तुम्हाला कोणत्याही हॅक किंवा थर्ड पार्टी अॅपची आवश्यकता नाही. फक्त काही सोप्या स्टेप्स फॉलो करा:

१. दुसऱ्या फोनवर व्हॉट्सअॅप इंस्टॉल करा. लक्षात ठेवा, इन्स्टॉल करताना त्यात तुमचा नंबर टाकू नका. २. लिंक टू एक्झिस्टिंग अकाऊंट निवडा हा पर्याय अॅपच्या वेलकम स्क्रीनवर दिसेल, त्यावर टॅप करा. ३. आता त्या फोनच्या स्क्रीनवर एक क्यूआर कोड दिसेल. ४. तुमच्या मुख्य फोनवरून स्कॅन करा. आधीच व्हॉट्सअॅप सुरू असलेल्या फोनच्या सेटिंग्जमध्ये जा. लिंक्ड डिव्हाइसेस पर्यायावर क्लिक करा. आता क्यूआर कोड स्कॅन करा. हे केल्यानंतर, तुमचे व्हॉट्सअॅप दोन्ही फोनमध्ये सक्रिय होईल. सर्व चॅट्स, मेसेजेस आणि मीडिया दोन्ही फोनमध्ये सिंक राहतील. क्यूआर कोड पर्याय दिसत नसेल तर तुम्ही व्हॉटस्प वेब पर्यायदेखील वापरून पाहू शकता. याद्वारे तुम्ही दुसऱ्या फोनमधील ब्राउझरद्वारे व्हॉट्सअॅपदेखील वापरू शकता. व्हॉट्सअॅपचे हे मल्टी-डिव्हाइस वैशिष्ट्य एंड-टू- एंड एन्क्रिप्शनसह येते. याचा अर्थ तुमचे वैयक्तिक चॅटस् आणि कॉल पूर्णपणे सुरक्षित असतील.

**जाणून घ्या**

## स्विच सुरूच ठेवताय?



फोन चार्जिंगमधून काढल्यानंतर स्विच बंद न करण्याची सवय असेल तर ती ताबडतोब बदला. चार्जर फोनशी कनेक्ट केलेला नसतानाही वीज वापरत राहतो. चार्जरमध्ये वापरलेले सर्किट आणि ट्रान्सफॉर्मर सक्रिय आणि चार्जिंगसाठी तयार राहिल्यामुळे असे घडते. याला स्टँडबाय पॉवर किंवा व्हँपायर पॉवर असेही म्हणतात. व्हँपायर पॉवर म्हणजे सॉकेटमध्ये प्लग केलेले, परंतु वापर नसलेले उपकरण कमी प्रमाणात वीज वापरते. चार्जर, टीव्ही आणि संगणक यासारख्या उपकरणाचा प्लग सॉकेटमध्ये असेल आणि स्विच सुरू असेल, पण तुम्ही ते उपकरण वापरत नसाल तरी वीज वापर वाढू शकतो आणि त्यामुळे वीज बिल वाढू शकते.





# निसर्गाच्या सानिध्यात जा

**भटकंती**

तुम्हाला रोजच्या धावपळीतून कुठे तरी शांत व कमी गर्दीच्या ठिकाणी जायचे असेल तर तामिळनाडू राज्यात लपलेले रत्न कोटागिरी स्टेशन तुमच्यासाठी एक योग्य ठिकाण असू शकते. जुलैमध्ये येथील हवामान खूप आल्हाददायक असते. तुम्हाला पावसाळ्यात डोंगराळ भागामध्ये फिरायला जायचे असेल आणि तेथील निसर्गाचा आनंद घ्यायचा असेल, तर कोटागिरी हा एक उत्तम पर्याय आहे.

निलगिरी पर्वतरांगांच्या तिसऱ्या सर्वोच्च शिखरावर असलेले कोटागिरी हे समुद्रसपाटीपासून सुमारे एक हजार आठशे मीटर उंचीवर वसलेले आहे. येथून तुम्हाला दऱ्याखोऱ्यांचे विहंगम दृश्य पाहायला मिळेल. या हिल स्टेशनचे वैशिष्ट्य म्हणजे ते उटी आणि कुन्नूर सारख्या प्रसिद्ध हिल स्टेशनपासून थोडे दूर आहे. त्यामुळे येथे तुलनेने कमी गर्दी असते आणि तुम्हाला अतिशय शांत, प्रदूषणमुक्त वातावरणात निसर्गाचे खरे सौंदर्य पाहायला मिळते. जुलैमध्ये पावसाच्या हलक्या सरी डोंगरांवर पडतात तेव्हा कोटागिरीच्या दऱ्या अधिक हिरव्या आणि फ्रेश दिसतात. या ऋतूत येथील चहाचे मळे, उंच देवदाराची झाडे, धुक्यानी वेढलेले पर्वत आणि विस्तीर्ण जंगले हे अधिकच जादुई दिसतात. पावसाळ्यात येथील धबधबे पूर्ण क्षमतेने वाहतात आणि हे सौंदर्य पाहून मन मंत्रमुग्ध होते.

या हिल स्टेशनवरील कॅथरीन फॉल्स हा धबधबा अडीचशे फूट उंचीवरून पडतो आणि आजूबाजूचे दृश्य इतके अद्भुत आहे की तुम्ही लगेच तुमच्या कॅमेऱ्यात कैद केल्याशिवाय राहणार नाही. हा धबधबा एक शांत वातावरणात वसलेला आहे आणि ट्रेकिंग प्रेमींसाठी एक उत्तम ठिकाण आहे. कोटागिरीमध्ये अनेक सुंदर ट्रेल्स आहेत जिथे तुम्ही ट्रेकिंग किंवा लांब चालण्याचा आनंद घेऊ शकता. विशेषतः कोटागिरी ते रंगास्वामी शिखरापर्यंतचा ट्रेक ॲडव्हेंचरने भरलेला आहे. येथून तुम्ही सूर्यास्त आणि सूर्योदय पाहू शकता.

निलगिरी टेकड्यांवर असलेल्या चहाच्या बागांना भेट दिल्याने एक वेगळीच शांतता मिळते. तुम्ही येथील ताज्या चहाचा आस्वाद घेऊ शकता आणि चहा उत्पादनाची प्रक्रिया जवळून पाहू शकता.

**येथे पोहोचायचे कसे?**

येथे ट्रेनने जायचे असेल तर सर्वात जवळचे रेल्वे स्टेशन मेट्टुपलयम आहे. ते कोटागिरीपासून सुमारे ३३ किलोमीटर अंतरावर आहे. येथून कोटागिरीला टॅक्सी किंवा लोकल बसने जाता येते. सर्वात जवळचे विमानतळ कोइम्बतूर आहे.

# फॅशनच्या युगात भरतकामाचे रंग

**फॅशन पॅशन**



फॅशन च्या युगात डिझाइन आणि पॅटर्नमध्ये दररोज नवे प्रयोग केले जात आहेत. विशेषतः भरतकामात आजकाल बरेच काम केले जात आहे. भरतकामाचा समावेश सदाबहार डिझाइनमध्ये केला जात असला तरी, फॅशन आणि तंत्रज्ञानाच्या ट्रेंडमध्येही डिझायनर्स काम करत आहेत. याअंतर्गत आता शहरात उपलब्ध असलेल्या कपड्यांमध्येही देश आणि वेगवेगळ्या राज्याचे भरतकाम दिसून येते. भरतकामाच्या कलेला शक्य तितके प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी ३० जुलै रोजी जागतिक भरतकाम दिन साजरा केला जातो. भरतकामावर आधारित डिझाइन्स फॅशन ट्रेंड वाढवत आहेत. विद्यार्थी नावीन्यपूर्ण गोष्टी करत आहेत. शहरात कार्यरत असलेल्या महाविद्यालयांच्या फॅशन टेक्नॉलॉजी आणि टेक्सटाइल विभागांमध्ये मुले नावीन्यपूर्ण आणि प्रायोगिक डिझाइन्स आणि ड्रेसेसवर काम करत आहेत. ट्रेंडसोबतच आता रेशमी आणि सुती धाग्यांसह स्टोन, कुंदन, मोती आणि तारेदेखील वापरले जात आहेत. यासोबतच बाटिक, वाघ आणि आदिवासी प्रिंट फॅब्रिक्समध्येही भरतकाम केले जात आहे.

शहरातील मुलींमध्ये, कुर्ती आणि सूटमध्ये भरतकामाचा पॅटर्न सर्वाधिक पसंत केला जात आहे. शॉर्ट कुर्तीमध्येही पुन्हा एकदा भरतकामाचा पॅटर्न लोकप्रिय होत आहे. 'एव्हरग्रीन पॅटर्न'मध्ये भरतकामाचा समावेश आहे. परंतु थंड आणि आरामदायी लूकसाठी, आजकाल शॉर्ट कुर्तीमध्ये ते खूप पसंत केले जात आहे. शहरात वेगवेगळ्या शैलीमध्ये भरतकाम केलेले कपडे उपलब्ध आहेत. यामध्ये कर्नाटकच्या कुसुट्टी आणि काश्मिरी डिझाइनची एक विशेष श्रेणी समाविष्ट आहे. फॅशन डिझायनर्सच्या मते भरतकाम फार महाग नाही. त्यामुळे त्यात बरेच नावीन्यपूर्ण काम करता येते.

# जनसुरक्षा कायद्यावर वंचितचे आक्षेप

## बावनकुळे यांना लिहिले लांबलचक पत्र : कायद्याच्या हेतूवर शंका



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १४ :**
ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वातील वंचित बहुजन आघाडीने महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयकावर तीव्र आक्षेप घेतला आहे.

पक्षाने यासंबंधी या विधेयकावरील संयुक्त निवड समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना एक लांबलचक पत्र लिहिले आहे. त्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध विधानांचा दाखला देत प्रस्तुत विधेयक दडपशाहीपूर्ण, मनमानी, संविधानविरोधी, अस्पष्ट, अतिशय सरसकट व गैरवापरास अत्यंत अनुकूल असल्याचा आरोप केला आहे.

वंचितने आपल्या पत्रात म्हटले आहे की, आम्ही वंचित बहुजन आघाडीचे सदस्य, दिनांक ८ मार्च २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या आपल्या सूचनेच्या अनुषंगाने आपल्याशी पत्रव्यवहार करत आहोत. सदर सूचनेद्वारे महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ (क्रमांक ३३), जो जुलै २०२४ मध्ये महाराष्ट्र विधिमंडळात सादर करण्यात आला, यावरील आक्षेप व सूचना मागविण्यात आल्या होत्या.
आम्ही या विधेयकावर आमचे आक्षेप व चिंता सादर करत आहोत आणि यासंदर्भात जर वैयक्तिकरित्या तोंडी निवेदन सादर करण्याची संधी दिली गेली, तर त्यामध्ये आवश्यकतेनुसार बदल किंवा पूरक मुद्दे मांडण्याचा आमचा अधिकार राखून ठेवत आहोत. आमचे हे आक्षेप सार्वजनिक क्षेत्रात उपलब्ध असलेल्या विधेयकाच्या प्रतीवर आधारित आहेत.
वंचित बहुजन आघाडीचे सदस्य म्हणून आम्ही हे विधेयक तात्काळ मागे घेण्याची मागणी करतो, कारण हे विधेयक दडपशाहीपूर्ण, मनमानी, संविधानविरोधी, अस्पष्ट, अतिशय सरसकट आणि गैरवापरास अत्यंत अनुकूल आहे.
हे विधेयक जर कायदा म्हणून लागू झाले, तर ते आपल्या लोकशाहीच्या मूलभूत तत्वांवरच घाला घालणारे ठरेल, जसे की नागरी स्वातंत्र्य, अभिव्यक्ती व मतस्वातंत्र्याचा अधिकार, संघटना व एकत्र येण्याचा अधिकार आणि शांततामय मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार.
या विधेयकाच्या हेतू आणि कारणांमध्ये, मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीसह असे नमूद केले आहे की शहरी भागांतील नक्षलवाद आणि नक्षलवादी संघटनांच्या पुढील गटांचा सामना करण्यासाठी हे कायदेविषयक उपाय योजले जात आहेत.
मात्र, या विधेयकात शहरी नक्षल हा कायदेशीर परिभाषेत नसलेला आणि फक्त विरोधकांवर सामाजिक व राजकीय कलंक लावण्यासाठी वापरला जाणारा अपमानास्पद शब्द वापरण्यात आला आहे, जो केवळ सरकारच्या धोरणांवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या किंवा विरोध व्यक्त करणाऱ्या व्यक्ती व संघटनांना चुप करण्यासाठी वापरला जातो.
आम्हाला चिंता आहे की,नक्षलवाद या सबबीखाली हे विधेयक सरकारविरोधी आवाज दाबण्यासाठी वापरण्यात येईल – ज्या व्यक्ती किंवा गटांनी धोरणांवर योग्य प्रश्न उपस्थित केले आहेत, अशांना थांबवण्यासाठी वापरण्यात येईल.

## शेतकऱ्यांच्या कर्जमुक्ती पदयात्रेचा आंबोड्यात समारोप

# सरकारला गुडघ्यावर आणूच : कडू





### शरद पवार गटाचे आ. रोहित पाटील यांनी उपस्थित राहून दिला पाठिंबा

■ **महासागर प्रतिनिधी, यवतमाळ, दि. १४ :**
१४२ किलोमीटरचा संघर्षमय प्रवास पार करून हजारो शेतकरी आणि शेतमजूर जिल्ह्यातील आंबोडा येथे एकत्र आले. जात, धर्म, पंथ विसरून सर्वांनी एकसंध होऊन आम्ही शेतकरी आहोत, या ओळखीवर हजारो शेतकऱ्यांसह सामान्य नागरिक, एकवटले. बच्चू कडू यांच्या सात/बारा कोरा कोरा या पदयात्रेची आंबोड्यातील सभा निर्णायक ठरली, आता लढा निर्णायक टप्प्यावर आला आहे. सरकारला गुडघ्यावर आणल्याशिवाय मागे हटायचं नाही! असा इशार बच्चू कडूं यांनी जनसमुदायासमोर बोलताना दिला.
या आंदोलनाला राजकीय आणि सामाजिक पाठिंबा दिल्याचे याच सभेमध्ये आमदार रोहित पाटील यांनी जाहीर केलं.
बच्चू कडू यांच्या शेतकरी कर्जमुक्तीच्या आंदोलनाला मी तन-मन-धनाने पाठिंबा देतो असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे व स्व. आर.आर. पाटील यांचे सुपुत्र आ. रोहित पाटील यांनी सभेत सांगितले. यावेळी सत्यपाल महाराज म्हणाले, आज शेतकऱ्यांना वाचवणार असेल, तर तो एकमेव बच्चूभाऊ कडू आहे.
बच्चू कडू यांनी शासनाला लक्ष्य करत सांगितले की, राज्य शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे शेतकरी आत्महत्या करत आहे. आणि सरकार आंधळ्याचं सोंग घेत आहे. येत्या २४ जुलैला संपूर्ण महाराष्ट्रात चक्काजाम आंदोलन करण्यात येईल, असा इशारा बच्चूभाऊंनी यावेळी दिला.
सभेनंतर शासनाने हालचाली सुरू केल्या असल्या, तरी शेतकऱ्यांच्या डोळ्यातली आग आणि रस्त्यावरचा रणसंग्राम हे स्पष्टपणे सांगत होते की. हे आंदोलन आता थांबणार नाही, हे आंदोलन फक्त मागणीसाठी नाही हे आहे स्वाभिमानासाठी! सातबारा कोराह्ब ही आता घोषणा उरलेली नाही, ती जनतेची मागणी आणि शासनासाठी आव्हान बनली आहे.

**महामार्ग ठप्प, ट्रॅक्टरचा महासागर**
नागपूर ते कोल्हापूर राज्य महामार्गावर ३ तासांहून अधिक काळ शेतकऱ्यांनी चक्काजाम केला. शेकडो ट्रॅक्टर घेऊन शेतकरी मोर्चात सहभागी झाले होते. काहींनी लाटा, काटा, रुमणे घेऊन शासनाच्या लुटीचा हिशोब मागण्यासाठी मैदानात प्रवेश केला.

## महायुतीच्या आमदाराना परवाने देण्यासाठी

# नवीन दारू दुकानांना परवानगी?



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
राज्य उत्पादक शुल्क विभागाच्या वतीने राज्यामध्ये ३२८ नवीन दारूचे परवाने देण्यात येत आहे.८ महसूली विभागात हे परवाने दिले जाणार आहे. १९७२ पासून असे परवाने राज्यात बंद होते.
राज्याचे उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्राचे मद्य धोरण आखण्यासाठी समिती गठीत करण्यात आली होती. या समितीतील लोकं दारूचे वितरण व पुरवठा व्यवस्था नियंत्रित करत असते. राज्याचा महसूल वाढविण्यासाठी अशाप्रकारे दारूच्या ३२८ नवीन दुकानांना परवाने दिले जात असतील तर ते राज्याच्या दृष्टीने योग्य नाही.
माता - भगिनी यांचा या धोरणाला कठोर विरोध आहे. सत्ताधारी पक्षाच्या आमदाराना परवाने देण्यासाठी हे नवीन ३२८ दुकानांना परवानगी दिली जात आहे का? अशी स्थिती असेल तर या धोरणाला आमचा विरोध असल्याचे दानवे म्हणाले.

# विदर्भातल पूरस्थितीचा मंत्र्यांकडून आढावा

### मदत आणि पुनर्वसन कार्य तत्काळ पूर्ण करण्याचे निर्देश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
विदर्भातील नागपूर व अमरावती विभागात ८ व ९ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे मोठे नुकसानीचा आढावा घेत संबंधित प्रशासनाला मदत व पुनर्वसन कार्य तत्काळ व प्रभावीपणे पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत.
या नैसर्गिक आपत्तीत जिवीत व वित्तीय नुकसान मोठ्या प्रमाणावर झाल्याने राज्य शासनाने तातडीने उपाययोजना राबविल्या आहेत. बाधित नागरिकांना मदतीचा लाभ वेळेत व पारदर्शक पद्धतीने मिळावा यासाठी सर्व यंत्रणांना सतर्क ठेवण्यात आले असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी निवेदनाद्वारे विधानसभेत दिली.
घरांची पडझड झालेल्या नागरिकांना मदतनिधी जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आला आहे. घरगुती भांडी, कपडे, टपरीधारक व दुकानदार यांना दिली जाणारी मदत वितरित करण्यास मंजूर मुदतीस वाढ देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांना आपत्तीमधील मदत वाटपाबाबत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार त्यांना देण्यात आले आहेत.
नागपूर, वर्धा, गोंदिया, भंडारा, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली. ७ नागरिकांचा मृत्यू, ४ जखमी आहेत. १७ मोठी व १० लहान जनावरे मृत्युमुखी पडली.१,९२७ घरांचे अंशतः नुकसान तर ४० घरे पूर्णतः उद्ध्वस्त झाली आहेत. २०९ गोठ्यांचे नुकसान झाले असून ७१५ नागरिकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. २० हजार ८५४ हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसान झाले असून बाधित शेतकरी संख्या २९ हजार ९२० आहे. या ठिकाणी पंचनाम्याचे कार्य सुरू आहे.
अमरावती विभागात देखील अतिवृष्टीचा परिणाम दिसून आला. एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून एक व्यक्ती जखमी झाला आहे. १८० घरांचे अंशतः नुकसान झाल्याचे महाजन यांनी सांगितले.

# संभाजी ब्रिगेडला संपवण्याचा कट

### गायकवाड यांचा आरोप




■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १४ :**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या एका बैठकीत संभाजी ब्रिगेड व बामसेफला संपवण्याचा कट रचण्यात आल्याचा दावा संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी सोमवारी केला.
प्रवीण गायकवाड यांच्या तोंडाला रविवारी अक्कलकोट येथील एका कार्यक्रमात काळे फासण्यात आले होते. प्रवीण गायकवाड सोमवारी सकाळी एका मराठी वृत्तवाहिनीशी बोलताना म्हणाले की, माझ्यावर हल्ला करणारा दीपक काटे हा भाजप युवा मोर्चाचा सरचिटणीस आहे. त्याच्यावर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहेत.
हा हल्ला पूर्वनियोजित होता. त्यावेळी आम्ही बेसावध होतो. काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या बैठकीत संभाजी ब्रिगेड व बामसेफ या संघटना संपवण्याचा कट रचला गेला. पुरोगामी विचारांच्या नेत्यांना संपवण्याचे काम देशात सुरू झाले. यासाठी दीपक काटे सारख्या गुन्हेगार वृत्तीच्या माणसाची निवड करण्यात आल्याचे ते म्हणाले.

## : हॅलो डॉक्टर :

# पित्ताशयाचे आजार आणि त्यावरील शस्त्रक्रिया

**लोकारोग्य**




अनेकदा आपण अत्यंत रागाने ' माझे पित्त खवळले 'असं बोलतो. अर्थात या उक्तीमागील भावनात्मक बाजू सोडून द्या परंतु शरीरातील चयापचयाची प्रक्रिया सुरळीत पणे सुरु राहण्यासाठी हेच पित्त अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडते.
आपल्या शरीरात जे पित्ताशय असते त्यामध्ये पित्त बनण्याची क्रिया होत असते. परंतु अनेकदा आपल्या खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी असतील, अति मसालेदार,तेलकट आणि चमचमीत खाणे असेल, प्रचंड ताण तणाव असेल अशा अनेक कारणामुळे पित्ताशयातील हे पित्त खरोखरच खवळते आणि त्यामुळे अनेक प्रकारचे गंभीर आजार उदभवतात. पित्ताशयाचे हेच आजार आणि त्यावरील शस्त्रक्रिया या विषयाच्या अनुषंगाने मुंबईतील प्रख्यात केईएम इस्पितळात शल्यविशारद म्हणून असलेले डॉ. समीर रेगे यांच्याशी केलेली बातचीत.

■ **पित्त म्हणजे नेमकं काय असतं? पित्ताशय म्हणजे काय आणि पित्ताशयाचे कार्य कसे असते?**
आपल्या शरीरात जे अवयव असतात त्यापैकीच यकृताच्या खालच्या बाजूला पित्ताशय असते. शरीरात पित्त म्हणजे पिवळा द्रव लिव्हर मध्ये तयार होतो आणि नंतर मोठ्या आतड्यात जमा होते. यापैकी काही पित्त हे पित्ताशयात जमा होत घट्ट होत. आपण तेलकट,मसालेदार पदार्थांचा आहारात मोठ्या प्रमाणात समावेश केला तर पित्ताशय आकुंचन पावते. आपण नेहमी जो आहार घेतो त्याचे पित्त बनून ते पित्ताशयात येते आणि आपली चयापचय क्रिया सुरळीत काम करते.

■ **शरीरातील पित्ताशयाशी संबंधित आजार नेमके कोणकोणते?**
पित्ताशयाला सूज येणं पित्ताशय काम करत नाही किंवा पित्ताशयात छोटे किंवा मोठ्या आकाराचे पित्ताचे खडे बनणं हे पित्ताशयाचे सर्वसामान्य आजार दिसतात. पित्त घट्ट झाल्यामुळे पित्ताशय आकुंचन पावत आणि ते सुरळीत पणे काम करत नाही. पित्ताशयातील हेच खडे जर लहान आतड्यात ढकलले गेले तर कावीळ होण्याचा धोका असतोच शिवाय या खड्यामुळे स्वादुपिंडाचा त्रास देखील होतो. मात्र गम्मत अशी कि अनेकदा आपल्या पित्ताशयात खडे झालेले आहेत याची त्या रुग्णाला जाणीव होत नाही त्यामुळेच लक्षण देखील जाणवत नाहीत.

**पित्ताशयाचे आजार उद्भवण्याची नेमकी कारण काय आहेत?**
आपल्या लिव्हरमध्ये जे पित्त येत ते नंतर पित्ताशयात जमा होऊन घट्ट होत. आणि त्यामुळे आपली पचनक्रिया सुरळीत चालू असते. परंतु अनेकदा मसालेदार,चमचमीत खाण्यामुळे हे पित्त घट्ट होण्याचं प्रमाण हे जास्त होत ज्यामुळे पित्ताशय आकुंचन पावत आणि त्यामुळे पित्ताशयात मोठ्या प्रमाणात खडे निर्माण होतात.
पित्ताशयाचे आजार हे केवळ ठराविक कारणामुळेच होतात असं नाही खूप जाड असलेली माणसं किंवा अति ताणतणाव यामुळे देखील आजार उद्भवतात हल्ली तरुणांमध्ये पित्ताशयाचे खडे होण्याचं प्रमाण वाढलेले दिसत तर लहान मुलांमध्ये हिमोलोटिक रक्तपेशींचा आकार बदलल्याने त्याच परिवर्तन खाड्यांमध्ये होत. म्हणूनच, साधारण १८ वर्षांच्या आतला रुग्ण जर असेल तर त्याला रक्तदोष तर नाही ना हे पाहूनच त्यावर उपचार केले जातात.

■ **पित्ताशयाचे खडे काढण्यासाठी शस्त्रक्रिया करावी लागते का?**
एकदा रुग्णाची सोनोग्राफी करून त्याच्या पित्ताशयात खडे आहेत हे निष्पन्न झाले कि अर्थात हे खडे लहान आतड्यातील नळीद्वारे खाली सरकले आहेत का याचेही निदान होते . मात्र रुग्णाच्या सिटीस्कॅन द्वारे शरीरातील पित्ताशयातील या खड्यांचा निदान होतच असं नाही.
एम आर सी पी नावाची एक टेस्ट आहे जी पित्ताशयामध्ये आणि लिव्हर मध्ये खडे आहेत का याचे निदान अचूक करणारी टेस्ट आहे. आणि शस्त्रक्रिया करण्यापूर्वी अगदी नॉर्मल ऑपरेशन किंवा एखाद्या क्रिटिकल ऑपरेशन पूर्वी जशा रक्ताच्या ,लघवीच्या चाचण्या आणि प्रत्यक्ष शस्त्रक्रियेपूर्वी भूल देण्यासाठीची प्रक्रिया असते. ■ ■ ■

## साईटसेव्हर्स इंडिया फेलोशिप प्रोग्राम २०२५



टाळता येण्याजोग्या अंधत्वाला प्रतिबंध करण्यासाठी आणि अपंग लोकांसाठी समान संधींना प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध असलेली विकास संस्था, साईटसेव्हर्स इंडिया, २०२५ च्या प्रतिष्ठित इंडिया फेलोशिप प्रोग्रामच्या गटासाठी अर्ज आता खुले असल्याचे जाहीर केले गेले आहे.
डेमोक्रॅटायझिंग ॲक्सेस टू वर्ल्ड-क्लास आय केअरर या अलीकडील अभ्यासानुसार, अंदाजे २५,००० नेत्ररोग तज्ञ असलेल्या भारतात दर दशलक्ष लोकसंख्येमागे फक्त १५ नेत्ररोग तज्ञ आहेत. तथापि, शहरी-ग्रामीण तफावत येथेही आहे, शहरी भागात १०,००० लोकांमागे एक नेत्ररोग तज्ञ आहे आणि ग्रामीण भागात दर २५०,००० लोकांमागे एक नेत्ररोग तज्ञ आहे. हे असंतुलन विशेषतः वंचित आणि दुर्गम प्रदेशांमध्ये, सुलभ आणि वेळेवर नेत्ररोग सेवांमध्ये लक्षणीय तफावत अधोरेखित करते.या असमानतेला दूर करण्यासाठी पायाभूत सुविधांपेक्षा जास्त गरज आहे, त्यासाठी जमिनीवर कुशल, प्रेरित व्यावसायिकांची आवश्यकता आहे. साईटसेव्हर्स इंडिया फेलोशिप प्रोग्राम हे या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.
तरुण नेत्ररोग तज्ञांना पोषण आणि सुसज्ज करण्यासाठी डिझाइन केलेले, हा कार्यक्रम प्रत्यक्ष क्लिनिकल प्रशिक्षण, समुदाय सहभाग अनुभव, डोळ्यांच्या आरोग्य सर्वेक्षणात सहभागी होण्याची संधी आणि ग्रामीण आणि अर्ध-शहरी भागातील मोठ्या प्रमाणात सेटिंग्जमध्ये एक्सपोजर प्रदान करतो.नेत्र आरोग्य व्यावसायिकांच्या पुढील पिढीमध्ये गुंतवणूक करून, फेलोशिप केवळ मानवी संसाधनांचा आधार मजबूत करत नाही तर ज्यांना त्याची सर्वात जास्त गरज आहे त्यांच्यापर्यंत दर्जेदार डोळ्यांची काळजी पोहोचते याची खात्री देखील करत आहे. ■ ■

## औषधी मायाळू



मायाळू वनस्पती आशिया व आफ्रिका खंडातील उष्ण कटिबंधीय प्रदेशात आढळते. मायाळू या वनस्पतीला वेलबोंडी असेही काही ठिकाणी म्हणतात. इंग्रजीत मायाळूला इंडियन स्पिनॅच व मलबार नाईट शेड अशी नावे आहेत. मायाळूचे तांबडा व पांढरा असे दोन प्रकार आहेत.
मायाळूचे वेल कोकणात सर्वत्र आढळतात. मायाळूची कोवळी पाने भाजीसाठी वापरतात. रक्ताची किंवा पित्ताची उष्णता अतिशय वाढल्यास मायाळूची भाजी देतात. गुणधर्माने ही भाजी थंड स्वरूपाची आहे. मायाळूची भाजी पालकाप्रमाणे जिरण्यास हलकी आहे.
सांध्यांच्या ठिकाणच्या वेदना व सूज कमी होण्यासाठी ही भाजी उपयुक्त आहे.रक्तविकारात वाढलेली रक्तातील उष्णता या भाजीमुळे कमी होते व रक्तशुद्धी होते. त्यामुळे त्वचाविकारही कमी होतात.फिरंग, उपदंश (गोनोरिया) अशा गुप्तरोगांमध्ये मूत्रमार्गात तसेच शरीरात उष्णता वाढलेली असते, अशावेळी या भाजीच्या नियमित वापराने दाह व वेदना कमी होतात. ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# भाजप आमदाराची अधिकाऱ्याला शिवीगाळ



■ **वृत्तसंस्था, नांदेड, दि. १४ :**
भाजपचे आमदार राजेश पवार व आमदार तुषार राठोड यांची एक ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आहे. या क्लिपमध्ये हे दोघेही एका सरकारी अधिकाऱ्याला अश्लील शब्दांत शिवीगाळ करताना ऐकू येत आहेत. या घटनेमुळे महायुतीच्या नेत्यांच्या सामाजिक नैतिकतेवर सवाल उपस्थित केला जात आहे.
आमदार राजेश पवार व आमदार तुषार राठोड यांनी नांदेड जिल्ह्यातील नायगावच्या नरसी सोसायटीच्या जिल्हा उपनिबंधकांना ही शिवीगाळ केली आहे. ऑडिओ क्लिपमध्ये सुरूवातीला आमदार तुषार राठोड उपनिबंधकांना मुखेड येथील रिक्त जागा मला विचारल्याशिवाय भरायची नाही, या प्रकरणी मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करणार आहे असे म्हणताना ऐकू येत आहेत. त्यानंतर राठोड यांनी फोन आमदार राजेश पवार यांना दिला.

# म. फुले वाडा-भिडे वाडा स्मारक प्रकल्पाला वेग

### कार्यवाही सुरू करण्याचे उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १४ :**
महात्मा फुले वाडा आणि भिडे वाडा राष्ट्रीय स्मारक प्रकल्पाच्या कामकाजाला गती देण्यासाठी विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.
या बैठकीत प्रकल्पाशी संबंधित विविध अडचणी, प्रलंबित कामे, महानगरपालिके मार्फत करावयाची कामे, स्मारक समिती च्या अडचणी आणि स्मारकाच्या भविष्यातील आराखड्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. विशेषतः कामकाजामध्ये दिरंगाई होऊ नये यासाठी त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या आणि पुढील १५ दिवसांत कार्यवाही सुरू करण्याचे निर्देश विभागांना दिले.
बैठकीत डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले की, मालक आणि भाडेकरू यांचे नुकसान भरपाईचा प्रश्न लवकरात लवकर सोडवावा. याबाबतचा सकारात्मक प्रस्ताव शासनास सत्वर सादर करावा जेणेकरून स्मारकाचे काम गतीने पुढे नेता येईल.
कामकाजाचे वेळापत्रक करून त्यानुसार कालबद्धरित्या काम पूर्ण करावे.प्राप्त निधीचा विनियोग वेळेत करण्यासाठी समिती आणि मनपा ने सक्रिय व्हावे. स्मारक प्रकल्पाचे दैनंदिन व्यवस्थापन अधिक नियोजनबद्ध व्हावे यासाठी पुणे महानगरपालिकेने वाड्यामध्ये माहिती देणारे एक कार्यालय स्थापन करावे. नागरिकांना प्रकल्पाची माहिती मिळावी, तसेच समिती अध्यक्षांसाठी देखिल कार्यालयाची गरज असून, स्मारक परिसरातील मनपाची कार्यालये इतर ठिकाणी स्थलांतरित करावीत. स्मारक परिसराचे सर्वेक्षण कामकाज वेळेवर पूर्ण करावे , असे त्यांनी स्पष्ट केले.
महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य देशासाठी प्रेरणास्थान असून, त्यांच्या स्मृती कायमस्वरूपी जतन व्हाव्यात, या उद्देशाने राष्ट्रीय स्मारक उभारणी संदर्भातील कामकाज मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.
महात्मा फुले राष्ट्रीय स्मारक हे पुणे शहराचे वैभव ठरावे आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या जीवन गौरवाचे जिवंत प्रतिक म्हणून सामन्यांना पिढ्यानुपिढ्या प्रेरणादायी ठरावे यासाठी आपण सर्वांनी मनापासून काम करण्याच्या सूचना त्यांनी महापालिका व समिती अध्यक्षांना दिल्या. स्मारकाचे कामकाजाला गती देण्यासाठी राज्य शासनाने स्थापन केलेल्या समितीला देखिल सक्षम करणे गरजेचे असून त्यांना महानगरपालिके मार्फत आवश्यक सहकार्य करावे अशा सूचना त्यांनी दिल्या.
या बैठकीस अतिरिक्त आयुक्त ओमप्रकाश दिवटे, उपायुक्त अविनाश सपकाळ, उपायुक्त अरविंद माळी, उपयुक्त मालमत्ता वसुंधरा बर्वे, भूसंपादन अधिकारी उपजिल्हाधिकारी श्वेता दारुणकर ,शहर अभियंता प्रशांत वाघमारे व इतर अधिकारी, समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे उपस्थित होते.

# सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा

### आरटीआय कार्यकत्यार्चा दावा : मंत्री शिरसाटांचा पाय खोलात



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १४ :**
कॅबिनेट मंत्री संजय शिरसाट यांच्या नेतृत्वातील सामाजिक न्याय खात्यात तब्बल १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला आहे.
या प्रकरणी त्यांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून हे टेंडर रद्द करण्याची मागणी केली आहे. या आरोपामुळे अगोदरच व्हिडिओ कांडामुळे अडचणीत सापडलेल्या संजय शिरसाट यांचा पाय आणखी खोलात गेल्याची चर्चा आहे.
सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचाही एक व्हिडिओ गत आठवड्यात व्हायरल झाला होता. त्यात ते आपल्या खोलीत कॉटवर सिगारेट ओढत बसल्याचे दिसून येत आहेत. यावेळी त्यांच्या अंगावर बनियन व चड्डीच होती. तसेच त्यांच्या शेजारी एक पैशांचे बंडल असणारी बॅगही पडलेली होती.
त्यांचा हा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर शिवसेना ठाकरे गटाने हा पैसा त्यांना मिळालेल्या ५० खोक्यांपैकी १ खोका असल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी आरोप - प्रत्यारोपाच्या फैरी झडत असताना आता शिरसाट यांच्या सामाजिक न्याय विभागात १५०० कोटींचा टेंडर घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.
सामाजिक कार्यकर्ते विजय कुंभार या कथित घोटाळ्याचा तपशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देत म्हणाले की, मुख्यमंत्री साहेब, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्यावर आधीच अनेक गंभीर आरोप आहेत. आता टेंडर क्र. ३७४ द्वारे सामाजिक न्याय विभागाने काढलेल्या १५०० कोटींच्या टेंडरमध्ये मोठा घोटाळा उघड झाला आहे.
या टेंडरमध्ये अनियमितता आहे. या टेंडरसाठी स्मार्ट सर्व्हिसेस (पूर्वीची ब्रिस्क इंडिया), बीव्हीजी इंडिया आणि क्रीस्टल इंटीग्रेटेड सर्व्हिसेस फक्त याच तीन कंपन्या पात्र ठरल्या आहेत. या तिन्ही कंपन्यांनी १९.५० टक्के इतकाच सर्व्हिस चार्ज दिला आहे, म्हणजे स्पष्ट रिंग आहे. हे बेकायदेशीर असून पूर्वी ब्रिस्क इंडियाला ब्लॅकलिस्ट करा असे पत्र आपणच दिले होते.
या कंपनीवर ईडीची कारवाई सुरु आहे. या टेंडरमध्ये एकूण खर्चाचा उल्लेख नाही. यामध्ये सहा वर्षांसाठी ३६३४ कामगार दाखवण्यात आले आहेत, पण कोणत्या पदासाठी किती वेतन दिले हेच दिलेले नाही. केवळ सर्व्हिस चार्जच्या आधारावर हजारो कोटी रुपयांचा निर्णय घेण्यात आला आहे. १३ वर्षे झाले हेच ठेकेदार आहेत, याचा एक पॅटर्न तयार झाला आहे. गेल्या १० वर्षात कोणतेही नवीन टेंडर न काढता काम सुरू आहे. यात एकाच टेंडरवर १५०० कोटींचे पेमेंट झाले आहे.
विजय कुंभार यांनी हा घोटाळा असल्याचा दावा करताना याची चौकशी करण्यासह इतरही काही मागण्या केल्या आहेत. त्यांनी म्हटले आहे की, हे १५०० कोटींचे टेंडर तात्काळ रद्द करण्यात यावे. रिंग करणाऱ्या कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात यावे. जिल्हानिहाय टेंडर प्रणाली लागू करुन त्यात स्थानिक महिला गट, युवक, संस्थांना संधी मिळावी. मागील १३ वर्षांचा गैरव्यवहार आणि विना-टेंडर काम याची देखील चौकशी करण्यात यावी. ही बाब सामाजिक न्याय विभागातील पारदर्शकतेचा आणि सार्वजनिक निधी वापरावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा आहे.